श्रीज्ञानेश्वर माउली.

श्रीगुलाबराव महाराजांनीं निरूपण केलेला

# योगप्रभाव.

## खण्ड दुसरा.

प्रकाशक—राजेश्वरराव त्रिपुरवार. श्रीज्ञानेश्वर मंदिर
दर्हीसात उमरावती.

मुद्रक—लक्ष्मण भाऊराव कोकाटे, हनुमान प्रेस सदाशिव
पेठ घर नंबर ३००, पुणें शहर.

सोल एजन्ट
व्ही. एन् काळे अँण्ड सन्स, बुकसेलर
उमरावती, Amraoti Berar.

वऱ्हाडांत

# व मध्यप्रांतांत

वाङ्मयाचा प्रसार होऊन वाचनप्रियता वाढावी म्हणूनच, आम्ही आमचे डेपोंत निबंधमाला, टीळकचरित्र, गीतारहस्य, श्रीगुलाबराव महाराजांचे चरित्र व ग्रंथ इत्यादि संग्राह्य पुस्तकें, नाटकें, कादंबऱ्या, हायस्कूल, ए. व्ही. स्कूल, प्रायमरी शाळांस लागणारीं इंग्लीश, संस्कृत, मराठी पुस्तकें,

इसावनीति व त्यासारखीं लहान मुलांस वाचनास सुरस गोष्टी,

स्त्रियांस--बोधपर गाणीं व वाचनास योग्य अशीं पुस्तकें.

वृद्धांस--ज्ञानेश्वरी, दासबोध, हरिविजय व श्रीगुलाबराव महाराजांनीं सांगितलेला योगप्रभाव यांसारखे ग्रंथ व पोथ्या येणेंप्रमाणें वैद्यकी, ज्योतिषी, आणि अभंग, लावण्या, स्तोत्रें वगैरे लहान मोठीं पुस्तकें विक्रीस ठेवलीं असून योग्य किंमतीस मिळतात.

याशिवाय उत्तम सोय म्हणाल तर आमचेकडे सर्व तऱ्हेचीं सेकंड हँड पुस्तकें मिळतात व विकत घेतलीं जातात. विशेष माहिती पत्रद्वारें.

मेसर्स व्हि. एन्. काळे अँड सन्स,
बुकसेलर्स उमरावती ( वऱ्हाड ).

# ॥ श्रीज्ञानेश्वरमाउली ॥

२३.१०.१९०७

" तज्जपस्तदर्थभावनम् " ॥ २८ ॥

गुरु—मागल्या सूत्रांत ईश्वराचें नामस्मरण, मंत्र, वगैरे जप-ध्यानादि उपाय तुला सांगितले; आतां प्रणिधान म्हणजे भक्तिचे लक्षणाची रीति तुला सांगावयाची आहे. तें प्रणिधान सूत्रकार " तज्जपस्तदर्थभावनम् " ह्या सूत्रानें सांगतात. ॐकाराचा किंवा ईश्वराच्या रामकृष्ण नामाचा जप करणें व त्या नांवाचा अर्थ जा ईश्वर त्याची भावना करणें म्हणजे त्याची मूर्ति हृदयांत पुनः पुनः स्थापन करण, ह्याचे योगानें साधकाला समाधि होतो. नांवाचा अर्थ म्हणजे, ज्या व्यक्तीचें तें नांव असेल ती व्यक्ति त्या नांवाचा अर्थ होय. जप म्हणजे तोंडांनें नामाचा उच्चार किंवा चिंतन करणें, आणि भावना म्हणजे परमेश्वरास पुनः पुनः ध्यानानें हृदयाचे ठिकाणीं स्थापन करणें, असें भोजवृत्तिकार व व्यास म्हणतात. गीतेंत ह्मटलें आहः—ॐ इत्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ॥ यः प्रयाति त्यजन्देहं याति परमां गतिम् ॥ १ ॥ व्याहरन् म्हणजे उच्चारण. अनुस्मरन् म्हणजे भावनेनें ध्यान करून किंवा आठवण ठेवून. भगवान् म्हणतात:—ॐकाराचा जप करीत होत्साता माझें ध्यान करून जो देहाचा त्याग करितो तो परमगतीला जातो. आचार्य आपल्या भाष्यांत म्हणतात, यावज्जीवपर्यंत असेंच करीत राहावें. योगभ्रष्टाप्रमाणें भक्तही वायां जात नाहीं. " न मे भक्तः प्रणश्य-

ति " " शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोभिजायते " " क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छांतिं निगच्छति " न हि कल्याणकृत्कश्चिद् दुर्गतिं तात गच्छति" हीं सगळीं वचनें वरील म्हणण्याला प्रमाणभूत आहेत. कबीर म्हणतात—" संतबीज पलटे नहीं जो जाय जुग अनंत ॥ ऊच नीच योनी + धरे अखिर संत का संत ॥ असो. याप्रमाणें वरील सूत्रांत जप व ध्यान हीं दोन्हीं सांगता[illegible]. जपाला स्वाध्याय असें म्हटलें आहे. "स्वाध्यायाद्योगमासीत योगा[illegible] स्वाध्याय मामनेत् । स्वाध्याय योगसंपत्या परमात्मा प्रकाश्यते॥" अ[illegible] वचन विष्णुपुराणांत आहे. त्याचा अर्थ असा आहे कीं, जपाच्या योगानें ध्यान सिद्ध करावें, व ध्यानाच्या योगानें जप सि[illegible] करावा, आणि ध्यान व जप यांच्या योगानें समाधि सिद्ध होत[illegible] व समाधीच्या योगानें परमेश्वराचें ज्ञान होतें. असें जपाचें महत्[illegible] आहे. म्हणूनच गीतेंत " यज्ञानां जपयज्ञोऽस्मि " असें देवा[illegible] म्हटलें आहे. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतातः—समस्तांही यज्ञांच्[illegible] पैकीं ॥ जपयज्ञ तो मी ये लोकीं ॥ जो कर्मत्यागें प्रणवादिकीं [illegible] निपजविजे ॥ १ ॥ नाम जपयज्ञ तो परम ॥ बाधूं न श[illegible] स्नानादि कर्म ॥ नामें पावन धर्माधर्म ॥ नाम परब्रह्म वेदार्थीं [illegible] तुकाराममहाराज म्हणतातः—" अविधि तो बाधी आणि[illegible] अक्षरां ॥ नाम निदसुरा घेतां तरे " ॥ १ ॥ म्हणजे नामज[illegible] यज्ञाला अविधीचीही बाधा नाहीं. केव्हांही घेतलें तरी तें पा[illegible] करीतेंच. यावज्जीव—सर्वकाळ नामस्मरण करावें. वामनपं[illegible] म्हणतातः—" सदां येतां जातां उठत बसतां काम करिता ॥ सदां देतां घेतां वदनिं वदतां ग्रास गिळितां ॥ निशाकाळीं शय्ये[illegible] रतिसुखाचे अवसरीं ॥ समस्तांची लज्जा त्यजुनि भगवच्चिंत[illegible]

× घर आवे ( पाठांतर )

करीं ॥ १ ॥ ” एकनाथमहाराज म्हणतातः—“ हरि बोला देतां हरि बोला घेतां ॥ सर्वकार्य करितां हरि बोला ॥ १ ॥ हरि बोला भांडतां हरि बोला फाडतां ॥ उठतां बैसतां हरि बोला ॥ २ ॥ हरि बोला एकांतीं हरि बोला लोकांतीं ॥ देह त्यागाअंतीं हरि बोला ॥ ३ ॥ हरि बोला जनीं हरि बोला विजनीं ॥ एका जनार्दनीं हरि बोला ॥ ४ ॥ तात्पर्य, नाम घेण्यास केव्हांही मोकळीक आहे. आपण स्नान केलें नसलें तर किंवा अशुचि असलों तर कर्माचा अधिकार नाहीं. परंतु नामस्मरण मात्र करितां येतें. “ कर्मधर्म नव्हती सांग ॥ उण्या आंगें पतन ॥ १ ॥ भलत्या काळें नामावळी ॥ सुलभ भोळी भाविकां ॥ २ ॥ प्रायश्चित्तें पळती पायां ॥ गाती तया वैष्णवां ॥ ३ ॥ तुका म्हणे नुपजे दोष ॥ करा घोष आनंदें ॥ ४ ॥ ” असें तुकाराममहाराजांनीं सांगून ठेवलें आहे. परंतु यावरून स्नानसंध्यादि विहित कर्माचा त्याग मात्र कोणीं करूं नये. तो दश अपराधांपैकीं एक आहे हें मागें सांगितलेंच आहे. कारण जेवणाकरितां जर स्नान केलें पाहिजे तर नामस्मरणाकरितां कां करूं नये ?

ॐकाराचा जप मात्र शुचिर्भूत होऊनच करावा. भलत्या काळीं करूं नये.

यमनियमादि अष्टांगयोग हा तिन्ही कांडात्मक आहे असें वैदिक धर्मसूत्रांत सांगितलें आहे. यम, नियम, आसन आणि प्राणायाम हे शारीरिक कर्मांत येतात. हा क्रियाविशेष भाग आहे. प्रत्याहार, धारणा आणि ध्यान हे मानसिक कर्मांत येतात.हा उपासनेचा भाग झाला. यांत मन विषयांतून काढून चित्त एकाग्र करण्याचा अभ्यास होतो चित्त एकाग्र करून सारखें चिंतन करण्याचा अभ्यास अशा रीतीनें

करावा. चिंतनाचे योगानें ध्याता आणि ध्येय एक झाले म्हणजे ज्ञान होतें—तोच समाधि. याप्रमाणें योग हा तिन्ही कांडात्मक आहे, हें वैदिक धर्मसूत्रांत दाखविलें आहे. नामजप करणाऱ्याजवळच नेहमीं परमात्मा राहतो. त्यांत विवेक मात्र त्याला साह्य पाहिजे, हें मागें सांगितलेंच आहे. यालाच प्रणिधान म्हणजे भक्ति म्हणतात. स्वाध्यायाविषयीं ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात:— " तें द्विजासीच ब्रह्मसूत्र ॥ येरां स्तोत्र कां नाममंत्र ॥ आवर्तणें पवित्र ॥ पावावया तत्व ॥ " ज्या स्तोत्रांत ब्रह्म प्रतिपादन केलें तें ब्रह्मसूत्र होय. शंकराचार्य म्हणतात, " ब्रह्मसूचकानि वाक्यानि संति अस्मिन् इति" अशा ब्रह्मसूत्रांचें पठण फक्त द्विजांनींच करावें. इतरांनीं पौराणिक स्तोत्र किंवा नाममंत्र म्हणावे. शूद्रादिकांनाही नामाचा अधिकार आहे, असें तुकारामहाराजांचें वचन आहे. " येथें सकळांसी आहे अधिकार ॥ कलियुगीं उद्धार हरिनामीं॥" नाम घेणाऱ्याजवळ परमात्मा आवडीनें राहतो. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात:—" तयापाशीं पांडवा ॥ मी हारपला गिंवसावा ॥ जेथ नामघोष बरवा ॥ करिती माझा ॥ " तुकाराममहाराज म्हणतात:— निजलिया जागा उभा नारायण ॥ बैसल्या कीर्तन करितां डोले ॥ १ ॥ उभा राहोनियां मुखीं नाम वदे ॥ नाचे नाना छंदें पांडुरंग ॥ २ ॥ मार्गीं चालतां नाम वदे वाणी ॥ उभा चक्रपाणी मागें पुढें ॥ ३ ॥ तुका म्हणे त्याला कीर्तनाची गोडी ॥ भावें घाली उडी नामासाठीं ॥ ४ ॥ याप्रमाणें नाममहिमा वर्णन केला. नीलकंठ चतुर्धर भारताचे टीकाकार म्हणतात:—" भजनं द्विविधं भावनामयं प्रणिधानमयं च " म्हणजे भावनामय आणि प्रणिधानमय असें दोन प्रकारचें भजन आहे. भावनामय म्हणजे वेळोवेळीं नाम घेणें आणि मूर्ति मनांत आणणें. आणि प्रणिधानमय म्हणजे एकांत एक मिळवीत जाणें.

आतां एकांत एक मिळवीत जाणे कसें तें सांगतात:—स्थूलाचा लय सूक्ष्मांत करावा आणि सूक्ष्माचा लय कारणांत करून अविद्येचा ब्रह्मांत लय करावा. ही वेदांतप्रक्रिया झाली. आतां सांख्यप्रक्रिया:— मन, देह, वगैरे ही प्रकृति, याचा लय पुरुषांत करावा. व पुरुषाचा म्हणजे जीवाचा लय ईश्वरांत करावा. याप्रमाणें ध्याता व ध्येय एक करून जीवब्रह्माचें ऐक्य झालें म्हणजे समाधि साधावा. गरुडपुराणांतील मोक्षधर्म प्रकरणांतही असेंच सांगितलें आहे:—प्रकृति, महत्तत्व, आणि अहंकार मिळून २५ तत्वें; त्यांना भोगणारा जीव आहे. जीवानें सव्वीसावा जो ईश्वर त्यांत लीन होऊन मुक्त व्हावें. अगोदर जीवाला देहापासून निराळें काढिलें पाहिजे. वार्तिककार म्हणतात, प्रकृतिपासून जीवाला निराळें काढलें म्हणजे जडाचा अभिमान नष्ट होतो. व जीवावरचा अभिमानही काढला म्हणजे जीव आणि परमात्मा एकच होतात. असें झालें म्हणजे आपण परमेश्वररूप होतो. या प्रणिधानाचेही दोन भेद आहेत. मी ईश्वराचा अंश आहें असें ध्यान करणें हें एक प्रणिधान, व देव आणि मी एकच आहोंत असें वाटणें हें दुसरें प्रणिधान. पहिला प्रकार म्हणजे मी ईश्वराचा अंश आहें असें वाटणें ही उपासना होय. यांत मन क़ायम राहतें, परंतु ईश्वर आणि मी एकच आहों असें झालें म्हणजे तें ज्ञान होय. ही स्थिति मनाच्या पलीकडची आहे. हनुमन्नाटकांत तीन प्रकारचें प्रणिधान सांगितलें आहे. श्लोक—देहबुद्ध्या तु दासोऽहं।जीवबुद्ध्या त्वदंशकः॥ आत्मबुद्ध्या त्वमेवाहं । इति मे निश्चला मतिः ॥ १ ॥ मारुति म्हणतात, हे रामा, देहदृष्टीनें मी तुझा दास आहें. जीवदृष्टीनें तूं समुद्र व मी तरंग म्हणजे तुझा अंश आहें व आत्मदृष्टीनें तूं पाणी आणि मी तरंग म्हणजे पाणीच. दोघेही एकच आहोंत. भावनामय भजनानें म्हणजे पुन्हां पुन्हां मूर्ति मनांत आ. त्यानें

संप्रज्ञात समाधि होतो, व प्रणिधानमय भजनानें म्हणजे भावना दृढ झाल्यानें असंप्रज्ञात समाधि होतो. विज्ञानभिक्षु वार्तिककार म्हणतात, आत्मा एक आहे अशी एक श्रुति सांगते व आत्मे पुष्कळ आहेत अशी दुसरी श्रुति सांगते. अशा दोन प्रकारच्या श्रुति आहेत, तरी दोन्ही श्रुतींत विरोध नाहीं. कारण व्यवहारदृष्टीनें आत्मे जरी अनेक भासतात तरी वास्तविक आत्मा एकच आहे. घटाकाश व मठाकाश हे जसे उपाधिभेदानें भिन्न भासतात तसे आत्मे उपाधिभेदानें अनेक भासतात. परमार्थदृष्टीनें आत्मा एकच आहे. विज्ञानभिक्षु म्हणतात याचं जास्त विवेचन ब्रह्ममीमांसा-भाष्यांत सांगूं.

लोकांचें म्हणणें असें आहे कीं, जग सत्य आहे, व विज्ञान-भिक्षुही असेंच ह्मणतात. पण ह्याचा अर्थ इतकाच कीं, जग हें व्यवहारदृष्टीनें मात्र सत्य आहे. परमार्थदृष्टीनें जग सत्य नाहीं. सांख्यसारांत जड परमार्थदृष्ट्या असत्य आहे असें विज्ञानभिक्षूनींच म्हटलें आहे.

**शिष्य**—महाराज, भावनामय भजनानें संप्रज्ञात समाधि होतो व तीच भावना दृढ झाली म्हणजे प्रणिधानमय भजनानें असंप्रज्ञात समाधि होतो असें आपण सांगितलें यावरून प्रणिधान निराकारांत होतें, साकारांत होत नाहीं असें झालें. तर मग सगुण-भक्ति गौण झाली नाहीं काय ?

**गुरु**—सगुणभक्ति मुळींच गौण होत नाहीं. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात कीं, सगुणभक्ति निराळी नाहीं. निराकारांत लय करून प्रणिधान सिद्ध होतें, तसेंच साकारांतही लय करून प्रणिधान सिद्ध होतें. अशा प्रकारची एक प्रक्रिया भागवताच्या एकादश-स्कंधांत सांगितली आहे. ती अशी:—आपल्या हृदयांत हरीचें

ध्यान आणून त्याच्या हास्यमुखाचें पुष्कळ वेळ ध्यान करीत राहावें, नंतर नुसतें हास्यमुखाचेंच ध्यान करावें, व त्यानंतर नुसत्या हास्याचेंच ध्यान करीत करीत त्या आनंदात आपण मिळून जावें. गीतेंत निर्गुणयोग्यापेक्षां सगुणयोग्यालाच श्रेष्ठ म्हटलें आहे. कारण देव म्हणतात त्यांचा उद्धार करणारा मीच आहें. परंतु निर्गुणयोगी मात्र शीण पावतात. " क्लेशोधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ॥ " ज्ञानेश्वरमहाराज ह्मणतातः—पैं जे वाणी इयातुका ॥ तेचि वेगळिये वाला एका ॥ तैसा एकदेशीया व्यापका ॥ सरिसा पाडू ॥ १ ॥ जो कस तोळाभर सोन्याला लागतो तोच वालभरालाही लागणार. तसा एकदेशी आणि व्यापक किंवा सगुण आणि निर्गुण परमात्मा हे एकच होत. व्यापक ब्रह्माचें ध्यान केल्यानें पूर्णता व समाधि होतो तसेंच साकाराच्या ध्यानानेंहि होतें. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतातः—आपुलिया साटोवाटी ॥ शून्य घेती उठाउठी ॥ तेही मातेंची किरिटी ॥ पावती गा ॥ परंतु—वांचूनि योगाचोनि बळें ॥ अधिक कांहीं मिळे ॥ ऐसें नाहीं आगळे ॥ कष्टाचि तया ॥ + + आतां सगुणभक्तांविषयीं सांगतातः—म्हणोनि येर ते पार्था ॥ नेणतीचि हे व्यथा ॥ जे कां भक्तिपंथा ॥ वोटंगले ॥ + + ऐसे जे मत्पर ॥ उपासिती निरंतर ॥ ध्यानमिषें घर ॥ माझें झाले ॥ जयांचिये आवडी ॥ केली मजशीं कुळवाडी ॥ भोगमोक्ष बापुडीं ॥ त्यजिलीं कुळें ॥ ऐसे अनन्य योगें ॥ विकले जीवें मनें आंगें ॥ तयांचें काथि एक सांगें ॥ जे सर्व मी करीं ॥ आतां अर्जुनाला उपदेश करितातः—" म्हणूनी प्रवृत्ति आणि निवृत्ति ॥ इये वोझीं नेघे मती ॥ अखंड चित्तवृत्ति ॥ माझ्या ठायीं ॥ + + आणि जें जें कर्म निपजे ॥

तें थोडें बहु न म्हणिजे ॥ निवांताचि अर्पिजे ॥ माझ्या ठायीं ॥ ऐसिया मद्भावना ॥ तनुत्यागीं अर्जुना ॥ तूं सायुज्यसदना ॥ माझिया येसी ॥ आणखी:— अभ्यासाहूनी गहन ॥ पार्था मग ज्ञान ॥ ज्ञानापासूनी ध्यान ॥ विशेषिजे ॥ मग कर्मफल त्याग ॥ तो ध्यानापासूनि चांग ॥ त्यागाहूनि भोग ॥ शांतिसुखाचा ॥ ऐसिया यया वाटा ॥ इहींचि पेणीं सुभटा ॥ शांतीचा माजिवटा ॥ ठाकिला जेणें ॥ " यावरून सगुणभक्ति गौण नाहीं हें तुला समजलेंच असेल. दुसरें निर्गुणाची कांहीं भावना होत नाहीं, त्यांत नुसतें प्रणिधानच होतें; परंतु सगुणभक्तींत दोन्ही होतात, म्हणून सगुणभक्तांना निर्गुण आपोआपच प्राप्त होतें. जसें उष्णताच नुसती घेणारांस विस्तव घ्यावा लागतो, पण विस्तव घेतला तर दोन्ही मिळतात. श्रीधरांनीं हरिविजयांत असेंच एक उदाहरण दिलें आहे.सुगंध हा निर्गुण व कस्तुरी सगुण नुसता सुगंध मिळण्यापेक्षां कस्तुरी मिळाली तर कस्तुरी मिळून त्याबरोबर सुगंध सहजच मिळतो. यावरून हें सिद्ध होतें कीं, निर्गुण सांपडला आणि सगुण प्राप्त झालें नाहीं तर नुस्त्या निर्गुणानें श्रम जात नाहीं. याला उदाहरण हरणाचेंच. हरणाला कस्तुरीचा वास येत असतो, परंतु ती आपल्याजवळ बेंबींतच आहे हें न कळल्यामुळें तो भटकत फिरतो. त्याप्रमाणें निर्गुणाच्या ध्यानानें लोक कष्टी होतात, परंतु ज्यानें सगुण परमात्मा पाहिला त्याला निर्गुणाची आपोआपच प्राप्ति होते. " सगुणनिर्गुण दोन्हीं ज्याचीं अंगें । तोचि आम्हांसंगें क्रीडा करी ॥ " हें तुकाराममहाराजांचें वचन मागें आलेंच आहे. याप्रमाणें प्रणिधान—भक्ति—सिद्ध झाली. या प्रणिधानावर पुष्कळ श्लोक दिले आहेत. त्यांचा अर्थ ईश्वरप्रकरणाच्या शेवटीं सांगूं.

आतां हें प्रणिधान ज्ञान होईपर्यंत असतें. परंतु ज्ञान झाल्या-

नंतर अखंड भक्तिच असते. ज्ञानानंतर भक्ति कशी असते त्याचें वर्णन स्वमंतव्यांशासिद्धांततुषार, भक्तिपदतीर्थामृत, भगवद्गीता-संगति ह्या स्वकृत ग्रंथांत पहा. ह्याचें निरूपण मधुसूदनसरस्वती ह्यांनींही " भक्तिरसायनां " त केलें आहे. गीतेंत भगवान् म्हणतातः—ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न कांक्षति ॥ समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम् ॥ " म्हणजे ज्ञानानंतर तें प्रणिधान अकृत्रिम भक्ति बनतें. ज्ञानेश्वरमहाराजांनींही ज्ञान झाल्यानंतर अकृत्रिम भक्ति कशी राहते हें अमृतानुभवांत सांगितलें आहे. ते म्हणतातः—" देव देऊळ परिवारू ॥ कीजे कोरूनि डोंगरू ॥ तैसा भक्तीचा व्यवहारू ॥ कां न व्हावा ॥ १ " " कोणी एक अकृत्रिम ॥ भक्तीचें हें वर्म ॥ योग ज्ञानादि विश्राम ॥ भूमिका हे ॥ " ज्ञानेश्वरींतही असेंच म्हटलें आहेः— " तैसी क्रिया कीर न साहे ॥ परी अद्वैतीं भक्ति आहे ॥ हें अनुभवाचि जोगें नोहे ॥ बोला ऐसें ॥ " भागवतांत म्हटलें आहेः—" आत्मारामाश्च मुनयो निर्ग्रंथा अप्युरुक्रमे ॥ कुर्वन्त्यहैतुकीं भक्तिमित्थंभूतगुणो हरिः ॥ " त्या हरीचे गुणच असे आहेत कीं, ज्ञान झाल्यावरही सत्पुरुष त्या परमेश्वराचेच ठिकाणीं निर्हेतुक भक्ति करीत राहतात. वरील श्लोकाचा भावार्थ वामनपंडित सांगतातः—" आत्माराम असे शुकादिक मुनी ज्यांचे आविद्यामय ॥ ग्रंथी सर्वहि सूटल्या जितचि जे मुक्त स्वयें अद्वय॥ भक्ति श्रीपतिची उगीच करिती तीही निमित्ताविण ॥ कीं मुक्तीहुनि गोड फार असती श्रीमाधवाचे गुण ॥ १ ॥ भक्तीचें पहिलें स्वरूप म्हणजे भावना—तीच ज्ञान होईपर्यंत प्रणिधान या रूपांत असते—व ज्ञान झाल्याबर तीच अकृत्रिम भक्ति बनते. तिलाच पराभक्ति म्हणतात. भक्ति हीच सर्वांत श्रेष्ठ ठरते. कारण भक्तांना अगदीं बालंबाल खात्री असते कीं, पशु, वृक्ष,

पाषाणादि यांपैकीं कोणत्याही योनींत आपण गेलों तरी तेथें भक्ति ही राहतेच. परंतु इतर साधनें फक्त मनुष्ययोनींतच आहेत. तीं इतर योनींत राहतील किंवा नाहीं याची शंका आहे. विष्णुपुराणांत प्रल्हादानें देवाला हेंच मागणें मागितलें आहे. श्लोक—" नाथ योनिसहस्रेषु येषु येषु व्रजाम्यहम् ॥ तेषु तेष्वचला भक्तिरच्युतास्तु सदा त्वयि ॥ १ ॥ प्रल्हाद म्हणतो—हे नाथ, तूं आमच्यावर कृपा करणारा आहेस. मला एवढेंच दे कीं, अनंत योनींत जरी मी फिरलों तरी, तुझ्या ठिकाणीं माझी अचल भक्ति असावी. या श्लोकांत सहस्र शब्द अनंतवाची आहे. " शतमनंतं भवति " अशी श्रुति आहे. पुरुषसूक्तभाष्यांतही सहस्रशब्द अनंतवाची सांगितला आहे. असो. ईश्वरप्रणिधानानें आपोआपच चित्त एकाग्र होतें. वास्तविक पशुयोनींत चित्त विक्षिप्त असल्यामुळें तें एकाग्र होण्याचा संभवही नाहीं, परंतु भक्तीनें पशूंचेंही चित्त एकाग्र झाल्याचें उदाहरण आहे. जसें गजेंद्राला भक्तीनेंच चित्त एकाग्र होऊन योगसिद्धि झाली. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतातः—" म्हणोनि कुळ उत्तम नोहावें ॥ जाती अंत्यजही व्हावें ॥ वरी देहाचेनि नांवें ॥ पशूंचेंही लाभो ॥ १ ॥ पाहे पां सावजें हातिरूं धरिलें ॥ तेणें तया काकुळती मातें स्मरिलें ॥ कीं तयाचें पशुत्व वावो जाहलें ॥ पावलिया मातें ॥२॥" याप्रमाणें ईश्वरप्रणिधानानें योगसिद्धि होते, हें तर सिद्ध झालेंच, पण इतर उपायानें जी योगसिद्धि होते त्यांत फार विघ्नें येतात, व तीं विघ्नें दूर करण्याला अतिशय कष्ट पडतात; तशीं विघ्नें ईश्वरप्रणिधानांत परमात्मा भक्तांना येऊं न देतां " तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् " हें आपलें वचन तो कसें खरें करून दाखवितो तें पुढल्या सूत्रांत सांगेन.

॥ श्रीमत् सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

# श्री ज्ञानराज माउली.

२४–१०–१९०७.

" ततः प्रत्यक्चेतनाधिगमोऽप्यंतरायाभावश्च ॥ २९ ॥"

गुरु—योगशास्त्रांतील समाधिपादांत ईश्वरप्रकरण हें महत्वाचें आहे. व त्या ईश्वरप्रकरणाचें आजचें हें शेवटलें सूत्र आहे. "ईश्वरप्रणिधानाद्वा" या सूत्रापासून ईश्वरप्रकरणास प्रारंभ होऊन आजपर्यंत जीं एकंदर ६ सूत्रें झालीं त्यांचें दिग्दर्शन सिंहावलोकनन्यायानें तुला थोडक्यांत सांगतों:—

"ईश्वरप्रणिधानाद्वा" या सूत्रानें ईश्वराच्या उपायाचा उद्देश मात्र सांगितला. आतां ईश्वर म्हणजे काय अशी शंका प्राप्त झाली असतां—

"क्लेशकर्मविपाकाशयैरपरामृष्टः पुरुषविशेष ईश्वरः" या सूत्रानें ईश्वराचें लक्षण सांगितलें.

"तत्र निरतिशयं सार्वज्ञबीजम्" या सूत्रानें परमेश्वराची परीक्षा सांगितली; व अनुमानप्रमाणानें ईश्वर सर्वापेक्षां सामर्थ्यवान् आहे असें सिद्ध केलें.

"स पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदात्" या सूत्रानें परमेश्वराची अनुग्रहशक्ति वर्णन केली.

"तस्य वाचकः प्रणवः" या सूत्रानें नामस्मरण, मंत्र वगैरे जपध्यानादि उपाय सांगितले, आणि

"तज्जपस्तदर्थभावनम्" या सूत्रानें प्रणिधान म्हणजे भक्तीचे लक्षणाची रीति सांगितली आहे.

याप्रमाणें पहिलेपासून ६ सूत्रांचें दिग्दर्शन थोडक्यांत सांगितलें.

आतां आजच्या सूत्रानें प्रणिधानाचें फल काय आहे तें सांगतात:—

ह्या सूत्रांत प्रणिधानाचीं दोन फळें सांगितलीं आहेत. एक प्रत्यक्‌चेतनाधिगम म्हणजे परमेश्वराच्या स्वरूपाचें ज्ञान होणें व दुसरें अंतरायाभाव म्हणजे योगांत येणाऱ्या विघ्नांचा नाश होणें. या विघ्नांचीं नांवें पुढच्या दोन सूत्रांत सांगितलीं आहेत. भाष्यकारांनीं येथें निराळीच मजा केली आहे. ते म्हणतात, व्याधि आदि करून जीं विघ्नें आहेत तीं सर्व परमेश्वरभक्तीनें नाहींशीं होतात, व ईश्वराच्या स्वरूपाचें दर्शनही होतें. " स्वरूपदर्शन-मप्यस्य भवति. " तेच आणखी असें म्हणतात कीं, ईश्वर जसा सर्व क्लेशांच्या रहित व शुद्ध आहे तसाच पुरुष म्हणजे जीवही प्रकृतीचा साक्षी असल्यामुळें त्याला मी शुद्ध आहें—व मल क्लेशादिक नाहींत असें ज्ञान होतें. वृत्तिकार असा अर्थ करि-तातः—प्रत्यक्-चेतनाधिगम " म्हणजे परमेश्वराचें ज्ञान होणें. प्रत्यक्‌चेतन ह्मणजे परमात्मा आणि अधिगम म्हणजे ज्ञान. य िव-रून मला निराळाच सिद्धांत काढावयाचा आहे. भाष्यकार िचें मतच मला येथें चांगलें वाटतें. त्यांनीं ईश्वराप्रमाणें आपणही प्रकृतीचा साक्षि व शुद्ध आहों असें ज्ञान जीवाला होणें यालाच स्वरूपदर्शन म्हटलें आहे. वार्तिककार म्हणतात कीं, व्याध्यादि दुःखें दूर हाण हें सामान्य एकाग्रतेचें फल आहे, पण सामान्य एकाग्रतेनें ईश्वराच्या स्वरूपाचें मात्र ज्ञान होत नाहीं. परंतु ईश्वर-प्रणिधानानें परमेश्वरस्वरूपाचें ज्ञानही होतें, आणि व्याध्यादि विघ्नेंही दूर होतात. तर यावरून असें ठरतें कीं, स्वरूपज्ञान होणें

हेंच ईश्वरभक्तीचें मुख्य फल आहे, विघ्न दूर होणें हें मुख्य फल नव्हे. सूर्योदय झाला म्हणजे आंधार नष्ट होतो व आंगाला उष्णता लागून थंडीचें निवारणही होतें. परंतु विस्तवाचा ताप केला तर त्याच्या उष्णतेनें नुसतें थंडीचेंच निवारण होईल, आंधार कांहीं नाहींसा होणार नाहीं. त्याला सूर्योदयच झाला पाहिजे. म्हणून तमाचा नाश होणें हेंच सूर्योदयाचें मुख्य फल होय, व आंगाला उष्णता लागणें हें जें गौण फल आहे तें सूर्योदयाबरोबर सहजच मिळतें. त्याप्रमाणें परमेश्वराची भक्ति केली असतां त्याच्या स्वरूपाचें ज्ञान होणें आणि विघ्नें नाहींशीं होणें हीं दोन्हीं फलें होतात; पण नुसत्या सामान्य एकाग्रतेनें परमेश्वराचा स्वरूपसाक्षात्कार होत नाहीं. व्याध्यादि विघ्नांचेंच निवारण होतें. स्वरूपसाक्षात्कार होण्याला परमात्मभक्तिच केली पाहिजे म्हणजे त्याच्या स्वरूपाचें दर्शन होऊन त्या भक्तींत जी सत्वगुणाची वृद्धिहोते त्यामुळें व्याध्यादि विघ्नेंही सहजच नाश पावतात.

वार्तिकांत आधि आणि व्याधि असे दोन शब्द आहेत. आधि म्हणजे मानसिक दुःखें. हीं रजोगुणानें होतात आणि व्याधि म्हणजे शारीरिक दुःखें हीं तमोगुणानें होतात. कारण शरीर हें चंचल नसून जड आहे म्हणून शारीरिक दुःखें बहुतेक तमोगुणानें होतात आणि चंचलता ही मनाला आहे म्हणून मानसिक दुःखें किंवा आधि ह्या रजोगुणानें होतात. ह्यामुळें सत्वगुणाच्या वृद्धीनें आधि आणि व्याधि हीं दोन्हीही विघ्नें सहजच दूर होतात. यावरून ईश्वरभक्तीचें मुख्य फल स्वरूपदर्शन असून विघ्ननिवारण होणें हें गौण फल होय असें ठरतें. ईश्वरभक्तीत गुरुभक्तीचाही समावेश होतो—श्रुति—“ यस्य देवे

परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ ॥ तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाश्यंते महात्मनः ॥ " म्हणजे परमेश्वराच्या ठिकाणीं ज्याची परा भक्ति आहे तशीच गुरूच्या ठिकाणीं असली तर त्या महात्म्याला ज्ञानाचा उजेड पडतो, म्हणजे ज्ञान प्राप्त होतें. यावरून भक्तिच सर्व इष्ट फल देणारी आहे. स्मृतिकार म्हणतातः—" भक्तिर्जनित्री ज्ञानस्य भक्तिर्मोक्षप्रदायिनी " ॥ भक्तीपासून ज्ञान कसें विचित्र रीतीनें होतें ती खुबी कांहीं निराळी असून अनिर्वचनीय आहे. ती फक्त भक्तच जाणतात. " प्रकाश्यंते कापि पात्रे " म्हणजे संतांच्या कृपेनेंच ह्या अनिर्वचनीय प्रेमाचें ज्ञान होतें असें नारदभक्तिसूत्रांत म्हटलें आहे. आतां तुला एक प्रकार सांगतों, तो फक्त माझ्याच अनुभवाचा आहे. इतर मार्गांनीं जें ज्ञान होतें तें देहादिकांचा निषेध करून होतें. परंतु ज्ञान म्हणजे काय? तर परमात्मा जसा शुद्ध आहे तसा मीही आहें असें ओळखणें यालाच ज्ञान म्हणतात. ही गोष्ट भक्तीनें जशी सुलभ आणि सहज होते तशी इतर मार्गानें होत नाहीं. इतर मार्गानें जें ज्ञान होतें तें स्थूल, सूक्ष्म, आणि कारण हे तीन देह निराळे करून होतें, पण भक्तिमार्गांत तसें नाहीं. याला एक दृष्टांत घेऊं:— आपल्याला राजाशीं सोयरीक करावयाची आहे तर अगोदर आपल्याला राजा झालें पाहिजे. तें दोन रीतीनें होतां येईल. एक तर मी राजाचा नोकर नाहीं, सेनापति नाहीं, प्रधान नाहीं, अशा रीतीनें मनाची भावना करून पराक्रमानें राज्य मिळविलें पाहिजे—किंवा राजावर प्रेम केला पाहिजे, म्हणजे तो प्रेमवश होऊन आपल्याला अर्धें राज्य वगैरे देऊन आपल्या बरोबरीचा करून घेईल, आणि मग सहज सोयरीक करितां येईल. ह्या दृष्टांताप्रमाणें आपल्यास परमेश्वरांत मिळण्याच्या दोन रीति आहेत. एक तर मी प्रकृतीहून निराळा आहें अशी भावना करणें, व

दुसरी परमेश्वर जसा शुद्ध आहे तसा मीही शुद्धच आहें अशा रीतीनें परमेश्वरावर प्रेम करणें.आपण मोठे व्हावें अशी आपली इच्छा असली तर एकतर आपण हलकट व्यापार सोडल्यानें मोठे होऊं-किंवा एखाद्या मोठ्या मनुष्यावर प्रेम करीत राहिल्यानें मोठेपणास चढूं. यांत पहिल्या मार्गानें मोठे झालों असतां मी मोठा झालों हा अभिमान कायम राहील—परंतु दुसऱ्या मार्गांत ही मजा आहे कीं, आपली इच्छा नसली तरी हलकट व्यापार सहज सुटत जातात व आपण ज्याच्यावर प्रेम करीत असतों तो सहजच आपल्याला बरोबरीचा करून घेतो. व मोठे झाल्याचा अभिमानही आपल्यास राहात नाहीं. अशाच प्रकारची एक कथा पंचतंत्रांत आहे. श्लोकः—नीचाश्रयो न कर्तव्यः कर्तव्यो महदाश्रयः ॥ अजा सिंहप्रसादेन आरूढा गजमस्तके ॥—ही गोष्ट अशी आहेः—एक होती शेळी. ती एका सिंहाचे दृष्टीस पडून तो तिला खावयास धावला. ती शेळी सिंहास शरण गेली. तेव्हां तो म्हणाला मी तुला खात नाहीं, तूं स्वस्थ ऐस, व तूं मला शरण आलीस त्याअर्थी तुझा मोठेपणा वाढेल अशी एक गोष्ट मी तुला सांगतों. तूं आपले आंग रंगवून मी सिंहाची मावशी आहें असें लोकांस सांगत जा. तिनें तसें केलें. एकदां एका हत्तीनें त्या शेळीला पाहिलें आणि तूं कोण म्हणून विचारलें. तेव्हां ती म्हणाली मी सिंहाची मावशी आहें. असें ऐकल्याबरोबर हत्तीनें त्या शेळीला आपल्या सोंडेनें उचलून मस्तकावर बसवून घेतलें. या गोष्टीवरून मोठ्याचा आश्रय केला असतां अनायासें मोठेपणा कसा मिळतो हें दिसून येतें. म्हणून "महतो महीयान्" मोठ्यांत मोठा असा जो परमात्मा त्याच्यावर आपण प्रेम करूं लागलों तर आपण इतके नम्र होतों कीं, देहसुद्धां आपल्यास जड वाटूं लागतो. शेवटा

अशी स्थिति होते कीं, प्रेमानें नम्र होतां होतां आत्म्याप्रमाणेंच परमेश्वरावर प्रीति जडावी असें वाटूं लागतें–हेंच हलकट गुण म्हणजे देहबुद्धि सहज सुटणें होय. शेवटीं परमेश्वर आपला आत्मा होऊन आपण केवळ प्रेममय बनून जातों. अशा स्थितींत अभिमान कायम रहात नाहीं,हें निराळें कशाला सांगितलें पाहिजे? परमेश्वरभक्तींत आपण जसजसा प्रेम करूं लागतों तसतसे देहादि हलकट गुण सुटत जातात व प्रेम वाढत जातो. अशा रीतीनें आत्मप्रीतीसारखी परमेश्वरप्रीति होऊं लागली म्हणजे आत्मा व परमात्मा एक होतात. म्हणजे भक्तीच्या योगानें सहज ज्ञान होईल अशी स्थिति येत असते. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतातः– ओवी–" अगा प्राकृताही राया। आंगीं पडे जे धनंजया। तें दासिरूंही कीं तया। समान होय॥ मा मीं विश्वेश्वर भेटे। आणि जीवग्रंथी न सुटे। हे बोल नको ओखटे। कानीं लावूं॥" राजा उदार झाला असतां तो आपलें राज्य देतो मग मी ईश्वर भेटलों तर त्याला ईश्वर कां करणार नाहीं? तर प्रेमाच्या मार्गानें परमेश्वर होण्याची इच्छा केली असतां इतका सुलभपणा आहे. आतां दुसऱ्या मार्गानें परमेश्वरांत मिळण्याची इच्छा असली तर मी तिन्ही देहांहून निराळा असून ब्रह्मच आहें अशी भावना केली पाहिजे. म्हणजे आपल्याला परमेश्वर होतां येईल. पण त्यांत मी ब्रह्म आहें असा अभिमान मात्र कायम राहतो, आणि या मार्गांत कष्टही फार पडतात. ज्ञानानंतर भक्ति असते ही गोष्ट शंकराचार्यांनीं भाष्यांत कबूल केली नाहीं. तथापि त्यांनीं षट्पदींत असें म्हटलें आहे:—

" सत्यपि भेदापगमे नाथ तवाहं न मामकीनस्त्वम्॥
सामुद्रो हि तरंगः क्वचन समुद्रो न तारंगः॥ "

आचार्य म्हणतात:—खरोखर भेद गेला तरी देवा ! मी तुझा आहें. तूं कांहीं माझा नाहींस. पाणी एक जरी आहे तरी तरंगाचा कांहीं समुद्र नाहीं तर तरंगच समुद्राचा आहे. भक्तीवांचून असतें ज्ञान असलें तर अशा ज्ञानाचा तुकाराममहाराज निषेध करितात. ॥ अभंग ॥

**नायकावे कानीं तयाचे ते बोल ॥ भक्तीविण फोल ज्ञान सांगे॥**
**वाखाणी अद्वैत भक्तिभावेंवीण ॥ दुःख पावे शीण श्रोतावक्ता**
**अहंब्रह्म म्हणोनि पाळितसे पिंडा॥बोलों नये भांडा तयासवें॥**
**वेदबाह्य लंड बोले जो पाषांड ॥ त्याचें काळें तोंड संतांमध्यें ॥**
**तुका म्हणे खंडी देवभक्तपण ॥ वरिष्ठ त्याहून श्वपच तो ॥५**

ज्ञानी असला तरी त्याला निर्गुणभावना करावीच लागते, व निर्गुणोपासक असतात ते गुरुभक्ति तरी करितातच. एकंदरींत भक्तीशिवाय कांहीं ज्ञान शोभत नाहीं. म्हणूनच तुकाराममहाराजांनीं वरील अभंगांत वेदांत्यांना भक्तीवांचून पाखंडी म्हटलें आहे. कारण भक्तीवांचून—आंगीं प्रेम असल्यावांचून—आत्मप्राप्ति केव्हांहि होत नाहीं. पंचदशींत आनंद सांगण्याची जेव्हां वेळ आली तेव्हां आत्मप्रीतीचेंच उदाहरण घ्यावें लागलें. ह्याचें कारण हेंच आहे कीं, परमात्म्याचे सत्, चित् आणि आनंद हे तिन्ही धर्म एकमेकांपासून निराळे राहूं शकत नाहींत. तत्वानुसंधानाच्या अद्वैत कौस्तुभटीकेंत म्हटलें आहे कीं "ब्रह्माचे सच्चिदानंद धर्म हे एकरूपच आहेत. परंतु अंतःकरणाच्या ठायीं पृथकासारखे भासतात."ते कसे भासतात म्हणशील तर पाण्यावर तरंग जसें पृथक् नसून पृथकासारखे भासतात तसें. वास्तविक पाहिलें तर तरंग आणि पाणी हे दोन्हीहि पाणीच होय. ब्रह्माचे ठिकाणीं अविनाशाकारवृत्तिविशिष्ट चैतन्य असतें त्याला

सत् म्हणतात. अविनाशाकारवृत्ति म्हणजे ज्याचा बाध किंवा नाश होत नाहीं अशी वृत्ति. अगदीं सोप्या शब्दानें सांगावयाचें म्हटलें तर नुसतें आहे असें जें आपल्याला वाटतें तें सत्. ब्रह्म हें ज्ञानरूप आहे असें कळतें तेव्हां त्याला चित् म्हणतात. आणि प्रीतिरूप ब्रह्म कळणें तोच आनंद होय. सारांश, हे तिन्ही धर्म पृथक् नाहींत, म्हणून भक्तीशिवाय ज्ञान राहूच शकत नाहीं. भक्ति नसली तर ज्ञानही दुःखरूप होईल. लोकांना नेहमीं सुखाची इच्छा असते. सुखाशिवाय ते सताची किंवा चैतन्याची इच्छा करीत नाहींत. जड असून ती वस्तु सुखरूप असली तरी ती आपण घेतों. पण ज्ञान जर दुःखरूपी असलें, तर तें आपण घेत नाहीं. सुख असलें तरच आपण ज्ञान घेतों मग भक्ति म्हणजे प्रीति जर नाहीं तर तें ज्ञानही दुःखरूपच झालें. म्हणून ज्ञानी असला तरी भक्ति ही पाहिजेच. तुकाराममहाराज म्हणतात, जीव आणि परमात्मा हे निराळे आहेत इतकेंसुद्धां अंतर भक्ताला सहन होत नाहीं, इतका तो परमात्म्याशीं प्रेमानें तद्रूप होऊन जातो. खरोखर प्रेम हें असेंच कांहीं विलक्षण आहे कीं ज्याच्यावर आपण प्रेम करूं लागतों त्याशीं आपण अगदीं तद्रूप होत असतों. बापाचें मुलावर अतिशय प्रेम असलें म्हणजे तो मुलासारखें तोतरें बोलूं लागतो. जेवणाचे वेळीं बाप मुलाचे तोंडांत घास घालूं लागला म्हणजे तें पाहून मूलही हातांत घास घेऊन बापाचें अनुकरण करितो तेव्हां बापही प्रेमानें मुलासारखें वागूं लागतो. व्यवहारांत देखील अगदीं नीच-वस्तूवर आपलें प्रेम असलें तरी आपण त्या वस्तूशीं एकरूप होत असतों. समजा, कुत्र्यावर आपला प्रेम आहे तर त्या कुत्र्याबरोबर आपण खेळतों, त्याचे लाड करतों, शेवटीं त्याच्यासारखें भुंकूंसुद्धां लागतों.

सारांश, कुत्र्यासारखेंच आपण वागूं लागतो. राघूवर प्रेम करणारे त्याचेंच अनुकरण करून मिठू मिठू म्हणतात. सारांश, ज्या वस्तूवर आपली प्रीति असते, त्याच्यासारखेंच होण्याची आपण इच्छा करीत असतों. आणि शेवटीं मरतेवेळीं तेंच प्रेम दृढ असलें तर पुढल्या जन्मींहि त्याच योनींत आपल्यास जावें लागतें. जडभरताचें उदाहरण सर्वांस माहीतच आहे. हरिण-बाळावर प्रीति असल्यामुळें मरणसमयीं तेंच ध्यान दृढ होऊन तो पुढें हरणाच्या योनींत जन्मास गेला. म्हणजे जगांतल्या नीच वस्तूवर देखील प्रीति केली असतां जर प्रेमामुळें ती योनी आपल्यास प्राप्त होते तर सर्वांपेक्षां उच्च आणि अत्यंत प्रीति-पात्र असा जो परमात्मा त्याच्यावर आपण प्रेम केलें असतां त्याच्यासारखे आपण कां नाहीं होणार ? आणि तेंच प्रेम मरे-पर्यंत दृढ राहिलें तर याच जन्मीं आपण परमात्मा होऊं यांत काय नवल आहे ? असो. यालाच संस्कृतांत कैमुतिक न्याय म्हणतात. हा कैमुतिक न्याय गीतेंतही सांगितलेला आहे. तो असा:—

**मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ॥**
**स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यांति परांगतिम् ॥**
**किं पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयस्तथा ? ॥**

भगवान् म्हणतात, माझी भक्ति करून स्त्रिया, वैश्य, शूद्रा-दिक हे जर तरतात तर पुण्यकर्म करणारे ब्राह्मण माझ्या भक्तीनें तरतील यांत नवल काय ? असो. आतां कोणत्याही वस्तूवर आपलें सामान्य प्रेम असेल तर आपणास पुढचा जन्म त्या यो-नींत मिळतो हें वर सांगितलें, पण अतिशय प्रेम असेल तर ह्याच जन्मांत आपण तसे होऊं. त्याप्रमाणे सामान्य साधनानें ईश्वराची

भक्ति केली तर दुसऱ्या जन्मांत आपण ईश्वराशीं मिळून जाऊं. पण विशेष साधन केलें तर ह्याच जन्मांत आपणास परमेश्वर होतां येतें. वामनपंडित म्हणतातः—

"जरि कळे हरिची सकळात्मता ॥ तरि घडे हरिभक्ति अखंडता॥
परम आवडि आपलि आपणा ॥ वळख तूं तुज टाकुनि मीपणा॥"

यावरून भक्तीचे योगानें परमेश्वर सर्वात्मा आहे, असें जर कळलें तर मग आपला आत्मा निराळा कोठें राहिला ? तोही परमात्माच होईल. अशा रीतीनें स्वतःचा आत्माही परमात्माच झाला म्हणजे मग परब्रह्मरूप जो मोक्ष तोही अनात्माच वाटूं लागतो. कारण विशेष प्रीति आत्म्यावरच असते. ओवी ज्ञानेश्वरी—

" तैसे मज भजतां मीचि झाले ॥ "

भागवतश्लोक—" सर्वभूतेषु यः पश्येद्भगवद्भावमात्मनः ॥
भूतानि भगवत्यात्मन्येष भागवतोत्तमः ॥ "

जो ईश्वरासुद्धां सर्व भूतें आपल्यांत पाहतो व आपल्यासुद्धां सर्व भूतें ईश्वरांत पाहतो, तोच उत्तम भगवद्भक्त होय. ज्ञानेश्वर-महाराज म्हणतातः—" पूर्ण अहंता वेढलों ॥ तरी सैंघ आम्हीच दाटलों ॥ " म्हणजे भक्तीच्या दृष्टीनें सर्व भगवंतच आहे. भक्त जे असतात त्यांना प्रारब्धाचीही भीति नसते. भक्तिरहित जे ज्ञानी असतात ते विवेकदशेंत आत्मस्थितींत राहतात. परंतु व्युत्थान झाल्यावर म्हणजे वृत्तीवर येतात तेव्हां मात्र त्यांना प्रारब्ध भोगावें लागतें. भक्ताची गोष्ट तशी नाहीं. ते ज्ञानदशेंत तर परमेश्वराशीं मिळून जातातच, पण वृत्तीवर आले म्हणजेही परमात्माच त्यांचा सांभाळ करितो. शरभंगऋषीला महाकुष्ट होता. ज्ञानदशेंत त्यांना दुःख होत नसे. पण ते देहावर म्हणजे वृत्तीवर जेव्हां येत तेव्हां त्यांना दुःख होत असे. आतां गोपाळ व गोपिका यांची गोष्ट घ्या. त्यांची स्थिति

निराळीच होती. विवेकदर्शेत तर ते पूर्ण ब्रह्मज्ञानी असतच. परंतु भूमीवर आले म्हणजेही परमेश्वराशींच खेळत. प्रारब्धाची भीति त्यांना मुळींच नव्हती. गीतेंत भगवान् म्हणतातः—

" मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयंतः परस्परम् ॥
कथयंतश्च मां नित्यं तुष्यंति च रमंति च ॥ १ ॥

मच्चित्ताः म्हणजे जे माझें ध्यान करीत असतात—मद्गतप्राणाः म्हणजे मी चित्तांत आहें तरच ज्यांचे प्राण आहेत. बोधयंतः परस्परम्—म्हणजे मी त्यांना कसा भिळेन ? या विषयावरच त्यांची गुरु-शिष्यभावानें अगर मित्रभावानें एकमेकांत चर्चा चाललेली असते—" कथयंतश्च मां नित्यम् " माझ्याच गुणानुवादाच्या कथा जे गात असतात—तुष्यंति—त्यांतच ज्यांना आनंद वाटत असतो; आणि रमंति च—त्यांत ज्यांचें मन इतकें तल्लीन होऊन जातें कीं, इतर गोष्टींत त्यांना आनंदच वाटत नाहीं. भगवान् म्हणतातः—

तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् ॥
ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयांति ते ॥

असे जे सतत भक्तिपूर्वक अंतःकरणानें मला भजणारे असतील त्यांना मी असा ज्ञानयोग देतों कीं, त्याच्यायोगानें ते मला येऊन मिळतात. पुढें दिलेल्या ओवींत ज्ञानेश्वरमहाराजांनीं भक्ताचें लक्षण केलें आहे. ओवी ज्ञानेश्वरी. " जयांची जाणती मजचि शास्त्रें ॥ मी जोडें जयांचेनि मंत्रें ॥ ऐसे जे चेष्टामात्रें ॥ भजले मज ॥" आणखी पुढें सांगतातः—" जे अहंकार वाहती आंगीं ॥ आम्ही हरीचे भूषावया लागीं ॥ जे लोभिये एकाचि जगीं ॥ माझेनि लोभें ॥ १ ॥" आम्ही हरीचे आहोंत अशा भूषणाचाच ते अहंकार बाळगत असतात व असा अभिमानच त्यांना जास्त शोभतो. कारण कुळवंताला कुळाचा अभिमान असणेंच भूषण आहे. असे

भक्त परमेश्वराच्या सुखानेंच सुखरूप झालेले असतात. याप्रमाणें जे सर्वस्वीं परमेश्वरांत मिळून गेले आहेत त्यांना भक्तीच्या योगानें स्वरूपसाक्षात्कार होतो. म्हणजे परमेश्वर जसा शुद्ध आहे तसा मीही प्रकृतीचा साक्षी असून शुद्धच आहें असें ज्ञान होतें. गीतेंत भगवान् म्हणतात:—

" इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः ।
सर्गेऽपि नोपजायंते प्रलये न व्यथंति च ॥ १ ॥

ह्या ज्ञानाचा आश्रय करून जे माझ्या साधर्म्याला आलेले असतात म्हणजे मी जसा शुद्ध आहें तसे जे शुद्ध झालेले असतात ते सृष्टिकालीं उत्पन्न होत नाहींत किंवा प्रलयांत दुःख पावत नाहींत. याप्रमाणें स्वरूपसाक्षात्कार हें भक्तीचें मुख्य फल असून विघ्न दूर होणें हें गौण फल आहे हें तुला सांगितलें. सुख हेंच प्रीतीचें लक्षण असल्यामुळें स्वरूपसाक्षात्कार झाल्यावर भक्ति राहते. कारण सुख किंवा प्रीति ही आपणाला केव्हांच सोडवत नाहीं. परंतु प्रीति म्हणजे विषयप्रीति मात्र नव्हे. विषयप्रीतीला राग म्हणतात. आणि निर्विषय प्रीति म्हणजे भक्ति. परमात्म्याला विषय अर्पण करणें म्हणजेच राग दूर करणें होय.

शिष्य—नुसतें ज्ञान असलें आणि भक्ति नसली तर त्या ज्ञानांत अहंकार स्फुरत असतो ह्याचें कारण काय ?

गुरु—आंगीं मीपणा असेल तर तेथें प्रीति कमी असते. तो मीपणा निघून गेला म्हणजे प्रीति अखंड राहते. येथें युक्तीचें प्राधान्य विशेष चालत नाहीं. आपली बुद्धि स्थिर असली म्हणजे आपण आनंदांत असतों, पण मी सुखी आहें अशी वृत्ति उठली कीं आनंद कमी होतो. पोथी वाचत असतां अगर ऐकत असतां भगवद्गुणवर्णन किंवा संतांच्या चरित्रकथा ऐकून डोळ्याला

अश्रु येतात, अंगावर रोमांच उठतात—आणि कंठ सद्गदित होतो. अशा वेळीं आपण अतिशय आनंदांत असतों, परंतु मला असें होत आहे ही वृत्ति उठली कीं, तो आनंद पहिल्याप्रमाणें राहत नाहीं, कमी होतो. तसेंच कोणी शोक करून रडत असला तर रडत आहे तोंपर्यंत त्याचें दुःख कायम असतें, परंतु ज्याविषयीं तो शोक करीत आहे त्याचे गुण वर्णन करून बोलूं लागला म्हणजे दुःख कमी होऊन रडणें बंद होतें. सारांश, मीपण स्फुरलें म्हणजे प्रेम कमी होत असतो. याप्रमाणें भक्ति नसली आणि नुसतें ज्ञानच असलें तर अशा ज्ञानांत मीपणा स्फुरत असतो, तो शुद्ध आनंदांत स्फुरत नाहीं, आणि शुद्ध आनंद भक्तिवांचून मिळत नाहीं. भक्त असतो तो केवळ प्रेममयच होऊन राहतो. आनंदाशिवाय त्याला कांहींच दिसत नाहीं. "आनंदाचे डोहीं आनंद तरंग ॥ आनंदाचि अंग आनंदाचें ॥" असें तुकारामहाराजांनीं त्याचें वर्णन केलें आहे. ह्मणून स्वरूपसाक्षात्कार हेंच भक्तीचें मुख्य फल आहे. भगवान् नारद भक्तिसूत्रांत असेंच म्हणतातः—"स्वयं फलरूपत्वात्" म्हणजे भक्तीचें फळ भक्तिच आहे. स्वामी विवेकानंद म्हणतातः—"भक्तीचा तरु भक्तींतच सांठविला जातो." भक्तीनें स्वरूपसाक्षात्कार होऊन परमेश्वरप्रीतींतच त्याचा समावेश होतो. हीच भक्ताची पूर्ण समाधि होय. ह्या स्थितींत तो केवळ प्रेममयच होऊन राहतो हें वर सांगितलेंच आहे. ह्या समाधींतून भक्ताचें व्युत्थान कधींही होत नाहीं. समाधींतून व्युत्थान दोन कारणांनीं होतें. एक स्वेच्छेनें म्हणजे आपल्या इच्छेनें आणि दुसरें परेच्छेनें किंवा दुसऱ्याच्या इच्छेनें. आणखी कोणाच्याच इच्छेनें व्युत्थान न होणें हा एक तिसरा प्रकार आहे. भक्तांचें समाधींतून व्युत्थान कधींच होत नाहीं, हें वर सांगितलेंच आहे. विघ्नें नाश पावणें

हें भक्तीचें गौण फळ आहे; याचा व्यभिचार दिसतो. परंतु स्वरूपसाक्षात्कार हें भक्तीचें मुख्य फळ असल्यामुळें त्याचा व्यभिचार दिसत नाहीं; याचें कारण असें कीं, प्रेमामुळें भक्ताला दुःख भासत नाहीं. म्हणून तो त्याची पर्वा करीत नाहीं. तुकाराममहाराजांना हींवज्वर लागला होता. माधवदासाला अतिसार झाला होता, तेव्हां देवानें त्यांचीं वस्त्रें धुतलीं. परंतु विघ्न आलें असतां तें दूर होण्याकरितां जे भक्त ईश्वराची प्रार्थना करितात त्यांच्याकरतां धांवत जाऊन त्यांना तो संकटांतून मुक्त करितो. याचीं अनेक उदाहरणें पुराणांत आहेत. गजेंद्राचें उदाहरण सर्वांस माहीतच आहे. देवनाथमहाराज म्हणतात:—"गजेंद्र नक्रें आकळितां तैं आळविलें तूज ॥ चक्र फेंकुनी नक्र मर्दिला सोडविला गज ॥" गजेंद्रानें भगवंताला आळविल्याबरोबर देवानें त्यास नक्रापासून सोडविलें, पण नुसत्या आनंदांतच निमग्न होऊन देहाचीही ज्यांना शुद्धि रहात नाहीं असे जे भक्त आहेत त्यांना विघ्नाची तरी काय परवा असणार ? असे भक्त विघ्न आलें तरी देवाला दुःख देऊं इच्छित नाहींत. व परमेश्वर त्यांना दुःखही होऊं देत नाहीं. अशा भक्तांना वास्तविक विघ्नांची बाधाच होत नसते, परंतु विघ्नें जीं त्यांना आलेलीं दिसतात **तीं केवळ सिद्ध स्थितींत धैर्य पाहण्याकरितां येत असतात.** साधुपुरुष अग्नींत बसला तरी त्याला अग्नीची बाधा होत नाहीं परंतु पाहाणारास तो सामान्य मनुष्यापेक्षां जास्त सामर्थ्यवान वाटतो. साधकाला मात्र साधकदशेंत परमेश्वर विघ्नें येऊं देत नाहीं. आणि आलीं तर त्यांचें निवारण करितो. बालपणांत जशी आई मुलाच्या जेवणाखाणाची अतिशय काळजी घेते आणि त्याचें मळमूत्रसुद्धां काढून त्याचें संगोपन करिते त्याप्रमाणें साधकदशेंत परमात्मा भक्ताला विघ्नें येऊं

देत नाहीं. व आलीं तर तीं स्वत: दूर करून अनेक प्रकारानें त्याची पाठ राखतो. मुलगा मोठा झाल्यावर त्याला आई नुसतें जेवू घालून सोडून देते, त्याप्रमाणें भक्तालाही सिद्धदशेंत नुसता साक्षात्कारच होतो. योगांत एकाग्रतेनें विघ्नें दूर होतात खरीं, पण एकाग्रता थोडी चुकली तर विघ्नें पुन्हां येतात. परमेश्वरभक्तीची गोष्ट तशी नाहीं. भक्तींत विघ्नांचें पुनरुत्थान होत नाहीं, व भक्ति करीत असतां चुकी झाली तरी ईश्वर त्याला क्षमा करितो. असो. याप्रमाणें—" प्रत्यक्चेतनाधिगम " म्हणजे स्वरूपसाक्षात्कार यांचें निरूपण झालें. येथें स्वरूपसाक्षात्कार वेदांताच्या रीतीनें म्हणजे ईश्वर जसा शुद्ध आहे तसा मीही शुद्ध आहें अशा रीतीनें सांगितला. निदान या ठिकाणीं तरी भाष्यकाराच्या दृष्टीनें योग व वेदांत दोन नाहींत असें म्हणण्यास हरकत नाहीं.

वरील निरूपणांत प्रत्यक्चेतनाधिगम आणि अंतरायाभाव हीं प्रणिधानाचीं दोन फलें सांगून प्रत्यक्चेतनाधिगम म्हणजे स्वरूपसाक्षात्कार हें मुख्य फल आणि अंतरायाभाव हें गौण फल दाखविलें. ईश्वरप्रकरण वास्तविक येथें संपलें. आतां त्याच्या पुढचीं जीं चार सूत्रें आहेत तीं ह्याच ईश्वरप्रकरणांत घ्यावींत किंवा न घ्यावींत हा वाद आहे. कारण कांहीं टीकाकारांनीं तीं घेतलीं आहेत व कांहींनीं घेतलीं नाहींत. तथापि पुढच्या दोन सूत्रांत अंतराय म्हणजे विघ्नें यांचीं नांवें सांगितलीं आहेत व तीं विघ्नें ईश्वराच्या कृपेनें नाहींशीं होतात म्हणून तीं दोन सूत्रें या ईश्वरप्रकरणांतच घेतलीं पाहिजेत. त्याच्या पुढल्या दोन सूत्रांत तीं विघ्नें दूर होण्याचे अन्य उपाय सांगितले आहेत. म्हणून ते ईश्वरप्रकरणांत

घेण्याचा किंवा न घेण्याचा निश्चय झाला नाहीं. तथापि ते याच प्रकरणांत घेऊं.

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजकी जय ॥

---

# श्री ज्ञानराज माउली.

२५–१०–१९०७.

" व्याधिस्त्यानसंशयप्रमादालस्याविरतिभ्रांतिदर्शनालब्धभूमिकत्वानवस्थितत्वानि चित्तविक्षेपास्तेऽन्तरायाः " ॥ ३० ॥ " दुःखदौर्मनस्याङ्गमेजयत्वश्वासप्रश्वासाविक्षेपसहभुवः " ॥ ३१ ॥

जो प्रत्यक्ष शेषाचा अवतार असून वैद्यकांत ज्यानें चरकग्रंथ केला आणि शरीराची शुद्धि करण्याचा उपाय लोकांस दाखविला, व्याकरणावर महाभाष्य करून ज्यानें वाचेचे दोष नाहींसे केले, आणि योगावर सूत्रें करून ज्यानें मनाचे दोष दूर केले, तो जीवांना परम सुख देणारा भगवान् पतंजली आमचें रक्षण करो. याप्रमाणें मंगल करून श्रीगुरु पुढें सांगतातः—

**गुरु०**—स्वरूपसाक्षात्कार हें भक्तीचें मुख्य फल असून विघ्ननिवारण होणें हें गौण फल आहे हें मागें तुला सांगितलें. यालाच योगाच्या भाषेंत प्रत्यक्चेतनाधिगम आणि अंतरायाभाव असें म्हणतात. प्रत्यक्चेतनाधिगम म्हणजे अंतःस्वरूपाचें ज्ञान, हेंही तुला काल सांगितलें.

**शिष्यः**—महाराज, वरील शब्दांत प्रत्यक्चेतन आणि अधिगम अशीं दोन पदें आहेत, यावरून प्रत्यक्चेतन म्हणजे ईश्वर हा जसा अर्थ निघतो तसा बाह्यचेतन म्हणजे ईश्वराहून निराळा दुसरा कोणी असावा असें मला वाटतें.

**गुरु**—होय, हेंच मी तुला आज सांगणार आहें. प्रत्यक्चेतन जसा ईश्वर आहे तसाच बाह्यचेतन जीव आहे. यालाच पराक्चेतन म्हणतात. जीव हा बाह्यचेतन किंवा पराक्चेतन असल्यामुळें ( पराक् = बाहेर ) हाच सर्व सुखदुःख भोगणारा आहे.

**शिष्य**—यावरून प्रत्यक्चैतन्य आणि पराक्चैतन्य किंवा अंतर्चैतन्य आणि बाह्यचैतन्य असें दोन प्रकारचें चैतन्य झालें. चैतन्याचे असे दोन भाग करण्यापेक्षां एकच चैतन्य हें सर्वव्यापक आहे असें मानणें बावगें होईल काय ?

**गुरु**—एक चैतन्यच सर्वव्यापक आहे असें बोलून दाखविणें सोपें आहे. पण तेंच छातीवर कसें बसतें हें तुला माहीत नाहीं. अरे, ज्ञानी जे आहेत त्यांना या दोहींचेंही ज्ञान असावें लागतें. " क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं एतज्ज्ञानं मतं मम " ॥ भगवान् गीतेंत म्हणतातः—क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांचें ज्ञान असणें तेंच खरें ज्ञान होय. हें क्षेत्र–क्षेत्रज्ञ ज्ञान आणि प्रत्यक्चैतन्य व पराक्चैतन्य ज्ञान एकच होय. हें जीवेश्वरांचें ऐक्य समाधीनेंच होतें. पण जोंपर्यंत समाधिस्थ होऊन ईश्वरांत मिळत नाहीं तोंपर्यंत जीव आणि ईश्वर हें द्वैत कायम राहतें. ईश्वरांत मिळाला म्हणजे द्वैत गेलें व ईश्वरांत मिळण्याकरितां अगोदर जीवाचें ज्ञान झालें पाहिजे. कारण जीवपणा कसा आला व कां आला ? व प्रत्यक्चेतन म्हणजे ईश्वराचें ज्ञान आपल्यास होत नाहीं तें कां होत नाहीं ? आपण कोठें चुकतों ? ह्या गोष्टी आपणास कळणें अ-

वश्य आहे. ह्या गोष्टी समजण्याकरितांच क्षेत्रक्षेत्रज्ञविभाग ज्ञानाला देवांनीं महत्त्व दिलें आहे. हा क्षेत्रक्षेत्रज्ञविभाग किंवा वेदांताच्या भाषेंत माया आणि ब्रह्म याविषयींचा विचार देवानें अर्जुनाला गीतेंत सुंदर रीतीनें सांगितला आहे. भगवान् म्हणतातः—" इदं शरीरं कौंतेय क्षेत्रमित्यभिधीयते ॥ एतद्यो वेत्ति तं प्राहुः क्षेत्रज्ञ इति तद्विदः ॥ " येथें देवानें " कौंतेय " असें जें अर्जुनाला संबोधन दिलें त्यावरून मातेची उत्तमता दाखविली. या म्हणण्यांत एक खुबी आहे, ती सांगतों. त्याच्या योगानें मनाचें सामर्थ्य किती मोठें आहे हें तुला कळून येईल. आपण मन जेव्हां एकाग्र करितों तेव्हां त्यांत कांहीं कामना असली तर ती आपल्या भावनेनें एकाग्रतेनें पूर्ण होते. व कामना नसली तर तें मन ईश्वररूप होतें.मनाच्या एकाग्रतेंत भावनेनें जें फळ मिळतें, त्याला मंत्र वगैरे भावना दृढ करण्याकरितां निमित्त आहेत. अशा प्रकारच्या मंत्रसिद्धि जन्मसिद्धि वगैरे कैवल्यपदांत सांगतील.मंत्रांचें फळ आपल्या भावनेनेंच होतें असें विज्ञानभिक्षूही म्हणतात. पांडवांविषयीं विचार केला तर, ते पंडूच्या वीर्यापासून झाले नाहींत, तर कुंतीनें दुर्वास ऋषीनें दिलेल्या मंत्रांच्या योगानें देवांना बोलावून त्यांच्या वीर्यापासून पांडव हे कुंतीला झाले हें जें म्हणणें आहे तें मला बरोबर दिसत नाहीं. याचा वास्तविक अर्थ असा आहे कीं, मंत्रांच्या योगानें कुंतीचें चित्त एकाग्र होऊन तें चित्तच देवतारूप झालें. म्हणजे स्त्री ही कुंतीच व पुरुषही कुंतीच झाली. अशा रीतीनें पांडवांची उत्पत्ति मानली असतां त्यांना कुंतीचे पुत्र म्हणण्यांत केवढें बरें भूषण आहे ? आणि देवानें अर्जुनाला वरील श्लोकांत कौंतेय असें जें संबोधन दिलें त्यांतली तरी खुबी हीच असावी. दुसरें, पांडवांची उत्पत्ति व्यभिचारापासून झाली, असा त्यांच्यावर येणारा कलंकही अशा

रीतीनें नाहींसा होतो. नाहीं तर आपण आपल्या आईलाच व्यभिचारिणी म्हटल्यासारखें होणार आहे. म्हणून पांडव हे देवतांचे अगर पंडूचे पुत्र नसून कुंतीचेच होते असा सरळ अर्थ करणें मला बरें वाटतें. पण यावरून देवता वगैरे कांहीं नाहींत असा मात्र तूं आपला समज करून घेऊं नकोस. देवता वगैरे सर्व आहेतच. आपणच जेव्हां आपल्या आत्म्याला निराळ्या रूपानें पाहतों, तेव्हां तो देवतारूप बनतो. त्याला स्वप्नाचा दृष्टांत घेऊं. स्वप्न हें आपणच आपल्या मनानें रचतों. व त्यांतील अलौकिक प्रकार पाहून आपणच चकित होतों. आपल्या मनाचें सामर्थ्य खरोखर फार मोठें आहे. तें इतकें मोठें आहे कीं, भिक्षुगीतांत मनालाच देवांचा देव " भीष्मो हि देवः सहसः सहीयान् " असें म्हटलें आहे. परंतु आपण मनाचें हें सामर्थ्य ओळखीत नसून अज्ञानानें त्याला निराळें ठेवतों. व आपण आपल्याकडे कर्मीपणा घेऊन शरीराला चिकटतों. असें झालें म्हणजे तें मनच देवतारूपानें परिणाम पावतें. आपण शरीरापुरतें अल्पज्ञ झालों, म्हणजे सर्वव्यापक चैतन्य असें जें ब्रह्म तें सर्वज्ञ ईश्वर होतें. आपणही मूळचे सर्वज्ञ ईश्वरच आहोंत. पण शरीरापुरताच आपण न्यूनपणा घेऊन अल्पज्ञ झालों म्हणजे सर्वज्ञ ईश्वर आपणाहून निराळा मानावा लागतो. ह्याला उदाहरण आकाशाचेंच. आकाश हें सर्वव्यापक असतां आपण आपल्या उपयोगाकरितां त्याला घटांत घेतों. तेव्हां तें आकाश घटापुरतेंच असतें. मग आपणच घटाच्या आंतलें घटाकाश व बाहेरचें सर्व महदाकाश असा त्यांत भेद करितों. म्हणजे घटाच्या उपाधीमुळेंच तुम्ही आकाशाला घटांत येणें व घट फोडल्यावर महदाकाशांत मिळणें हे आरोप लागू केले. वास्तविक आकाशाला येणें जाणें, कमीजास्त होणें, या गोष्टी मुळींच नाहींत. घट असो अगर नसो,

आकाश जसें असतें तसेंच असतें. त्यांत कमीजास्त कांहींच होत नाहीं. हीच गोष्ट आपण परमात्म्याला लावूं. जीव हा निराळा राहो किंवा परमेश्वरांत मिळून जावो, परमेश्वराच्या रूपांत कांहीं कमीजास्त होत नाहीं. तो जसाचा तसाच असतो. ह्यावरून उत्पत्ति आणि नाश हे जीवाला आहेत व ते अविद्येनें कल्पित आहेत, म्हणून आपण जेव्हां आपल्याला शरीरापुरतेंच समजतों तेव्हां देवता आपणास निराळ्या भासतात. तशाच त्या कुंतीलाही भासल्या. अशा रीतीनें मी तुला कौंतेय या संबोधनांतली खुबी सांगितली. आतां श्लोकार्थ सांगतों:—भगवान् म्हणतात, हे अर्जुना, जगांतल्या सगळ्या समष्टि शरीरांना क्षेत्र ह्मणतात व त्या क्षेत्रांना जाणणारा तो क्षेत्रज्ञ होय असें ईश्वराला जाणणारे वेदांती ह्मणतात. या श्लोकांत क्षेत्र ह्मणजे एकच शरीर घ्यावयाचें नाहीं, तर समष्टि शरीर घ्यावयाचें. तत् हें ईश्वराला अनुलक्षून आहे. तद्विदः ह्मणजे ईश्वराला जाणणारे वेदांती. देव ह्मणतात वेदांतीच हें म्हणतात असें नाहीं तर त्याला माझीही संमति आहे. श्लोक—" क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत ॥ क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम ॥ " भारत या संबोधनावरून तुझें वीर्य व कुल उत्तम आहे असें सुचविलें. देव म्हणतात, सर्व शरीरांचे ठिकाणीं जो क्षेत्रज्ञ आहे तो मीच आहें असें समज. क्षेत्र हें काय आहे आणि क्षेत्रज्ञ काय आहे हें समजणें हेंच खरें ज्ञान होय, असें माझेंही मत आहे. येथें क्षेत्र म्हणजे रक्तमांसाचें स्थूल शरीरच घ्यावयाचें नाहीं. तर चैतन्य आत्मा सोडून जितका जडवर्ग आहे तो सर्व क्षेत्र समजावा. मन, बुद्धि. दहा इंद्रियें, व पंचप्राण हे १७ मिळून लिंगशरीर होतें. व स्थूलशरीर पडल्यावरही हें लिंगशरीर कायम राहतें. म्हणून स्थूलशरीराला क्षेत्र म्हटलें तर या लिंगशरीराला

क्षेत्रज्ञ म्हणावें लागल.. एवढ्याकरितां हें सगळें समष्टि जग याला क्षेत्र असें म्हणावें. या क्षेत्रालाच सांख्य हे प्रकृति म्हणतात व वेदांती माया म्हणतात. व क्षेत्रज्ञ जो परमात्मा त्याला ब्रह्म किंवा ईश्वर म्हणतात. या क्षेत्रालाच ज्ञानेश्वरमहाराजांनीं प्रकृति असें म्हटलें आहे:—
पैं क्षेत्र येणें नांवें । जें सांगितलें आघवें । तेंचि एथ जाणावें । प्रकृति हे गा ॥ आणि क्षेत्रज्ञ ऐसें । जयातें म्हणितलें असे । तो पुरुष हें अनारिसें । न बोलों घेई ॥ इये आनानें नांवें । परि निरूप्य आन नोहे । हें लक्षण न चुकावें । पुडत पुडती ॥ तरी केवळ हे सत्ता । तो पुरुष गा पांडुसुता । प्रकृतीतें समस्तां । क्रिया नाम ॥ बुद्धि इंद्रियें अंतःकरण । इत्यादि विकारभरण । आणि ते तिन्ही गुण । सत्वादिक ॥ हा आघवाचि मेळावा । प्रकृति जाहला जाणावा । हेचि हेतु संभवा । कर्माचिया ॥ याप्रमाणें सामान्य दृष्टीनें क्षेत्राचें वर्णन झालें. आतां क्षेत्रांत कोणकोणते पदार्थ येतात ते सांगतात:—

" महाभूतान्यहंकारो बुद्धिरव्यक्तमेव च ॥ इंद्रियाणि दशैकं च पंच चेंद्रियगोचराः ॥ इच्छा द्वेषः सुखं दुःखं संघातश्चेतना धृतिः॥ एतत्क्षेत्रं समासेन सविकारमुदाहृतम् ॥ " स्थूलशरीराला क्षेत्र म्हटलें तर त्यांत इतके पदार्थ येत नाहींत. क्षेत्र म्हणजे, एक आत्मा वर्ज्य करून जेवढें ब्रह्मांडाला कारण व कार्य पदार्थ असतील ते सगळे क्षेत्र. अशा ३१ पदार्थांचा समावेश क्षेत्रांत होतो. ते पदार्थ हे :—महाभूतानि=पृथिव्यादि महाभूतें ५, अहंकार, बुद्धि म्हणजे निश्चय, अव्यक्त (=अज्ञान, प्रकृति ), दहा इंद्रियें, एक मन, पंचचेंद्रियगोचराः (पंच तन्मात्रा), इच्छा,द्वेष,सुख,दुःख, संघात, चेतना आणि धृति इतके मिळून ३१ झाले. भगवान् म्हणतात, हें क्षेत्र सविकार आहे; सविकार म्हणजे नेहमीं रूपांतर

होत जाणारें, म्हणून अनित्य असें आहे. वर जे निरनिराळे ३१ पदार्थ सांगितले ते मुलांना खडे मांडून समजाविण्यासारखे बालबोधार्थ सांगितले.

आतां सांख्य दृष्टीनें हेच पदार्थ पंचवीस करितां येतात, ते असे:—द्वेष हा इच्छेचाच परिणाम असल्यामुळें इच्छेंत त्याचा अंतर्भाव होतो. व इच्छा ही सुखाच्या मागें जाणारी असल्यामुळें सुखदु:ख हे इच्छेचेच परिणाम झाले. आतां धैर्य हें निश्चयाचे योगानेंच येतें, म्हणून बुद्धींत त्याचा अंतर्भाव करितां येतो. आणखी संघाताचाही अंतर्भाव बुद्धींतच होतो. म्हणून इच्छा, द्वेष, सुख, दु:ख, संघात आणि धृति हे सहा मनांत किंवा बुद्धींत येतात. अशा रीतीनें हे इच्छा, द्वेष वगैरे ६ पदार्थ वरच्या ३१ सांतून गेले म्हणजे २५ राहिले. त्यांतून चेतना निराळी काढली तर सांख्याचे २४ तत्व झाले. आतां चेतना जी राहिली तिचा मात्र अंतर्भाव कशांतच होत नाहीं;ती स्वतंत्र राहते. चेतना म्हणजे जाणीव. मनांत राग आला, भूक लागली, हें सर्व मनाचें ज्ञान चेतनेला होतें. हिचाही समावेश क्षेत्रांतच होत असून सांख्यांचा पुरुष हीच होय. असे हे सांख्यांचे २५ तत्व झाले. सांख्यसूत्र अ० १ सूत्र ६१ यांतही असेंच सांगितलें आहे. " सत्वरजस्तमसां साम्यावस्था प्रकृतिः । प्रकृतेर्महान्महतोऽहंकारोऽहंकारात्पंचतन्मात्राण्युभयमिंद्रियं । तन्मात्रेभ्यः स्थूलभूतानि पुरुष इति पंचविंशतिर्गणः ॥ ६१ ॥ म्हणजे सत्व, रज, आणि तम या तीन गुणांची साम्यावस्था ती प्रकृति–प्रकृतीपासून बुद्धि बुद्धीपासून अहंकार, त्यापासून पंचतन्मात्रा, त्यांच्यापासून पंच महाभूतें, पंचकर्मेंद्रियें व पंचज्ञानेंद्रियें आणि मन असे चोवीस आणि पंचविसावा पुरुष.

असा हा २५ तत्त्वांचा गण झाला. यांत २५ वा जो पुरुष सांगितला आहे तो आणि क्षेत्रांतील चेतना हीं एकच होत. आतां योगसूत्रांतही हे २५ तत्त्व घेऊन २६ वा ईश्वर सांगितला आहे. तोच गीतेंतील क्षेत्रज्ञ होय. याप्रमाणें पराक्चेतन व प्रत्यक्चेतन म्हणजे काय हें योग, सांख्य आणि वेदांत अशा तिन्ही रीतींनीं सांगितलें. आतां युक्ति आणि अनुभव यांच्या रीतीनें सांगतों:—

क्षेत्रांतली चेतना म्हणजे आपली जाणीव जी वर सांगितली ती कांहीं क्षेत्राला जाणूं शकत नाहीं, म्हणून ती क्षेत्रज्ञ नव्हे. परमामृतांत सांगितलेल्या युक्तीच्या रीतीनें ही चेतना मनाच्या पलीकडे आहे, असें आपण जाणतों. मनाच्या वृत्ति क्रोध, शांति वगैरे त्या जाणीवेला म्हणजे क्षेत्रस्थ चेतनेला समजतात. पण आपल्या शरीरांत रक्त कसें खेळत आहे, झोंप आपल्यास केव्हां लागते व कशी लागते, पुन्हां जे आपण उठतों ते कसे उठतों, ह्या गोष्टी मात्र तिला समजत नाहींत. ह्यावरून ती सर्वज्ञ नाहीं, असें ठरतें. कारण ती सर्वज्ञ असती तर तिला ह्या सर्व गोष्टी समजल्या असत्या. ह्यावरून क्षेत्रस्थ चेतन व क्षेत्रज्ञ चेतन असे दोन भेद ठरतात. असें आहे तरी जीवाचें ज्ञान हें श्रेष्ठ नाहीं असें नाहीं. कारण औषधी ही अमृतापेक्षां श्रेष्ठ नसली तरी ती इतर कुपथ्य पदार्थ खाण्यापेक्षां श्रेष्ठच आहे. तसें जीवाचें ज्ञान हें तर श्रेष्ठ आहेच पण ईश्वराचें ज्ञान त्याहूनही श्रेष्ठ आहे. ह्याचें कारण तुला सांगितलें-च आहे कीं, जीव हा पराक्चेतन आहे आणि परमात्मा प्रत्यक्चेतन आहे. बाहेरचें ज्ञान होणें हें अहंज्ञान होय. अहंज्ञान आणि जीवाचें ज्ञान हें एकच. यालाच त्वंपदाचें ज्ञान म्हणतात. व ईश्वराचें ज्ञान होणें तें ब्रह्मज्ञान किंवा तत्पदाचें ज्ञान होय.

**शिष्य**—महाराज, जीव हा पराक्चेतन असल्यामुळें त्याला विषयांत जो आनंद मिळतो तो दुसऱ्या कोठून तरी आला पाहिजे. कारण ईश्वराचें ज्ञान झाल्याशिवाय ईश्वराचा आनंद मिळणें त्याला शक्य नाहीं.

**गुरु**—ह्याचें निराकरण मागेंच झालें. तथापि पुन्हां तूं प्रश्न करितोस त्याअर्थी माझें मागील म्हणणेंच खरें ठरलें. प्रथमारंभीं मी ह्मणालों कीं, सर्व चैतन्य एकच आहे असें म्हणणें सोपें आहे; पण तेंच छातीवर बसतें, त्याचा आतां तुला अनुभव आला. विषयांत आनंद आहे असें मानलें तर झोंपेंत विषय नसतां जो आनंद होतो तो कोठून येतो ? झोंपेंतून आपण उठतों तेव्हां मन अगदीं स्वस्थ असतांना, किंवा चित्त एकाग्र केलें असतां आपणांस जो आनंद होतो तो कोठून येतो ? तर वास्तविक आनंद हा ईश्वरापासूनच येतो, मग तो विषयांत मिळो किंवा निर्विषय स्थितींत मिळो. पण मजा ही आहे कीं, नुसत्या अहं-ज्ञानानें किंवा जीवाच्या ज्ञानानें अभिमान होतो, त्यामुळें खरी गोष्ट समजत नाहीं. झोंपेंतून जागे होतांना, चित्त स्वस्थ असतांना किंवा एकाग्रतेंत असतांना क्षेत्रस्थ चेतना ही क्षेत्रज्ञ चेतनेंत मिळून जाते म्हणून त्या त्या वेळीं मिळणारा आनंद हा ईश्वरांतूनच येत असतो. ही गोष्ट जीव पूर्णपणें ईश्वरांत मिळाल्याशिवाय समजत नाहीं. जीवाचें ज्ञान व ईश्वराचें ज्ञान एकत्र मिळालें ह्मणजे " अहं ब्रह्मास्मि " असा अनुभव येऊन अभिमान समूळ नाहींसा होतो, व मग त्याला कोणताच संशय राहात नाहीं. पराक्चेतनेचें किंवा जीवाचें ज्ञान श्रुति, युक्ति, आणि अनुभव यांच्या योगानें कितीही झालें तरी विषयाकडे मन धांवतेंच. त्याला प्रत्यक्चेतनेचें ज्ञान होणें हाच एक उपाय आहे,

व तें प्रत्यक्‌चेतनेचें ज्ञान एकाग्रतेनें होतें. पण त्यापेक्षां सगुण भक्ति करावी. मनाची स्वाभाविक प्रवृत्ति विषयाचें ध्यान करण्याकडे असतेच. तेच विषय खोटें आहेत असें जर त्याला कळेल तर विषय त्याला आपोआपच तुच्छ वाटतील. खोटी गोष्ट तुच्छ झाली म्हणजे सत्यावर प्रीति बसण्याला वेळ लागत नाहीं. ही गोष्ट सगुणध्यानानें सहज होऊं शकते. सोन्यावर आपली अगोदरच आवडी असते व अलंकार सोन्याचेच आहेत असें समजलें तर त्या अलंकारावर आपली जास्त प्रीति बसते; पण तेच अलंकार खोट्या सोन्याचे आहेत असें समजलें तर आपण मोडून टाकतों. त्याप्रमाणें विषय हे मिथ्या असून खरा आनंद देण्याला ते मुळींच समर्थ नाहींत असें एकदां मनाला कळलें कीं, त्याला ते विषय तुच्छ वाटूं लागतात. आणि मग त्या मनाचें विषयाचें ध्यान सुटून आपोआपच भगवंताच्या सुंदर सगुण मूर्तीला तें चिकटूं लागतें, व नंतर ज्या देहाच्या सुखाकरितां तें पूर्वीं विषयाच्या मागें धांवत होतें तो देहही त्याला तुच्छ वाटूं लागतो; असें होतां होतां मन सगुणमूर्तीचे ध्यानांत निमग्न होऊं लागलें ह्मणजे देह आणि विषय भगवंताला सहजच अर्पण होतात. अशा रीतीनें "ध्यानीं ध्यातां पंढरीराया ॥ मनासहित पालटे काया ॥" असा परिणाम झाला म्हणजे पूर्वींचा पराक्‌चेतन जीव प्रत्यक्‌चेतन होऊं लागतो. ह्मणून जीवाला मिथ्या ठरवून ईश्वरावर प्रीति उत्पन्न करण्याचा व शेवटीं ईश्वरांतच मिळवून देण्याचा ज्ञानाचा स्वभावच आहे. "इयं ज्ञानकला राम सकृज्जाताभिवर्धते" । योगवासिष्ठ. ज्ञानानें भक्तिच सिद्ध होत असते. ज्ञानास भक्ति नको असें जे म्हणणारे आहेत ते मूर्ख होत. त्यांच्या ठिकाणीं भेदच कायम

राहतो. असो. ही प्रीति म्हणजे भक्ति दोन प्रकारची आहे.एक परप्रीति व दुसरी आत्मप्रीति. आईबाप, इष्टमित्र, इत्यादि दुसऱ्या पदार्थांवर आपण जी प्रीति करीत असतों ती परप्रीति होय. द्वैत आहे तोंपर्यंत जीवप्रीतीलाच तो आत्मप्रीति म्हणतो व ईश्वरभक्तिही परप्रीतीनेंच म्हणजे ईश्वर आपणाहून निराळा आहे असें समजून करतो. पण ज्ञान होऊन ईश्वरांत मिळाला म्हणजे ईश्वरप्रीतिच राहते, म्हणजे आत्मप्रीति ईश्वरांतच होते. यावरून असें ठरलें कीं, अज्ञान आहे तोंपर्यंत जरी जीव परप्रीतीनें भक्ति करतो तरी ज्ञान झाल्यावर म्हणजे जीव मिथ्या ठरल्यावर आत्मप्रीतिच राहते. हीच श्रेष्ठ भक्ति होय. आतां जीवाचा अल्पपणा मिथ्या ठरून त्याला ज्ञान झाल्यावर भक्ति कशी कायम राहते व ईश्वराचा ईश्वरपणा न मोडतां जीवालाच त्याच्यांत कां मिळावें लागतें हें निरूपण मागें "तत्र निरतिशयं सार्वज्ञबीजम्" व "स पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदात्" या दोन सूत्रांत तुला सांगितलें आहे, तरी थोडें जास्त स्पष्ट करून आतांही सांगतों:—जीव जोंपर्यंत अज्ञानदशेंत आहे तोंपर्यंत त्याला द्वैत भासतें, पण तोच ज्ञान होऊन ईश्वरांत मिळाला म्हणजे त्याचें द्वैत नाहींसें होतें. येथें ईश्वराचें व जीवाचें जें ऐक्य सांगितलें तें तत्वदृष्टीनें समजावें. सामर्थ्यदृष्टीनें जीव आणि ईश्वर हे एक नाहींत.उदाहरण काजवा.काजवा हा स्वतःप्रकाशमान आहे व सूर्यही स्वतः प्रकाशमानच आहे. येथें प्रकाशदृष्टीनें जरी दोघेही एकच आहेत तरी सामर्थ्यदृष्टीनें ते एक नाहींत. काजव्याचा प्रकाश थोडा असतो व त्याचा उपयोगही दुसऱ्यांना होत नसतो. पण सूर्य हा स्वतः पुष्कळ प्रकाशमान असून दुसऱ्या पदार्थांनाही तो प्रकाशित करितो. ह्या दृष्टांताप्रमाणें जाणीवदृष्टीनें जीव आणि

ईश्वर हे एक आहेत, परंतु सामर्थ्यदृष्टीनें पाहिलें तर जीव हा अल्पज्ञ आहे व परमेश्वर हा सर्वज्ञ आहे. घटांत जें आकाश आहे त्याचा कमीपणा काढून टाकण्याचा प्रयत्न केला तर घट फोडावा लागेल. म्हणजे घटाकाश आणि महाकाश हे एक होतील. पण या खटपटीनें महाकाशाचें कांहींच मोडलें नाहीं. त्याप्रमाणें जीव हा पूर्ण झाला तर त्याचा अल्पज्ञपणा म्हणजे जीवपणा नाहींसा होईल, आणि ईश्वरांत मिळून जाईल, पण त्यामुळें ईश्वराचें सामर्थ्य काय कमजास्त होणार आहे ? तें जसेंच्या तसेंच राहील. म्हणूनच जीवाचा जीवपणा गेला तरी भक्ति मात्र तशीच राहते. भक्तीला फांटा द्यावयाचा असला तर अगोदर ईश्वराचा ईश्वरपणा नाहींसा केला पाहिजे. व तो कधींही नाहींसा करितां यावयाचा नाहीं. जीव जसा मिथ्या ठरतो तसा परमेश्वर कांहीं मिथ्या ठरत नाहीं.

**शिष्य**—जीव जसा अविद्येंत असलेला प्रतिबिंब आहे, तसा ईश्वर हा मायेंत असलेला प्रतिबिंब मानला तर तोही मिथ्या ठरेल. अविद्या उपाधि नाहींशी केल्यानें जीव जसा मिथ्या ठरतो तशी मायेची उपाधि नाहींशी केल्यानें ईश्वरही मिथ्या ठरला पाहिजे.

**गुरु**—यावरून सगुणभक्तीविषयीं तुझी उदासीनता दिसून येते. परंतु निर्गुणभक्तीचें कर्म फार कठीण आहे. म्हणूनच " अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥ " असें देवांनीं आधीच म्हणून ठेविलें आहे. असलेली अविद्येची उपाधि काढणेंच मनुष्याला किती कठिण जातें. आपलीच उपाधि ज्याला धड काढतां येईना, त्यानें ईश्वराची उपाधि नाहींशी करण्याचा विचार करणें हा केवढा वेडेपणा आहे ? व ती नाहींशी करितां येणार

तरी कशी ? ईश्वर बिंब व जीव प्रतिबिंब असें उदाहरण वामन-पंडितांनीं घेतलें आहे. विवरणकार आनंदगिरीही असेंच घेतात. ते एकच उपाधि मानतात. प्रतिबिंब हें उपाधीमुळें असत्य ठरतें, परंतु बिंब हें सत्य आहे. जीव आणि ईश्वर दोन्हीही प्रतिबिंबच मानले तर, दोन उपाधि घेतल्या पाहिजेत. उदाहरण—मोठा आरसा आणि लहान आरसा.

याप्रमाणें चैतन्याचे तीन भेद केले तर त्यांतले दोन मिथ्या ठरवून एक सत्य ठरवावें लागेल. कोठें कोठें चार भेद मानले आहेत, पण ते उपयोगाचे नाहींत. आतां तीन भेद मानले तर त्यांतले दोन खोटे ठरवावे लागतात. याला आपण सूर्याचा दृष्टांत घेऊं. सूर्य हा ब्रह्म आहे असें समज. त्याचें समुद्रांत पड-लेलें प्रतिबिंब तो ईश्वर व घटांतलें प्रतिबिंब तो जीव झाला. या-प्रमाणें चैतन्याच्याही दोन उपाधि ठरवाव्या लागतात. एक माया व दुसरी अविद्या. मग मुक्ति मिळण्यालाही दोन उपाधि नाहींशा कराव्या लागतील. पहिले अविद्या नाहींशी करावी लागेल व नंतर माया नाहींशी करावी लागेल व तें काम म्हणजे मुंगीनें मेरु ओलांडण्याइतकेंच दुष्कर आहे. घटांतलें पाणी फेंकणें सहज आहे, पण समुद्रांतलें पाणी फेंकणें मात्र अत्यंत कठिण आहे.ईश्वर हा मायेंत प्रतिबिंबित आहे. आणि जीव हा अविद्येंत प्रतिबिंबित आहे. आतां जीव आणि ईश्वर हे दोन्ही प्रतिबिंब घेतले तर दोघांनाही खोटें ठरवावें ला-गणार. जीवाला खोटें ठरविण्याकरितां त्याची उपाधि अविद्या नाहींशी केली पाहिजे आणि ईश्वराला खोटें ठरविण्याकरितां त्याची ब्रह्मांडापुरती उपाधि नाहींशी केली पाहिजे. येथें एक भारी अडचण येणार आहे. ती अशी:—वेद हे ईश्वराचे केलेले

आहेत. त्या वेदांचें वचन प्रमाण मानून आम्ही आपलें अज्ञान घालविणार. अशा रीतीनें आपल्यास ज्ञान झालें म्हणजे मग आपण ईश्वराची उपाधि नाहींशी करणार. त्याला पुन्हा ज्ञान पाहिजेच. तें ज्ञान कोठलें आणावयाचें ? यावरून असा प्रयत्न करणें म्हणजे कार्यानें कारणाचा नाश करण्यासारखेंच होईल. मिठाकडून समुद्राचा नाश कसा होणार ? प्रयत्नानें होतें असें मानलें तरी खटपट केवढी भयंकर पडणार ? म्हणून मुक्ति मिळण्याला दोन उपाधि न ठरवितां एकच उपाधि ठरविणें बरें. ह्याचा उद्देश एवढाच कीं, ईश्वराचें ज्ञान होऊन उपाधि संपली म्हणजे जीवानें ईश्वरांत मिळून जावें म्हणजे झालें. याला उदाहरण घटाकाशाचें. घटाकाश हा जीव आणि महाकाश ईश्वर असें मानलें तर, घट फोडला म्हणजे त्यांतली पोकळी महाकाशांत मिळून जाईल. या दृष्टांतांत जशी घटाची एकच उपाधि घेतली, तशी जीवालाही एकच उपाधि ठरविली तर सुलभ जाईल. विवरणकारांच्या मतानुसार माझेंही मत बहुतेक असेंच पडतें. व हें आपलें मत मी भक्तिपदतीर्थामृतांत सांगितलें आहे. ज्ञानेश्वरमहाराजांचेंही असेंच मत आहे. गीतेच्या १५ व्या अध्यायांतील ७ वा श्लोक " ममैवांशो जीवलोके " या श्लोकाच्या टीकेंत ते म्हणतात—" ऐसें शरीराचि एवढें ॥ जैं आत्मज्ञान वेगळें पडे ॥ तैं माझा अंश आवडे ! थोडेपणें ॥ " म्हणजे या लोकांचे ठिकाणीं माझाच अंश जीव झाला आहे. येथें मोठमोठ्या भाष्यकारांनीं अंश म्हणजे विभाग असा अर्थ केला आहे. पण ज्ञानेश्वरमहाराजांनीं त्यांत खुबी केली आहे. ते म्हणतात " तैं माझा अंश आवडे । थोडेपणें " " समुद्र कां वायुवशें ॥ तरंगाकार आभासे ॥ तो समुद्रांश ऐसा दिसे ॥ सानिवा जेवीं ॥ तेवीं जडातें

जीवविता ॥ देह अहंता उपजविता ॥ मी जीव गमे पंडुसुता ॥ जीवलोकीं ॥ " भगवान् म्हणतात—हे अर्जुना, मीच शरीराचा अभिमान धारण करून जीव होतों. जीवाचें आणि ईश्वराचें जें हें वेगळेपण भासतें, तें भ्रमामुळें. हा भ्रम केव्हां झाला तें समजत नाहीं. म्हणून तो भ्रम किंवा अविद्या अनादि मानावी लागत. याचा अर्थ इतकाच कीं, जीव हा भ्रमानें ईश्वराच्या ठिकाणीं अनादी आहे असा भासतो. जोंपर्यंत जाग येत नाहीं, तोंपर्यंत स्वप्नाचा आदिअंत समजत नाहीं. व जागेपणीं स्वप्नच राहत नाहीं. स्वप्नाचा शोध स्वप्नांत लागत नाहीं. त्याप्रमाणें जगाचा शोध अविद्या आहे तोंपर्यंत लागत नाहीं. व ज्ञानानें अविद्या गेली म्हणजे जग भासत नाहीं. म्हणून अविद्या ही ज्ञान होईपर्यंत अनादि म्हणणें बरें. म्हणून जीवेश्वरभेद हा यावत्ज्ञान अनादि आहे, हें सर्व वेदांताचें प्रमेय आहे. व यांत कोणतीही शंका रहात नाहीं. खरोखर पाहिलें तर, जीव आणि ईश्वर यांत मुळींच भेद नाहीं व हें समजणें म्हणजेच खरें ज्ञान होय. आत्मज्ञान जोंपर्यंत शरीराइतकेंच निराळें होतें, तेव्हांच त्याला जीव म्हणजे माझा अंश म्हणतात. परंतु तेंच आत्मज्ञान पूर्ण असलें तर तो ईश्वर झाला. म्हणून तिसरें चैतन्य कल्पण्याची जरूर दिसत नाहीं. यावरून ईश्वर हा मिथ्या ठरत नाहीं. म्हणून जीवाला हेंच उचित आहे कीं, घट फोडला असतां त्यांतली पोकळी जशी महाकाशांत मिळून जाते, त्याप्रमाणें ज्ञानानें शरीरावरला अभिमान सोडून त्यानें ईश्वरांत मिळून जावें. ओवी ज्ञानेश्वरी—"हा घटाकार जैसा। निमालिया तया अवकाशा। नलगे मिळों जाणें आकाशा। आना ठाया॥ तैसा देहाहंकार नाथिला। हा समूळ जयाचा नाशिला। तोचि परमात्मा संचला। आधींचि

आहे ॥ " हा शरीरावरचा अभिमान सुटण्याकरितां सगुणमूर्तीचें ध्यान करणें हा सुलभ उपाय वर सांगितलाच आहे. परमेश्वराचें ध्यान करितां करितां ध्याता आणि ध्येय एक झाले म्हणजे आपण परमेश्वरांत मिळून जातों, व यांत आपण भक्तीच्या मार्गानेंच जातों. प्रणिधानाचें प्रत्यक्चेतनाधिगम हें जें मुख्य फळ सांगितलें तें हेंच होय. अंधार दूर होणें हें जसें सूर्योदयाचें मुख्य फल आहे आणि अंगास ऊन लागणें हें जसें गौण फल आहे त्याप्रमाणें प्रत्यक्चेतनाधिगम हें ईश्वरप्रणिधानाचें मुख्य फल सांगितलें. आतां अंतरायाभाव म्हणजे विघ्ननिवारण सांगतात. प्रत्यक्चेतनाधिगम म्हणजे अंतःस्वरूपाचें ज्ञान, किंवा ईश्वरज्ञान, हा अर्थ वर सांगितलाच आहे. याप्रमाणें योग, सांख्य, वेदांत, भगवद्गीता, भाष्य, व वार्तिक ह्या सर्व प्रकारांनीं ईश्वराची ओळख समाधीच्या रीतीनें सांगितली. आतां विघ्नें कोणतीं ? तर योग पुरा न होऊं देणारीं अशीं ९ विघ्नें आहेत तीं दोन सूत्रांनीं सांगतात:—

१ **व्याधि**—वात, पित्त, कफ यांच्या योगानें शरीरांत रोगोत्पत्ति होणें हें पहिलें विघ्न होय.

२ **स्त्यान**—योगाविषयीं चित्ताची दुर्बलता. चित्ताला योगाची शक्ति नसणें. " काय करावें हो आळस येतो " असें वाटणें. शरीराला व्याधि असली व चित्त जर समर्थ असलें तर योग होऊं शकतो, ध्यान चुकत नाहीं म्हणून स्त्यान हें विघ्न वेगळें काढलें.

३ **संशय**—गुरु व शास्त्र यांनीं सांगितलेलें ज्ञान खोटें आहे किंवा खरें आहे हें मनांत घोळत राहणें.

४ **प्रमाद**—आंगीं सामर्थ्य असून मुद्दाम योग न करणें तो प्रमाद

होय; इच्छा असून होऊन न येणें तें स्त्यान होय. पण चित्त वगैरे समर्थ असून मुद्दाम न करणें तो प्रमाद होय.

५ **आलस्य**—आळस-योग करावयाला बसलें म्हणजे आंगमोड्या वगैरे येणें.

६ **अविरति**—विषय भोगण्याची फार इच्छा असणें.

७ **भ्रांतिदर्शन**—भ्रांतीनें भलतेंच ध्यान डोळ्यांसमोर येणें. गणपतीचें ध्यान करीत असतां म्हैस समोर दिसणें.

८ **अलब्धभूमिकत्व**—पुढें योगाच्या मधुमति इत्यादि पायऱ्या सांगतलि, त्यांपैकीं कोणतीच पायरी प्राप्त न होणें. भूमिका न मिळणें.

९ **अनवस्थितत्व**—एखादी पायरी प्राप्त झाली असतां तेथें चित्त स्थिर न राहणें. पुन्हां पुन्हां परतून येणें.

हीं वरील नऊ विघ्नें योगांत चित्त एकाग्र होऊं देत नाहींत. कारण हीं विघ्नें असलीं तर वृत्ति राहतात. नाहीं तर रहात नाहींत. म्हणून हे योगाचे मोठे शत्रु होत. ते दूर करणें आपलें कर्तव्य आहे. राज्य मिळविण्याची खटपट करणारास राज्य मिळून त्याचे शत्रुही मरतात, त्याप्रमाणें ईश्वरभक्ति आणि एकाग्रता यांच्या योगानें स्वरूपसाक्षात्कारही होतो आणि हीं विघ्नेंही जातात. पण या कामांत निराश मात्र होऊं नये. कारण फळ हें बिनचूक आहेच. तुकाराममहाराज म्हणतात " हा तो नोहे कांहीं निराशेचा ठाव ॥ भले पोटीं वाव राखिलिया ॥ १ ॥ "

ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात—" पूजूनि देव पाहिजे ॥ पेरूनि शेता जाइजे ॥ तोषौनि प्रसाद घेइजे ॥ अतिथीचा ॥ " आणखी " तरी अभ्यासूनि आधीं पाहे ॥ मग नोहे तरी कोपे ॥ " या-

वरून असें ठरतें कीं निराश न होतां परमेश्वराची भक्तिच करीत जावें. भक्ति न करितां जो विभ्रांत पडतो त्याला योगप्राप्ति होत नाहीं असें समजावें. असो; वर जीं नऊ विघ्नें सांगितलीं, त्यांबरोबरच उत्पन्न होणारीं आणखी दुसरीं ५ विघ्नें आहेत तीं अशीं:—

दुःख—जें प्राप्त झालें असतां त्याचा नाश व्हावा अशी मनुष्य इच्छा करितो तें दुःख. दुःखें तीन प्रकारचीं:—आध्यात्मिक, आधिभौतिक आणि आधिदैविक. यांनाच त्रिविधताप म्हणतात. आध्यात्मिक दुःख म्हणजे आपल्या शरीरांतूनच उत्पन्न होतें तें. याचे प्रकार दोन–शारीर आणि मानसिक. शारीर दुःख म्हणजे वात, पित्त, कफ यांच्या योगानें होतें तें. मानसिक दुःख म्हणजे आपल्यास आवडत नाहीं तें समोर येणें, व आवडतें तें दूर जाणें. हे अध्यात्मिकाचे दोन भेद झाले. आतां आधिभौतिक म्हणजे दुसऱ्यापासून होतें तें. जसें–चोर–व्याघ्र–सर्प इत्यादि. आधिदैविक दुःख म्हणजे जीवंतपणीं ग्रहादिकांपासून पीडा होणें व मेल्यानंतर यमयातनादि दुःख होणें. या तिन्ही प्रकारच्या दुःखांचें निरूपण दासबोधांत आणि सोहिरोबानाथ आंबियेकृत "सिद्धांतसंहिते"च्या तिसऱ्या अध्यायांत चांगलें केलें आहे. येथें एक गोष्ट लक्षांत ठेव. ती हीच कीं, विषयसुख हेंही दुःखच समजावें. उदाहरण–बचनाग. बचनाग हें विष असून खातांना गोड लागतें, पण परिणामीं प्राण घेतें. तसेंच विषयसुखही आरंभीं गोड वाटतें. "यत्तदग्रेऽमृतोपमम्". परंतु परिणामीं दुःख देतें. "विषमिव". म्हणून तें दुःखच समजावें. तर यावरून एका आत्मसुखाशिवाय सर्व सुखदुःखें हीं दुःखेंच होत. या विषयावर ज्ञानेश्वरींत आणि दासबोधांत सुरस ओव्या आहेत.

ओंव्या ज्ञानेश्वरीः—आतां यावरी सुख । तें एवंविध देख । जेणें एकेंचि अशेष । विसरे जीव ॥ मना वाचे काये । जे आपुली आण वाये । देहस्मृतीची त्राये । मोडीत ये जें ॥ जयाचेनि जालेपणें । पांगुळा होइजे प्राणें । सात्विकासि दुणें । वरीही लाभ ॥ कां आघवियाचि इंद्रियवृत्ति । हृदयाचिया एकांतीं । थापटूनि सुषुप्ति । आणी जें गा ॥ किंबहुना सोय । जीव आत्मयाची लाहे । तेथ जें होय । तया नाम सुख ॥ आणि ऐसि हे अवस्था । न जोडतां पार्था । जें कीजे तेंचि सर्वथा । दुःख जाण ॥

आतां दासबोधः—रामेंविण जे जे आस । तितुकी जाणावी नैराश । माझें माझें सावकाश । सीणचि उरे ॥ जयास वाटे सीण व्हावा । तेणें विषयो चिंतीत जावा । विषयो न मिळतां जीवा । तगमग सुटे ॥ सांडूनि राम आनंदघन । ज्याचे मनीं विषयचिंतन । त्यासि कैचें समाधान । लोलंगतासि ॥ जयासि वाटे सुखचि असावें । तेणें रघुनाथभजनीं लागावें । स्वजन सकळही त्यागावे । दुःखमूळ जे ॥ जेथें वासना झोंबोन पडे । तेणेंचि अपायें दुःख जडे । म्हणौनि विषयवासना मोडे । तो एक सुखी ॥ विषयजनित जें जें सुख । तेथेंचि होतें परम दुःख । पूर्वी गोड अंतीं शोक । नेमस्त आहे ॥ गळ गिळितां सुख वाटे । ओढून घेतां घसा फाटे । कां तें बापुडें मृग आपटे । चारा घेऊनि पळतां ॥ तैसी विषयसुखाची गोडी । गोड वाटे परि ते कुडी । म्हणौनियां आवडी । रघुनाथीं धरावी ॥ (३–१०–६० ते ६७). देहाचेनि योगें संशयो । करी समाधानाचा क्षयो । तरी चळों नेदावा निश्चयो । आत्मत्वाचा ॥ सिद्ध असतां आत्मज्ञान । संदेह वाढवी देहाभिमान । याकारणें समाधान । आत्मनिश्चयें

रामाचें ॥ आठवतां देहबुद्धि । उडे विवेकाची शुद्धि । याकारणें आत्मबुद्धि । सदृढ करावी ॥ आत्मबुद्धि निश्चयाची । तेचि दशा मोक्षश्रीची । अहमात्मा हें कधींचि । विसरों नये ॥ ( ५–१० १५ ते ३८ ) मूर्खांमाजी परम मूर्ख । जो संसारीं मानी सुख । संसारदुःखायेवढें दुःख । आणिक नाहीं ॥(२-१०-४०) याप्रमाणें दुःखविघ्न सांगितलें. आतां दौर्मनस्य—

**दौर्मनस्य**–दौर्मनस्य म्हणजे मनाचा दुष्टपणा. याच्या योगानें, इच्छेचा भंग झाला असतां चित्त चंचल होतें. पैसे तर द्यावे लागतात पण पैशाची आसक्ति सुटत नाहीं, अशा वेळीं मनाचें चंचल असणें हें दौर्मनस्याचें उदाहरण आहे.

**अंगमेजयत्व**–अंग थरथर कांपणें. ( एजयन् = कांपणें )

**श्वास**—आपली इच्छा नसतां बाहेरला वायु आंत घेणें.

**प्रश्वास**–इच्छा नसतां आंतला वायु बाहेर सोडणें, अशीं हीं दुःखादिक पांच विघ्नें वरच्या नऊ विघ्नांबरोबरच योगांत उत्पन्न होतात, हें वर सांगितलेंच आहे. आतां या चौदा विघ्नांत जें भ्रांतिदर्शन नांवाचें विघ्न वर सांगितलें त्याला कषाय ह्मणतात. व बाकीच्या तेरा विघ्नांस विक्षेप ह्मणतात. या प्रमाणें विक्षेप आणि कषाय असे विघ्नांचे दोनच भेद झाले. आणखी दोन विघ्नें आहेत. त्यांना लय आणि रसास्वाद असें ह्मणतात. यांपैकीं रसास्वाद हें विघ्न मोठें भयंकर आहे व तें लवकर जात नाहीं.

**लय**—ह्मणजे योगाचे वेळेस निद्रा येणें. याला उपाय हाच आहे कीं, हळु हळू हुशारी आणीत जावें. आतां राहिलें–रसास्वाद.

**रसास्वाद**—म्हणजे रसाचें आस्वादन. थोडक्याशा ज्ञानानें मी धन्य झालों असें मानणें. हें विघ्न मात्र लौकर जात नाहीं. जन्मांतर देतें.

असो. हीं सगळीं विघ्नें एकाग्रतेनें दूर होतात. व एकाग्रता ईश्वरभक्तीनें प्राप्त होते. म्हणून ईश्वरावरच एकाग्रता करणें उत्तम. मात्र निराश न होतां दृढ बुद्धीनें अभ्यास करावा. याप्रमाणें ईश्वर प्रणिधानाचें दुसरें फल जें " अंतरायाभाव " तें तुला सांगितलें, व मुख्य फल जें " प्रत्यक्‌चेतनाधिगम " तें यापूर्वींच सांगितलें. हीं दोन्हीं फलें ईश्वरभक्तीनें प्राप्त होतात.

आतां नुसतीं विघ्नेंच दूर करण्याचा उपाय—

" एकतत्वाभ्यास " सांगितला आहे. तो पुढल्या सूत्रानें सांगतील.

॥ श्रीमत् सद्‌गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

---

# श्री ज्ञानेश्वरमाउली.

२६–१०–१९०७.

**" तत्प्रतिषेधार्थ एकतत्वाभ्यासः ॥ ३२ ॥**

**" मैत्रीकरुणामुदितोपेक्षाणां सुखदुःखपुण्यापुण्य–**
**विषयाणां भावनातश्चित्तप्रसादनम् " ॥ ३३ ॥**

स्तनांतलें दूध वांसरास पाजल्यानें गाईला आनंदाचें जसें भरतें येतें तसें ईश्वरप्रकरणाच्या निरूपणानें आलेलें भरतें नुकतेंच ओहटून पुन्हां निरूपणाची वृत्ति उठल्यामुळें ज्या आनंदांतून आपण नुकतेच बाहेर आलों त्या मधुरभक्तीच्या आनंदाचा शि-

त्याला प्रसाद देण्याकरितां पुढील श्लोकांत मंगल करून नंतर सूत्राच्या अर्थाचें निरूपण पुढें सांगतातः—

श्लोक—ज्ञानेश्वराचार्यमखंडबोधम् ॥ नत्वात्मजं कांतमुखाब्जयोगम् ॥
पतंजलिव्यासमुखांश्च सर्वान् ॥ प्रणम्य वक्ष्ये परमार्थतत्वम् ॥

गुरु—कालच्या दिवसापर्यंत योगसूत्रांतील " ईश्वरप्रणिधानाद्वा । " या तेविसाव्या सूत्रापासून ३१ व्या सूत्रापर्यंत ईश्वरप्रकरणाचें वर्णन झालें. आणखी पुढें दोन सूत्रें राहिलीं आहेत. तीं ह्या ईश्वरप्रकरणांत घ्यावींत किंवा नाहीं, याबद्दल वाद आहे. वार्तिककारांचें म्हणणें ईश्वरप्रकरणांत तीं घेऊं नयेत. इतर टीकाकारांचें म्हणणें आहे कीं, तीं घ्यावीं. वार्तिककारांनीं आपल्या म्हणण्याला कांहीं साधारण कारणेंही दिलीं आहेत. वार्तिककार म्हणतातः—" तत्प्रतिषेधार्थं एकतत्वाभ्यासः " अर्थ—विघ्नांचें निराकरण कारण्यासाठीं एकतत्वाचा अभ्यास करावा. " हें सूत्र ईश्वरप्रकरणांत घेऊं नका याचें कारण ते सांगतातः—" एकतत्वं स्थूलादि किंचित् " म्हणजे एकतत्वशब्दानें स्थूलादि पदार्थांचें ग्रहण होतें. यांत स्थूलादि म्हटलें यावरून स्थूल घ्यावें किंवा सूक्ष्म घ्यावें ? पण कोणतें तरी एकच घ्यावें असा त्यांचा उद्देश दिसतो. जर आपण स्थूल पदार्थ घेतले तर पुढें दुसरी एक अडचण आहे. ती अडचण हीच कीं, " यथाभिमतध्यानाद्वा " असें एक सूत्र पुढें आहे. मग एकतत्वाचा स्थूलादि असा जर अर्थ केला, तर " यथाभिमतध्यानाद्वा " याचा अर्थ काय म्हणून असा करावयाचा ? वार्तिककारांनीं त्याचा अर्थ हरिहर मूर्ति असा केला आहे. पण हरिहरमूर्ति असा अर्थ केला तर ईश्वरप्रकरण संपल्यावर दुसरेंच प्रकरण मध्यें घालून पुन्हां ईश्वर-

---

१ मुखांश्च = प्रमुखांश्च.

प्रकरण घेतलें असें होईल. त्यापेक्षां " यथाभिमत " या सूत्रांत स्थूलादि पदार्थ असा अर्थ घेतला, तर हरकत होणार नाहीं. कारण तेथें " यथाभिमत " हें पद आहे म्हणून. ' यथाभिमत' म्हणजे मनास आवडेल तें. आणखी या सूत्रांत " वा " म्हणजे अथवा हें अव्ययही आहे. आणि आजच्या सूत्रांत ' वा ' शब्दही नाहीं. आणि भाष्यकारांनीं तसें स्पष्ट म्हटलेंही नाहीं. शिवाय " एकं तत्वं ईश्वरः प्रकृतत्वात् " असें वाचस्पतिमिश्रांनीं म्हटलेंही आहे. म्हणून मागील प्रकृत विषय चालल्यामुळें ' एक तत्व' ह्मणजे ईश्वर समजावा. ही मिश्रांची उक्तिच साधु आहे.ह्मणून हें सूत्र ईश्वरप्रकरणांतच घालावें असें मला वाटतें. दुसरें, स्थूलादि तत्व घेतलें तर, स्थूल सूक्ष्म क्रमानें घ्यावयाचे नाहींत. तर ' एकतत्वाभ्यास ' करावयाचा. आणि स्थूल, सूक्ष्म तत्व क्रमानें घेतले तर ' एकत्वाभ्यास ' होत नाहीं. कारण, तसें केलें तर पहिले वितर्कसंप्रज्ञात समाधि साधावा लागेल. मागें सांगितलेंच आहे कीं, स्थूलावर समाधि करणें हा वितर्कसंप्रज्ञात समाधि होतो. व नंतर विचारसंप्रज्ञात समाधि साधावा लागेल. आणि विचारसंप्रज्ञात समाधि म्हणजे सूक्ष्मावर चित्त एकाग्र करणें, हेंही मागें सांगितलेंच आहे. म्हणून हा ' एकतत्वाभ्यास ' होऊं शकत नाहीं. याकरितां ' एकतत्वाभ्यास ' म्हणजे ब्रह्माभ्यास असा अर्थ केला तर बरें पडेल असें मला वाटतें. हा ' एकतत्वाभ्यास ' वेदांताच्या रीतीनें आहे.

**शिष्य**—कोणी ह्मणतात कीं, वेदांताचा व योगाचा विरो[illegible] आहे; हें खरें आहे काय ?

**गुरु**—हें ह्मणणें खरें नाहीं. कारण शांकरभाष्यांत योगाच स्वीकार केला आहे. आचार्यांनीं " अथ तत्वदर्शनाऽभ्युपा[illegible]

गा: ” असें योगाचें लक्षण केलें आहे. याचा अर्थ असा आहे कीं, तत्वज्ञान होण्याचा जो उपाय त्यालाच योग म्हणतात. या अर्थाचीं आणखी जीं दुसरीं सूत्रें आहेत, तीं हिरण्यगर्भाच्या योगशास्त्रांतलीं असोत, अगर पतंजलीच्या योगशास्त्रांतलीं असो-त, त्यांना आम्हीं प्रमाण मानतों. म्हणून वेदांत व योग यांचा विरोध नाहीं. याकरितां “ एकतत्वाभ्यासः ” या सूत्रानें ब्रह्मा-भ्यासच घ्यावा.

शिष्य—महाराज, येथें अशी एक शंका येते कीं, ईश्वर-प्रणिधान तर मागें सांगितलेंच आहे. आतां पुनः सांगितलें तर पुनरुक्ति होईल.

गुरु—ही पुनरुक्ति होत नाहीं; कारण आतांपर्यंत जें ईश्वर-प्रणिधान सांगितलें, तें भक्ताच्या दृष्टीनें सांगितलें; परंतु आतां तें ज्ञानदृष्टीनें सांगतात. आतांपर्यंत जें प्रणिधान सांगितलें तें ... सगुणईश्वराचें सांगितलें; कारण परमेश्वराच्या भक्तीनें विघ्नं नाहींशीं होतात. आतां येथें तूं म्हणशील कीं, परमेश्वर ... तर तो कोणता परमेश्वर ? सगुण कीं निर्गुण ? तर येथें सगुण परमेश्वरच ध्यावयाचा. कारण निर्गुण परमेश्वराचे भक्तीनें विघ्नं नाहींशीं होत नाहींत. याचें कारण परमात्माच गीतेंत सांगतात. “ क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ॥ अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥ १ ॥ ” सगुणभक्त श्रेष्ठ कीं निर्गुणभक्त श्रेष्ठ ? असा प्रश्न अर्जुनानें विचारला असतां, वरच्या श्लोकानें देवानें त्याचें उत्तर दिलें. योगसूत्रांत परमेश्वरभक्तीनें विघ्नं दूर होतात, हें मागें सांगितलें आहे. म्हणून आपण या सूत्राचा अर्थ गीतेला अनुकूल असाच लाविला पाहिजे. निर्गु-णाचे भक्तीनें जाण्याची ज्याची आवडी आहे, त्यांना अतिशय क्लेश म्हणजे दुःख होतात. निर्गुण परमेश्वराला जाऊन मिळणें

हीं गति जीवांना दुःख प्राप्त करणारी आहे. अव्यक्तगति ही दुःख देणारी आहे. परमेश्वराच्या भक्तीनें विघ्नें दूर होतात, असें योगांत सांगितलें; त्याचा अर्थ निर्गुणभक्तीनें विघ्नें दूर होतात असा असता तर देवांनीं "क्लेशोधिकतरस्तेषाम्" असें कशाला म्हटलें असतें? यावरून भक्तियोगानें विघ्नें दूर होतात, असें जें सांगितलें, ती भक्ति सगुणईश्वराचीच होय. म्हणून हीं योगसूत्रें सगुणभक्तिपरच सांगितलीं आहेत. आतां सच्चिदानंदाची ओळख तुला सांगतों. सत् म्हणजे आहेपणा, चित् म्हणजे ज्ञान, आणि आनंद म्हणजे सुख. आतां याची रीति सांगतों. सत् म्हणजे नुसतें आहे असें जें आपल्याला वाटतें तें झालें निर्गुण. ज्ञान होणें हें लक्षण सगुणाचें आहे आणि आनंद होणें हें लक्षण भक्तीचें, म्हणजे पूर्ण आत्मप्रीतीचें आहे. उदाहरण—दोरीवर सर्प भासला, तर दोरी ही सर्पाला आधार आहे कीं नाहीं? जेव्हां सर्प भासतो, तेव्हां दोरी असते. ती दोरी आहेपणांत आहे. तिथें ज्ञान नसतें. आहेपणा हा सामान्यधर्म आहे. पण दोरीचें ज्ञान झालें म्हणजे सर्पनिवृत्ति होते. यांत दोरीचे विशेष धर्म दिसतील, तेव्हांच सर्पाचा नाश होतो. नुसती दोरी आहे हें निर्गुण कळल्यानें सर्पाचा नाश होत नाहीं. तर दोरीचें सर्व रूप कळलें पाहिजे. तसें सामान्य चैतन्य म्हणजे निर्गुण परमेश्वर हा अविद्येला आधार आहे. व सगुण परमेश्वर हा अविद्येला नाशक आहे. म्हणजे सगुण हें दुःखनाशक आहे. मग आपलीं कर्में अर्पण करावयाचीं तीं सगुण ईश्वरासच अर्पण होतील. दोरीवर खोटा सर्प जरी भासतो, तरी दोरी कांहीं सर्पाला मारीत नाहीं; पण दिवा आणला म्हणजे ज्ञानानें सर्पाचा नाश होतो. तर सगुणाचें ज्ञानच त्याचा नाश करितें. कर्मतत्वग्रंथांत वामनपंडित म्हणतातः—

" कृष्णार्पणाविण नसे कृतनाश तोही ॥ " कर्माचा नाश कृष्णार्पणावांचून निर्गुणानें होत नाहीं.

" ब्रह्मार्पण श्रुति म्हणे सगुणींच तेंहीं ॥ " ब्रह्मार्पण म्हणजे सगुण ब्रह्माला अर्पण करणें—निर्गुणाला नव्हे.

" नाशील रज्जुच कसा लटिक्या भुजंगा ॥

" तेवीं कसा अगुण नाशिल कर्मसंगा ॥ " दोरीनें खोट्या सर्पाचा नाश होऊं शकत नाहीं; त्याप्रमाणें निर्गुण परमेश्वर कर्मांचा नाश कसा करूं शकेल ? तर कर्माचा नाश सगुण परमेश्वरच करील. सगुण म्हणजे निर्गुणाचें ज्ञान होणें तें सगुण. आणि निर्गुण म्हणजे आहेपणा. सोनें आहे हें आपणाला कळतें, पण त्याचें ज्ञान मात्र अलंकाराचे रूपानें होतें; तसें ब्रह्मज्ञान जें होतें तें जगाशीं अभेदरूपानें होतें. सोन्याचें ज्ञान व अलंकाराचें ज्ञान अभिन्नरूपानेंच होतें; एकमेकांपासून निराळें काढून होत नाहीं. त्याप्रमाणें निर्गुण असो वा सगुण असो, ब्रह्माचें जें ज्ञान होतें तें जगाशीं अभेदरूपानें होतें. " सगुणमेव गुणैरनभिभूतं निर्गुणम् " असें श्रीधरस्वामी म्हणतात. निर्गुण म्हणजे आहेपणा, हें वर सांगितलेंच आहे. त्याचें ज्ञान होणें म्हणजे जगाशीं अभेदरूपानें ब्रह्माचें ज्ञान होणें. याला उदाहरण -अलंकाराशीं अभेदरूपानें सोन्याचें ज्ञान होतें त्याप्रमाणें.

शिष्यः—जगाशीं अभेदरूपानें ब्रह्माचें ज्ञान होणें म्हणजे काय ?

गुरुः—तें आतां सांगतोंः—परमेश्वर हा सर्वानंदस्वरूप आहे व सर्वचैतन्यस्वरूपही आहे म्हणजे ज्ञानस्वरूप आहे. आतां जगांत जें सुख म्हणजे विषयसुख आलें तें कोठलें आलें ? तर तें परमेश्वरामधलेंच आहे. पण जीव हा काय करितो कीं तें

सुख विषयांतून मिळतें असें भ्रांतीनें मानतो. व विषय नष्ट झाले म्हणजे दुःख पावतो. पण विषय नष्ट झाले तरी सुख मात्र नष्ट होत नाहीं, हें आपल्यास जगांत दिसतें. जगांत जो आनंद व ज्ञान आहे, तेहीं परमेश्वराचेच आहेत. व चित्त एकाग्र करून जें ज्ञान होतें तेंहीं परमेश्वरापासूनच येतें. यावरून विषय असोत अगर नसोत, जें सुख आहे तें परमेश्वराचेंच आहे असें झालें. हें कळलें म्हणजे विषय नष्ट झाले तरी दुःख होत नाहीं. परमेश्वर सर्वव्यापक आहे, असें ज्ञानानें कळतें. तेव्हां परमेश्वराचें ज्ञान जगाशीं अभेदरूपानेंच होऊं शकतें. जग निराळें काढून होऊं शकत नाहीं. परमेश्वर सर्वव्यापक आहे, असें ज्ञान झालें म्हणजे जग कांहीं निराळें उचलून दुसऱ्या ठिकाणीं ठेवावें लागत नाहीं. असेंच संकेतदृष्टीनेंहीं होतें. आपण जसे चैतन्यरूप आहोंत, तसा परमेश्वरही चैतन्यरूप आहे. आपण जर चैतन्यरूप आहोंत तर जग हेंही चैतन्यरूपच झालें व परमेश्वरही चैतन्यरूप आहेच. मिळून सर्वच चैतन्यरूप झालें. जग जर चैतन्यरूप नसून जड असलें, तर तें भासणारच नाहीं. व आपण चैतन्य असल्यामुळें जड जग आपल्यापुढें येणार नाहीं. प्रकाशापुढें अंधार कसा येऊं शकेल ? म्हणून जग हें जड नसून चैतन्यरूपच आहे. यावरून जगाचें ज्ञान होतें तेंही अभेदरूपानेंच होतें. हें ज्ञान झालें म्हणजे दुसरें कमी जास्त लहान मोठें कांहीं उरतच नाहीं. पहिलें आपल्याला जीवाचें ज्ञान होतें. नंतर ईश्वराचें ज्ञान होतें. व त्यानंतर जीव हा ईश्वरांत मिळून गेल्यावर एक ईश्वरज्ञानच उरतें. श्रुति म्हणते " यस्य भासात्सर्वमिदं विभाति " म्हणजे ज्याच्या चैतन्यानेंच हें सगळें जगत् चैतन्यरूप आहे. ओंवी—अमृतानुभव —" विभाति यस्य भासा ॥ सर्वमिदं ऐसा ॥ श्रुति काय वायसा ॥ ढेकरू देती ॥ १ ॥ म्हणजे ज्याच्या चैतन्यानेंच हें सगळें जगत्

...स्वरूप आहे, असें श्रुति काय व्यर्थ सांगते? म्हणून जगाचें ज्ञान ब्रह्माशीं अभेदरूपानेंच होतें. यावरून ज्ञान हें सगुणरूपानेंच होतें असें झालें. सोन्याचें ज्ञान, जसें अलंकाराशीं अभेद-रूपानेंच होतें, तसें परमेश्वराचें ज्ञानही सगुणच झालें. सत्=निर्गुण आणि चित्=सगुणज्ञान. अलंकारावांचून सोनें जसें पाहतांच येत नाहीं, तसें जगाशीं अभेदरूपानें ब्रह्माचें ज्ञान होत असल्यामुळें ज्ञान हें सगुणच झालें. एकनाथमहाराज म्हणतात—" सत्पद तें ब्रह्म चित्पद तें माया ॥ आनंदपदीं जया म्हणती हरी ॥ १ ॥ सत्पद निर्गुण चित्पद सगुण ॥ सगुण निर्गुण हरिपायीं ॥ २ ॥ तत्सदिति ऐसे पैल वस्तूवरी ॥ गीतिमाजी हरि बोलियेला ॥ ३ ॥ हरिपदप्राप्ति भोळ्याभाविकासी ॥ अभिमानियासी गर्भवास ॥४॥ अस्ति भाति प्रिय ऐसीं पदें तिन्ही ॥ एका जनार्दनीं तेचि झालें॥५॥ सत्पद=आहेपणा, तें निर्गुण व चित्पद=ज्ञान हें सगुण झालें. व ज्ञानानें अज्ञानाचा नाश होतो म्हणजे सगुणानेंच अज्ञानाचा नाश होतो असें झालें. म्हणूनच एकनाथमहाराज म्हणतात— "सगुण निर्गुण हरिपायीं." सर्व जगभर ब्रह्माचें जरी ज्ञान झालें तरी तें सगुणच. व श्रीकृष्णमूर्तीपुरतें ज्ञान झालें तरीही तें सगुणच. भगवद्गीतेंत अर्जुन म्हणतात—"पैं जे वानी श्यातुका॥ तीच वेगळिये वाला एका ॥ तैसा एकदेशिया व्यापका । सरिसा पाडु ॥ १ ॥ खंभर तोळे सोन्याला जो कस लागतो, तोच वाल-भर सोन्यालाही लागतो. परंतु ब्रह्मज्ञान करून घेण्याची इच्छा असेल तर साऱ्या जगभर फिरलें तरी तें होणें नाहीं. कारण जग-भर ब्रह्मज्ञान झालें तरी, बुद्धींत मात्र तें सारें घेतां येत नाहीं. म्हणून्यानें अवतारादिक जे रामकृष्ण त्यांनाच आपल्या बुद्धींत धारण करून बुद्धि स्थिर करावी. श्रीकृष्णाची साजरी सगुणमूर्ति बिंबांत जर स्थिर केली तर तेवढ्यानेंच सगुणब्रह्माचें ज्ञान करून

घेतां येतें. ज्ञानेश्वरमहाराजांनीं याला असा एक दृष्टांत दिल आहे कीं, त्याला तोडच नाहीं. ते म्हणतात—"अमृताचिय सागरीं। जे लाभे सामर्थ्याची थोरी। तोचि दे अमृतलहरी चुळीं घेतलिया ॥ ६१ ॥ अमृताच्या समुद्रांत बुडालें तर अमरत्व येतें. व चूळभर अमृत घेतलें तरीही तेंच फळ मिळतें. फळ ज एकच तर एकदेशीय व व्यापक दोन्ही सारखेच. सत्पुरुष अस तात ते, एकदेशीय, व्यापक अशा किटकिटींत पडत नाहींत असें ज्यांना ज्ञान झालें, ते धन्य होत. खरोखर पाहिलें तर जग आणि ब्रह्म यांत कांहीं भेद नाहीं. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात कीं, "झालोंनि जगें मी झांके। तरी जगत्वें कोण फांके।। किळे वरी माणिकें। लोपिजे कायी ॥ १ ॥ माणकाच्या प्रभेनें जसे माणिक कांहीं झाकत नाहीं, तसें जग हें माझी प्रभा आहे. ते मला कसें झांकूं शकेल ?

**शिष्य**—वास्तविक जग आणि परमात्मा एक असतां द्वैत कां भासावें ?

**गुरु**—याचें कारण असें कीं, जग जें भासतें तें जीवाच्या बुद्धींत अज्ञान आहे म्हणून. बुद्धींत अज्ञान आहे तोंपर्यंत द्वैत आहे. अज्ञान म्हणजे संसार. संसारानें जीवाचें खरें स्वरूप लोपवून त्याला भ्रम पाडला आहे. पण ज्यांचा भ्रम गेला, त्यांना जग हें ब्रह्मच आहे. सारांश, जग भासतें किंवा द्वैत भासतें त्याला कारण जीवाच्या बुद्धींत असलेलें अज्ञान होय.म्हणजे जीवच अविद्येमुळें आपलें खरें स्वरुप जाणत नाहीं. आंधारांत दोरीवर सर्पाचा भ्रम होतो, तो भ्रम पाहणाऱ्याच्या बुद्धींत असतो. परंतु कंदील आणला म्हणजे तो निवृत्त होतो, पण त्यामुळें दोरीचें सगुणपण थोडेंच मोडतें ? सर्पानें दोरी झांकली जाते, पण अलंकारानें सोनें झांकलें जात नाहीं. उलट अलंकारावांचून सोनें

दिसतच नाहीं. त्याप्रमाणें संसारानें जरी जीवाचें स्वरूप झांकलें आहे, तरी त्यानें ईश्वराचें स्वरूप कांहीं झाकलें नाहीं. याचा अर्थ असा कीं, जीवाला अविद्येमुळें त्याचें खरें स्वरूप कळत नाहीं. ती अविद्या ज्ञानानें नाश पावली म्हणजे जीवाचें अज्ञान नाहींसें होतें. व त्याला आपल्या खऱ्या स्वरूपाचें ज्ञान होतें. यापमाणें जीवाचें जीवपण गेलें तरी परमेश्वराचा सगुणपणा मात्र मोडत नाहीं, तो तसाच राहतो. अलंकारानें सोन्याचें स्वरूप झांकलें जात नाहीं हें वर सांगितलेंच आहे. येथें रामकृष्णादि शरीरें सोन्याच्या अलंकारासारखीं होत. अलंकाराशिवाय सोनें पाहतां येत नाहीं, तसें त्यांच्याशिवाय ब्रह्म दिसत नाहीं. त्यांच्यावर जेव्हां आपण प्रेम करूं लागतों, व प्रेमामुळें पूर्ण समाधि होतो, तेव्हां जीवपणा विसरून जातों. आणखी असें पहा; सोनें झांकलें असतें, तर अलंकारानें थोडेंच दिसलें असतें? त्याप्रमाणें ब्रह्म जर जगाचे योगानें झांकलें असतें तर रामकृष्णादि सगुणमूर्तींच्या रूपानें कसें दिसलें असतें? त्यांत भेद इतकाच कीं, ज्याअर्थीं जगांत दुःख भासतें त्याअर्थीं जीवाच्या ठिकाणीं अविद्या आहे; पण जेव्हां ज्ञान होतें तेव्हां तें परमेश्वराच्या सगुणरूपानेंच होतें. कारण रामकृष्णादि शरीरें केव्हांच अविद्यात्मक नाहींत. चांगदेवपासष्टींत असेंच वचन आहे. "सोनें सोनपणा उणें ॥ न येतां झालें लेणें ॥ तैसें न वेचतां जग होणें॥ अगा जया ॥ १ ॥ तोळाभर सोन्याची जर बुगडी केली तर त्यामुळें सोन्याचें वजन कांहीं कमीजास्त होत नाहीं; कारण अलंकार निराळा व सोनें निराळें असें नाहीं. अलंकार तेंच सोनें असतें. सोनें जसें आपल्या रूपाला कमी जास्त न होतां अलंकार झाला, तसें ब्रह्मरूप कायम राहूनच जग झालें. संपूर्ण जग बुद्धींत येत नाहीं, म्हणून भक्तीनें रामकृष्ण यांच्या सगुणमूर्तींवर समाधि

करावा. म्हणजे बुद्धि क्षीण होऊन आपण व्यापक होतों. मिठाचा खडा गंगाळभर पाण्यांत टाकला, तर सारें पाणी खारट होतें. आपण खडा टाकला एकाच ठिकाणीं. पण तो विरल्यावर सगळें पाणी खारट झालें. परंतु तें पाणी उन्हानें पुन्हां आटून गेलें तर त्या मिठाच्या खड्याचे परमाणु तळाशीं राहतील. तोच खडा समुद्रांत टाकूं द्या. त्याच्या परमाणूंनीं समुद्रांतील कांहीं जागा व्यापली जाऊन तें मीठ समुद्रांत मिळून जाईल, तें इतकें कीं पुन्हां तें परतही मिळण्याचा संभव राहणार नाहीं. त्याप्रमाणें जगभर व्यापक जरी ब्रह्म आहे, तरी निर्गुणभक्तीनें बुद्धींतला अहंकार समूळ विरत नाहीं, परंतु रामकृष्णादि सगुणमूर्तींवर समाधि केला म्हणजे आपण ब्रह्मरूप होऊन जातों. म्हणजे सगळ्या जगाचें ज्ञान आपल्यास अभेदरूपानें होतें. आणि सगुणानेंच क्लेशांचें निराकरणही होतें. म्हणून सगळ्या जगभर व्यापक होण्याची इच्छा असेल तर जीवपणा सुटला पाहिजे, म्हणजे आपण व्यापक झालोंच. हा जीवपणा समाधीनें सुटतो. व समाधि करण्याला देवाचीं सगुण शरीरेंच म्हणजे रामकृष्ण यांच्या मूर्तिच पुढें ठेवल्या पाहिजेत. स्वात्मसुख ग्रंथांत एकनाथ-महाराज म्हणतात:—

" म्हणे म्यां सोनें पहावें दृष्टी ॥ तरी पुढें ठेविजेल खोटी ॥
परी खोटी वेगळी भेटी ॥ काय सुवर्ण निढळे ॥ "

खोटी म्हणजे आकार. नाथ म्हणतात, आकाराशिवाय काय सुवर्ण पाहतां येणार आहे ? " हो कां चिद्रत्नाचे किळ ॥ ते हे चराचर सकळ ॥ ऐसें नेणती समूळ ॥ पटल दृष्टी ॥ " रत्नाची प्रभा रत्नच आहे त्याप्रमाणें जगही ब्रह्मरूपच आहे, असें जे जाणत नाहींत त्यांना अज्ञान आहे, म्हणजे द्वैत किंवा अज्ञान दूर करणें हा हेतु आहे. व अज्ञान दूर झालें तरी भक्ति मात्र नष्ट

होत नाहीं. पंचदशींत शुष्क वेदांती अज्ञानाचें कार्य भक्ति मानतात. म्हणजे " देहखंडा नाम आत्मा ॥ ईश्वर पाषाणप्रतिमा ॥ " असें जें ज्ञानेश्वरमहाराजांनीं मूढ लोकांविषयीं म्हटलें आहे तसा प्रकार मानतात. परंतु सत्पुरुष जे आहेत ते आनंदमय प्रीतीलाच भक्ति मानतात. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात— " पैं माझिये सहजस्थिति ॥ भक्तिनाम ॥ " याप्रमाणें ज्ञान झाल्यावर भक्ति नष्ट होत नाहीं हें ठरलें. निर्गुण व सगुण हा भेद नाथ सांगत नाहींत. ते म्हणतात " निर्गुणीं पावले सगुणीं भजतां ॥ विकल्प धरितां जिव्हा झडे ॥ " यावरून अज्ञानी असो किंवा ज्ञानी असो; सगुण भक्तिच करावी लागते असें ठरतें. मात्र इतकेंच कीं, अज्ञान्याला द्वैतरूपानें व ज्ञान्याला अद्वैतरूपानें सगुण भक्ति घडते. निर्गुणभक्ताला तिन्ही देहांहून निराळें झाल्याशिवाय ज्ञान होत नाहीं. व अशा जीवज्ञानानें त्याला फार कष्ट होतात असें गीतेंतही सांगितलें आहे. " क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ॥ अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥ " म्हणजे निर्गुणभक्ताला उलटे कष्टच फार होतात. यावरून सगुणभक्तीनेंच क्लेशांचें निवारण होतें असें झालें. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, निर्गुण सुवर्ण व सगुण अलंकार हे दोन्ही एकच आहेत, एकावांचून एक निराळे राहूं शकत नाहींत. म्हणजे सोन्यावांचून अलंकार व अलंकारावांचून सोनें पाहतां येत नाहीं, त्याप्रमाणें सगुणावांचून निर्गुण कधींच मिळत नाहीं. सगुण म्हणजे स्वतःचेच स्वातंत्र्यादिक धर्म ज्यास आहेत असा सधर्म परमेश्वर. आणि निर्गुण म्हणजे हे धर्म ज्यास नाहींत असा निर्धर्म परमेश्वर. ज्ञानेश्वरींत अनंत तऱ्हेनें या विषयाचें निरूपण केलें आहे. आणि भक्तिपदतीर्थामृतांतही या विषयाचें स्पष्ट निरूपण आहे. ज्ञानेश्वरींत म्हटलें आहेः—" जिहीं सकळ भूतां-

चिया हितीं । निरालंबीं अव्यक्तीं । पसरलिया आसक्ति । भक्तिविणें ॥ १ ॥ तया महेंद्रादि पदें । करितातिं वाटवधें । आणि ऋद्धिसिद्धींचीं द्वंद्वें । पडोनि ठाति ॥ २ ॥ ” ज्या लोकांनीं निर्गुण परमेश्वराचे ठिकाणीं भक्तीवांचून आपली आसक्ति पसरली आहे त्यांना इंद्रादि पदें वाटमारे होतात. व ऋद्धिसिद्धी आड येतात. हीं दैवी विघ्नें होत. याशिवाय शारीरिक विघ्नेंही त्याला अनेक असतात; तीं अशीं:—निर्गुणभक्ताला सर्व सोडावें लागतें, तें इतकें कीं:—कामक्रोधाचे विलग । उठावती अनेग । आणि शून्येंसि आंग । झुंझवावें कीं ॥ ताहानें ताहानचि पियावी । भुकेलिया भूकचि खावी । अहोरात्र वावीं । ममावा वारा॥ उनिदीयाचें पहुडणें। निरोधाचें वेल्हावणें । झाडासि साजणें । चावळावें गा ॥ शीत वेढावें। उष्ण पांघुरावें। वृष्टीचिया असावें। घरा आंत॥ किंबहुना पांडवा। अग्निप्रवेश नित्य नवा। भ्रताराविण करावा। तो हा योग॥ ” × × × “ ऐसें मृत्युहूनि तिख । कां घोटे कढत विख । डोंगर गिळतां मुख । न फाटे काई ॥ ह्मणोनि योगाचिया वाटा । जे निगाले गा सुभटा । तया दुःखाचाचि वांटा । भागा आला ॥ पाहे पां लोहाचे चणे । जैं बोचरिया पडती खाणें । तैं पोट भरणें कीं मरणें । शुद्धि नेणें ॥ ” अन्न खालें तर नैवेद्य दाखविला पाहिजे, म्हणून निर्गुणभक्ताला भुकेनेंच भूक खावी लागते,—ताहानेनेंच ताहान प्यावी लागते, वावानें वारा भोजावा लागतो, कारण आलिंगन देण्यास कोण आहे ? त्याला थंडी नेसावी लागते, व उष्ण पांघरावें लागतें, आणि वृष्टीच्या घरांत राहावें लागतें ! ! शेवटीं त्याला झाडाशीं मित्रता करावी लागते. तर हें अघटित भयंकर होणेंच शक्य नाहीं. व कष्ट करून प्राप्त झालं तरी सगुणभक्तापेक्षां जास्त कांहीं मिळतें असेंही नाहीं. त्याला क्लेश मात्र जास्त होतात.

दांत नाहींत त्याला लोखंडाचे चणे खावे लागले तर त्याचें पोट भरेल कीं तो मरेल ? शेवटीं एक ओवी:—" यालागीं पांगुळा हेवा । नव्हे वायूसि पांडवा । तेविं देहवंतां जीवां । अव्यक्तीं गति ॥ " लंगड्यानें म्हटलें कीं मी वायूशीं शर्यत बांधीन तर तें जितकें अशक्य होईल तितकीच देहधारी जीवांना निर्गुण उपासना अशक्य आहे. इतकेंही असून " ऐसाही जरी धिंवसा । बांधोनियां आकाशा । झोंबती तरी क्लेशा । पात्र होती ॥ " आकाशालाच झोंबण्याचें कोणी धाडस करील तर त्याला क्लेश मात्र होतील ! ! दुसरें कांहीं नाहीं. म्हणून जीवांना निर्गुण उपासना होतच नाहीं.

शिष्य—महाराज, पंचदशींत म्हटलें आहे कीं, निर्गुण उपासनेंत भीति नसतां हे सगुणभक्त उगीच भितात. तर यावरून सगुणाचा निषेध होत नाहीं काय !

गुरु—अरे, हा केवळ सविकल्प समाधीवर तडाका आहे. यावरून सगुणाचा निषेध मुळींच होत नाहीं. येथें निर्गुणाची प्रशंसा आहे, ती माध्व वगैरे द्वैतवादी सगुणभक्तांचा निषेध करण्याकरितां आहे. कारण ते असें मानतात कीं, विष्णु हा वैकुंठांतच आहे. समजा, चित्रांतली सूर्याची मूर्ति हीच मोठी आहे असें कोणी मानूं लागला तर त्याला सांगावें लागेल कीं, बाबारे, चित्रांतील सूर्य मोठा नाहीं तर प्रभा मोठी आहे. येवढ्यानें चित्रांतल्या सूर्याचा निषेध झाला, पण खऱ्या सूर्याचा कांहीं निषेध झाला नाहीं, किंवा त्याच्या प्रभेचा नाशही झाला नाहीं. त्याप्रमाणें वेदांतांत निर्गुणाची प्रशंसा करून विष्णुच मोठा मानणारे माध्व वगैरे द्वैतवादी यांचा निषेध केला आहे. अद्वैत सगुणभक्तीचा मुळींच निषेध केला नाहीं. कारण सर्व निर्गुणाचा सांठा तो सगुणच. " चित्पद सगुण " असें नाथांचेंही म्हणणें आहेच.

यावरून केवळ निर्गुणउपासकांना मात्र क्लेशच होतात असें झालें. श्रीमद्भागवतांत ब्रह्मस्तुतींतही अशीच उक्ति आहे:—

श्लोक—" श्रेयः स्रुतिं भक्तिमुदस्य ते विभो क्लिश्यंति ये केवलबोधलब्धये ॥ तेषामसौ क्लेशल एव शिष्यते नान्यद्यथा स्थूल-तुषावघातिनाम् ॥ "

ब्रह्मदेव म्हणतात, भगवन् ! पुण्यप्रभावयुक्त भक्तीचा त्याग करून जे केवळ ज्ञानासाठींच कष्ट करणारे आहेत, त्यांचे कष्टच शिल्लक राहतात. कसे तर धान्याचा कोंडा कांडणाराप्रमाणें; असो. भगवान् शेष हे भक्त्यर्थच सहस्रशीर्ष झाले. त्यांनाही अनंत असें म्हटले आहे. सर्व ब्रह्मांडाला धरून ठेवणारी जी शक्ति तो शेष. किंवा शेष म्हणजे ब्रह्मांडांतील पदार्थांच्या स्थिरतेमध्यें असणारी जी शक्ति ती. आणि पालन करणारी शक्ति तो विष्णु. आतां पतंजल्याचार्य हे शेषाचा अवतार असल्यामुळें ते भक्तीचेच पुर-स्कर्ते झाले तर ते भक्तीचा कमीपणा कसा दाखवितील ? म्हणून ह्या सूत्रांत एकतत्व म्हणजे ब्रह्मच घेतलें आहे. तर एकंदरींत सगुणभक्ताला क्लेश होत नाहींत. ओवी ज्ञानेश्वरी:—"म्हणोनि येर ते पार्था । नेणतीचि हे व्यथा । जे कां भक्तिपंथा । वोठं-गले ॥ " देवाची अशी प्रतिज्ञा आहे कीं " माझिया भक्ता । आणि संसाराची चिंता । काय समर्थाची कांता । कोरान्न मागे ? ॥ " भगवान् म्हणतात:—" तेषामहं समुद्धर्ता मृत्यु-संसारसागरात् । भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ॥ " फार तर काय मी त्यांचा उद्धार करणारा आहें, म्हणजे त्यांना कोणतीच भीति नाहीं. देव आणखी म्हणतात:—" किंबहुना पांडवा । करूनि मूर्तींचा मेळावा । तयांचिया गांवा । धांवत आलों ॥ " मी जरी सर्वव्यापक आहें तरी सुंदर साजरी मूर्ति धरून मी त्यांच्या गांवास धांवत आलों. तर यावरून या सूत्रांत

आणि मागल्या सर्व सूत्रांत सगुणभक्तिच सांगितली आहे हें ठरलें.

सगुणभक्ति सांगितली म्हणून नुसतें सगुणच मानलें व निर्गुण मानलें नाहीं तरी चुकतें. अलंकारच ज्याला ठाऊक आहेत व सोनें ठाऊक नाहीं तो पितळेचेही अलंकार घेईल. अलंकारावांचून सोनें पाहतां येत नाहीं, हें खरें; पण ते अलंकार सोन्याचे आहेत हें कळलें पाहिजे. त्याप्रमाणें नुसतें सगुणच घेऊन बसले आणि निर्गुण परमेश्वराचें ज्ञान नसलें तर आपण आकारच सत्य मानूं. असें झालें म्हणजे नुसत्या बायकोच्या अगर देवतेच्याच सुंदरपणानें मन मोहून जाईल. ब्रह्मज्ञान होणार नाहीं. म्हणून निर्गुणही जाणलें पाहिजे. ब्रह्मज्ञान हें जगाशीं अभेदरूपानें झालें पाहिजे. त्याप्रमाणें परमात्म्याचें निर्गुणरूप व सगुणरूप हे दोन्ही समजले पाहिजेत. भगवान् म्हणतात:—"अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यंते मामबुद्धयः। परंभावमजानंतो ममाव्ययमनुत्तमम्॥" माम् अबुद्धयः व्यक्तिमापन्नं मन्यंते, मम अव्ययम् अनुत्तमम् परंभावम् अजानन्तः। अबुद्धयः. म्हणजे मूर्ख लोक माझा अव्यय, अनुत्तम म्हणजे सर्वांहून श्रेष्ठ असा परंभाव म्हणजे प्रत्यक्चेतनरूप भाव न जाणून मला निर्गुणाला सोडून सगुणच म्हणजे जीवच मानतात. सगुण म्हणजे पराक्चेतनभाव असलेला नुसता साकार जीवच मी आहें असें मानतात, व सगुणच घेऊन बसतात. पुनः गीतेच्या ९ व्या अध्यायांत म्हणतात:—

"अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम्। परंभावमजानन्तो मम भूतमहेश्वरम्॥ मोघाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतसः। राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिताः॥ आसुरी म्हणजे चंचळ किंवा रजोगुणी व राक्षसी म्हणजे दुःखरूप किंवा तमोगुणी. भगवान् म्हणतात:—रजतमाच्या स्वाधीन होऊन ज्यांचा सत्वगुण वाढला नाहीं असे राक्षसी, आसुरी, व मोहिनी प्रकृ-

तीचे लोक मला मनुष्यच समजतात. यावरून नुसतें सगुण मानणारेही देवाला आवडत नाहींत. तर दोन्ही जाणले पाहिजेत.

आतांपर्यंत सगुणपक्षीय रीति सांगितली. आतां माझ्या मतें या सूत्रानें निर्गुणपक्षीय रीति सांगतात. या सूत्रांत एकतत्वाभ्यास सांगितला आहे. एकतत्व म्हणजे " एकमेव तत्वं जगति नान्यत् इति एकतत्वम् " म्हणजे या सर्व जगांत एकच तत्व—चैतन्यरूप निर्गुण परमात्माच—व्यापला आहे. त्याहून दुसरा कोणी नाहीं. हें तुला मी जास्त स्पष्ट करून सांगतों. सोनें व अलंकार जसे एकरूपच असतात तसे रामकृष्णादि अवतार व ब्रह्म हे एकच आहेत. नाथ ह्मणतातः—सगुणाला सोडून चित् हें निराळें पाहतांच येत नाहीं. पण एवढ्यावरून निर्गुण नाहीं असा मात्र अर्थ नाहीं. सत्, चित्, आनंद हे तिन्ही एकच आहेत. आहेपणा निराळा केला तर ज्ञान हें असत् होईल ह्मणून हे तिन्ही एकरूपच आहेत. म्हणजे सगुण व निर्गुण हे एकच आहेत. असें आहे तरी निर्गुण नाहीं असें मात्र कोणीं समजूं नये, हें वर सांगितलेंच आहे. स्वात्मसुखांत नाथ म्हणतातः—"सत् तेंचि चित्। चित् तेंचि आनंद। वस्तु नोहे त्रिविध। एक पद निजांगें ॥" अमृतानुभवांत ज्ञानेश्वरमहाराज म्हणतातः—" सत्ताचि कीं सुख प्रकाशु। प्रकाशुचि सत्ता उल्हासु। हे न निवडे मिठांशु। अमृतीं जेवीं ॥ " सत् हेंच चित् आणि आनंदरूप आहे. हे परस्पर पृथक काढण्यांत अर्थ नाहीं, तर एकरूपच आहेत. अमृत आणि गोडी जशी निराळी निवडतां येत नाहीं आणि निवडण्यांत अर्थही नाहीं, त्याप्रमाणें परमेश्वराचे आंगीं सच्चिदानंद हे तिन्ही गुण एकपणानें आहेत.

शिष्य—महाराज, सत्, चित् आणि आनंद हे तिन्ही गुण एकपणानें आहेत तर आपल्या बुद्धीनें ते निरनिराळे कां भासतात ?

गुरुः—त्याचें कारण असें आहे कीं, तिन्ही गुण एकच आहेत तरी ते समजण्याला बुद्धीच्या निरनिराळ्या तीन वृत्ति लागतात, म्हणून आपण त्यांना निरनिराळे तीन म्हणतों. उदाहरण—साखर आणि गोडी हे दोन्ही एकच आहेत, तरी ते कळण्याला दोन इंद्रियांचें साह्य घ्यावें लागतें. साखरपणा कळण्याला ती हातांत घेतली पाहिजे व गोडी कळण्याला तोंडांत टाकली पाहिजे. त्याप्रमाणें परमेश्वराचे अंगीं सच्चिदानंद हे तिन्ही गुण एकपणानें आहेत तरी ते कळण्याला बुद्धीच्या तीन वृत्तींचें साह्य घेतलें पाहिजे. आहेपणाच्या वृत्तीनें सत् कळतें. निश्चयाच्या वृत्तीनें चित् म्हणजे ज्ञान समजतें. व सुखाच्या वृत्तीनें आनंद समजतो. याप्रमाणें सत्, चित्, व आनंद हे कळण्याला तीन वृत्ति लागतात; म्हणून आपण त्यांना निरनिराळे तीन म्हणतों. वास्तविक ते तिन्ही एकच आहेत. जसें साखर कळण्याला ती हातांत घ्यावी लागते व गोडी कळण्याला ती तोंडांत टाकावी लागते, तसें सगुण व निर्गुण एक आहेत तरी सगुण कळण्याला प्रीतीचें म्हणजे भक्तीचें, आणि निर्गुण कळण्याला ज्ञानाचें साह्य घेतलें पाहिजे. ह्याकरितां "एकतत्वाभ्यास" करावा. एकतत्वाभ्यास म्हणजे ज्ञानाच्या योगानें ब्रह्म चैतन्यरूप आहे असें पाहणें. भगवान् गीतेंत म्हणतातः—"समं सर्वेषु भूतेषु तिष्ठंतं परमेश्वरं । विनश्यत्स्वविनश्यंतं यः पश्यति स पश्यति ॥" म्हणजे प्रत्यक्चेतन नाश पावत नाहीं व तें सर्व भासाच्या ठिकाणीं एकच आहे असें जो जाणतो तोच परमात्मतत्व जाणतो.

शिष्यः—महाराज, एकतत्वाभ्यासानें ज्ञान व भक्ति दोन्ही कशीं साध्य होतात तें चांगलें समजलें नाहीं.

गुरुः—आपण राजाच्या भेटीला जातों तेव्हां त्याच्या व्य-

त्काला डोळ्यानें पाहतों व त्याचें सामर्थ्य मनांत असतें. तसें सगुण-भक्ति करावी तेव्हां मूर्तीचें ध्यान धरावें, परंतु तो परमात्मा सर्व-व्यापक आहे हें महात्म्यज्ञान मनांत ठेवावें. हेंच निर्गुण होय. ह्याला दुसरें उदाहरण अलंकाराचें. अलंकार आपण डोळ्यानें पाहात असतों पण सोनें मनांत असतें. मनानें सगुणाचें ध्यान व त्याच्या सर्वव्यापकतेच्या माहात्म्याची आठवण हा एकतत्वाभ्यास होय. " एकं तत्वंच अभ्यासश्च एकतत्वाभ्यासः " येथें एक-तत्वानें जाणीव दाखविली, व अभ्यासानें भक्ति दाखविली. सगुणध्यानानें प्रेमसुख घ्यावें व निर्गुणानें परमात्मा ब्रह्मांडभर व्यापक आहे असें समजावें. उदाहरण—दिवा हा सगुण आणि प्रकाश हा निर्गुण आहे. तशी कस्तुरी ही सगुण आणि सुवास हा निर्गुण होय. त्याप्रमाणें भगवंताच्या सगुणव्यक्तीचें ध्यान करावें व निर्गुणानें त्याचें सामर्थ्य जाणावें. हा जो एक-तत्वाभ्यास तुला सांगितला हा सर्व धर्माचें बीज आहे. जो हा एकतत्वाभ्यास जाणतो तो अज्ञानी नसतो. या अभ्यासांत चित्त एकाग्र करावें लागतें. यालाच पंचदशींत एकपरत्व म्हटलें आहे.

" तच्चिंतनं तत्कथनं तदन्योन्यप्रबोधनम् ।
एतदेकपरत्वंच ब्रह्माभ्यासं विदुर्बुधाः ॥"

म्हणजे सगुण व निर्गुण ब्रह्माचेंच चिंतन करावें. निर्गुणरूपानें त्याचें ज्ञान परस्पर करून घ्यावें व करून द्यावें. रामदासस्वामी म्हणतात, " जितुकें कांहीं आपणास ठावें । तितुकें हळुहळू शिक-वावें । शहाणें करून सोडावें । सर्व जना ॥ " व सगुणरूपानें त्याच्या कथा गाव्या. नेहमीं याप्रमाणें राहणें हेंच एकपरत्व होय. " एतदेकपरत्वंच ब्रह्माभ्यासं विदुर्बुधाः" एक ह्मणजे ब्रह्म. वर सांगितल्याप्रमाणें नेहमीं एकपरत्व राहणें यालाच पंडित ब्रह्मा-

भ्यास किंवा एकतत्वाभ्यास म्हणतात, यांत भक्तिद्वारा चित्त एकाग्र करावें असें सांगितलें आहे.

बौद्धमतानुयायी ही गोष्ट मानीत नाहींत. ते म्हणतात, चित्त हें क्षणोक्षणीं नवीन उत्पन्न होतें. पण असें झालें तर तें एका वृत्तीवरच उत्पन्न होईल, म्हणजे नेहमीं एकाग्रच राहील. एक चित्त अनेक पदार्थांवर जातें तेव्हांच तें चंचल होतें. चित्त एकाग्रच असतें तर अभ्यास कशास पाहिजे? कारण निमिषानिमिषांत चित्त उत्पन्न झालें तर तें एकाग्रच उत्पन्न झालें पाहिजे; मग तें एकाग्र करण्यास योगाचा अभ्यासच नको. पुन्हां त्या बौद्धमतांत आणखी एक मजा आहे. त्या मतांत आत्मा चित्ताहून निराळा मानला नाहीं. मग आत्माही निराळाच उत्पन्न होत असला पाहिजे. मग कालचा मनुष्य आज ओळखतां येऊं नये, पण तो तर ओळखतां येतो. म्हणून योग व ज्ञान त्यांच्यांत संभवत नाहीं. बौद्धमतांत योगग्रंथ आहेत, पण त्यांच्यांत योगाचा अभ्यास निष्फळ आहे.

आपल्या मतांत योगाच्या व वेदांताच्या रीतीनें चित्त एकच आहे, पण विषय पुष्कळ असल्यामुळें तें चंचल होतें म्हणून तें एकाग्र करण्याकरितां आम्हांस योगाचा अभ्यास घडतो. याकरितां आपल्यांत तो सफळ आहे. पण त्यांच्यांत ( बौद्धमतांत ) योगाचा अभ्यास निष्फळ आहे, हें वर सांगितलेंच आहे. येथपर्यंत बौद्धमत खोडलें गेलें.

शिष्य—चित्त एकच असल्यामुळें चंचल राहणें हा त्याचा धर्मच आहे. जसा पाण्याचा धर्म वहात राहावें हाच आहे, त्याप्रमाणें. मग चित्ताचा निरोध कसा संभवेल?

गुरु—हें तुझें म्हणणें बरोबर नाहीं. मग जेवते वेळीं लघ्वीची वृत्ति आली तर चित्ताचा रोध करून जेऊं नये असें होईल. म्हणून चंचल राहणें हा कांहीं चित्ताचा धर्म नव्हे. " चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् । तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥ " असें अर्जुनानें विचारलें असतां देवानें त्याला सौम्यपणानें हें उत्तर दिलें आहे:—" असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् । अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येण च गृह्यते ॥ ' देव ह्मणतात, अर्जुना, मन हें चंचल आहे खरें. परंतु अभ्यासानें व वैराग्यानें तें एकाग्र होतें. " अभ्यासवैराग्याभ्यां तन्निरोधः " हें सूत्रही मागें गेलेंच आहे. येथें अभ्यास कोणता ह्मणशील तर एकतत्वाभ्यास. ज्ञानेश्वरमहाराज ह्मणतातः—" परि मनाचें एक निकें । जे देखिलिया गोडीचिया ठाया सोके । म्हणूनि अनुभवसुखाचीं कवतिकें । दावीत जाइजे ॥ ' मनाचा स्वभाव असा आहे कीं, तें जेथें गेलें तेथेंच गुंतून पडतें. ह्मणून त्याला वेदांताच्या व योगाच्या रीतीनें स्वात्मानुभवाचें आश्चर्य दाखवीत जा. खरेंच आहे. सुंदर स्त्री पाहिली असतां तिच्यावर मन एकाग्र होतें. मग त्याला आत्मसुखाचें कौतुक दाखविलें असतां तें आत्मस्वरूपावर एकाग्र होणार नाहीं असें थोडेंच आहे ? हा एकतत्वाभ्यास झाला. इतर टीकाकारांनीं अभ्यास शब्दाचा अष्टांगयोग असा अर्थ केला आहे, पण मला वाटतें कीं, हा अभ्यास ह्मणजे एकतत्वाभ्यास किंवा ब्रह्माभ्यासच घ्यावा. असो.

तर य प्रमाणें भक्ति आणि ज्ञान यांच्या योगानें चित्तनिरोध होऊन समाधि साधतो. समाधींत परमेश्वराशीं आपण एक राहतों व वृत्तीवर आलों तर पूजा वगैरे सगुणसेवा आहेच.

॥ साधनानें म्हणजे भक्ति आणि ज्ञान यांच्या योगानें शुद्ध त्वगुण वाढल्यामुळें रागद्वेष नाहींसे होऊन सर्व विघ्नें दूर ोतात. रागद्वेषनिवृत्ति होण्याला एकतत्वाभ्यासच केला पाहि- ।. ही गोष्ट वैद्यशास्त्रालाही संमत आहे. ( वाग्भट ) अष्टांगहृद- ांत मंगलाचरणांत म्हटलें आहे:—

" रागादिरोगान् सततानुशक्तानशेषकायप्रसृतानशेषान् । औ- सुक्यमोहारतिदान् जघान योऽपूर्ववैद्याय नमोस्तु तस्मै ॥१॥

वाग्भट ग्रंथकार म्हणतात:—शरीराच्या निरनिराळ्या स्थानांत ाहणारे कफ, वात, पित्तादि दोष हे औषधानें जातात, पण ततानुशक्तान् म्हणजे सर्व शरीरभर नेहमीं राहणारे जे रागादि ोग आहेत ते कितीही औषध दिलें तरी दूर होत नाहींत. राग हणजे विषयप्रीति आणि विषय न मिळाला तरी त्याविषयीं ीति किंवा इच्छा मनांत राहणें तो मोह होय. विषय भोग- याची जी इच्छा तिला रति म्हणतात. ही रागादि रोगांनं ोते, व औत्सुक्य म्हणजे प्रवृत्ति हीही रागाशिवाय होत नाहीं. रागद्वेष सर्व शरीरभर राहतात. म्हणून हे रागादिरोग ज्याच्या ोगानें निवृत्त होतात अशा त्या अपूर्व म्हणजे ज्याच्यापूर्वीं ोणीही झाला नाहीं अशा किंवा पूर्ववैद्याला म्हणजे ईश्वराला मस्कार असो. याप्रमाणें कोणत्याही वैद्यशास्त्राच्या दृष्टीनेंही कतत्वाभ्यासच पाहिजे.

सारांश, आपलें चित्त नेहमीं समाधान राहिलें पाहिजे. मग ापण जगांत वापरो किंवा कोठेंही असो. सर्व विघ्नें म्हणजे िक्षेप हे ज्याचें चित्त चंचल आहे त्यालाच होतात. पण समा- ित म्हणजे समाधिस्थ चित्त ज्याचें आहे त्याला होत नाहींत. ंतरायाभाव म्हणजे विघ्नांचा नाश होणें हें जरी प्रणिधानाचें

गौणफळ सांगितलें आहे तरी सर्व विघ्नांचा एकदम नाश क
ण्याला त्या विघ्नांचें मूळ जी अविद्या तीच काढून टाकावी. ह
गोष्ट ज्ञानाशिवाय व्हावयाची नाहीं म्हणून एकतत्वाभ्या
म्हणजे ब्रह्माभ्यास करून अविद्या नाहींशी करावी. अवि
ही सर्व क्लेशांचें मूळ आहे, हें साधनपादांत सांगतील. य
प्रमाणें सांख्य, योग, वेदांत आणि वैद्यक या सगळ्यांच्या रीती
एकतत्वाभ्यास सांगितला.

आतां शुद्ध सत्वगुण वाढण्याला जरी एकतत्वाभ्यास मुख
सांगितला आहे तरी चित्त समाधान राहण्याला रागद्वेषनिवृ
आणि अनुताप या दोन गोष्टी पाहिजेत. त्या मिळण्याचा उपा
पुढल्या सूत्रानें सांगतात:—

**" मैत्रीकरुणामुदितोपेक्षाणां सुखदुःखपुण्यापुण्य-**
**विषयाणां भावनातश्चित्तप्रसादनम् ॥ ३३ ॥ "**

राग द्वेष दूर होण्याकरितां आणि अनुताप होण्याकरितां
गाशीं वागण्याचे चार आणि स्वतःशीं वागण्याचे चार असे अ
प्रकार आहेत. ते तुला क्रमानें सांगतों:—

प्रथम रागद्वेष दूर होण्याकरितां जगाशीं असें वागावें:—

१ **मैत्री**—धनवान् सुखी लोकांशीं मित्रता ठेवावी. त्यां
द्वेष करूं नये. मित्राचें सुख इच्छितो तोच मित्र हो
पण त्याला कांहीं मागूं नये. कामासाठीं मागणा
तो सुहृत् समजावा. तर माझ्या मित्राला सु
आहे, तो असाच सुखी असो, असें म्हणून त्या
मैत्री करावी.

२ **करुणा**—दुःखी लोकांवर करुणा करावी. होईल त्या री
नें त्यांचें दुःख दूर करावें.

३ **मुदिता**–पुण्यवान् जे आहेत त्यांच्याविषयीं आनंद मानावा. आपली आवडती वस्तु भेटली असतां जसा आनंद वाटतो तसा त्यांच्या भेटीचा आनंद मानावा.

४ **उपेक्षा**–पापी आहेत त्या लोकांची उपेक्षा करावी. त्यांच्यावर प्रीति करूं नये किंवा त्यांचा द्वेषही करूं नये, तर त्यांच्या विषयीं उदास रहावें ह्मणजे चित्त प्रसन्न होतें.

अशी चार प्रकारच्या लोकांविषयीं चार प्रकारची वृत्ति झाली सतां रागद्वेष निवृत्त होतात, आणि वृत्ति समाधान राहते.

आतां अनुताप होण्याकरितां स्वतःशीं कसें वागावें तें ांगतों:—

१ **सुख**–आपल्याला जर विषयसुख असलें तर त्याविषयीं मैत्री ठेवूं नये. तर तें क्षणिक आहे म्हणून त्यांत दोष पाहावे.

२ दुःख–आपण दुःखी असलों तर परमेश्वरास करुणा भाकावी. आर्या मोरोपंतः—"तूं सागर करुणेचा देवा तुजलाचि दुःख सांगावें ॥ तुजवांचुन इतरातें दिनमुख पसरोनि काय मागावें ? ॥"

३ **पुण्य**–आपण पुण्यवान् असलों तर स्थिरबुद्धि रहावें. त्याचा आनंद मानूं नये. उदासीन रहावें.

४ **अपुण्य**–आपण पापी असलों तर आपणच आपला द्वेष करावा.

ह्या चार वृत्तींनीं स्वतःशीं वागणूक केली असतां अनुताप तो. व ह्या चार वृत्ति वरच्यांहून उलट आहेत हें अनुभवानें

ठरतें. अशा ह्या अष्ट वृत्तींनीं जो वागतो व मागचें ईश्वरप्रणि धान करितो त्याचें चित्त समाधान होतें, व तो ईश्वरास मिळतो याप्रमाणें " ईश्वरप्रणिधानाद्वा " या सूत्रापासून आतांपर्यंत ईश्वरप्रकरण संपलें. आतां ह्या शेवटल्या सूत्राबद्दल आणखी थोडेंसें तुला सांगावयाचें आहे. तें उपसंहारादाखल सांगू. या ईश्वरप्रकरणासंबंधीं पुराणांतले कांहीं श्लोक वगैरे वार्तिक कारांनीं घेतले आहेत त्यांचें भाषांतरही उद्यां सांगूं.

श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

---

# श्री ज्ञानराजमाउली.

२७।१०।१९०७

**" मैत्रीकरुणामुदितोपेक्षाणां सुखदुःखपुण्यापुण्यविषयाणां भावनातश्चित्तप्रसादनम् "॥३३॥** (पुढें चालू)

श्लोक—योगशास्त्रेश्वरस्योक्तो विरहो दुःखदायकः ॥
सोपि श्रीकृष्णसंभोगात्सांततां यातुद्रागिति ॥ १ ॥

याप्रमाणें मंगल केल्यावर ईश्वरप्रकरणाचा उपसंहार सांगण्या करितां पुढें निरूपण करितातः—

**गुरु**—रागद्वेषनिवृत्ति आणि अनुताप हे होण्याकरितां का तुला मैत्री, करुणा वगैरे आठ अंग सांगितले. त्या आठ अंगां पैकीं चार अंग पतंजलीशास्त्रांत सांगितले आहेत. बाकीचे चार सांगितले ते माझ्या अनुभवाचे आहेत. त्यांचा सार असा कीं, साधकानें सुखी पुरुषाशीं मैत्री करावी, दुःखिता

दया करावी, पुण्यवानावर प्रीति करावी, आणि दुर्जनांची उपेक्षा करावी. व याच्याच उलट प्रकारानें स्वतःशीं वागणूक ठेवावी; म्हणजे आपल्यास विषयसुख असलें तर त्याविषयीं मैत्री ठेवूं नये. त्यांत दोष पहावेत. आपण दुःखी असलों तर परमेश्वराची करुणा भाकावी. पुण्यवान् असलों तर आनंद न मानतां उदासीन राहावें व पापी असलों तर आपण आपला द्वेष करावा. यांतून वागणूक चुकली असतां कोणी केंव्हांही संत होण्याची आशा धरूं नये.

वर ज्या चार भावना लोकांशीं वागण्याच्या सांगितल्या त्यांच्या योगानें रागद्वेषनिवृत्ति होते आणि आपल्या स्वतःविषयीं ज्या चार भावना सांगितल्या त्यांच्या योगानें आपल्यास अनुताप होतो. अनुतापानें दोषांची निवृत्ति होते व रागद्वेषनिवृत्तीनें चित्त सर्वदां उल्हासयुक्त राहतें. तर याप्रमाणें चित्त सर्वदां समाधान राहण्यास रागद्वेषनिवृत्ति व अनुताप हींच दोन कारणें आहेत, व त्याला उपाय मैत्र्यादिक भावना हाच आहे. अशा प्रकारें वागणारा जो असतो त्याचें समाधान लोकांत राहून देखील भंगत नाहीं.

आतां यापुढें तुला जें निरूपण आज सांगावयाचें आहे तें या सूत्रांत घेतलें नाहीं. कारण येथें विवेकख्याति सांगावी लागते. व विवेकख्यातीचें सूत्र साधनपादांत सांगितलें आहे. पण पुढील निरूपणांत योग व सांख्य यांच्या मिळणीचें रहस्य असल्यामुळें ती विवेकख्याती या ईश्वरप्रकरणांत सांगून ठेविली पाहिजे. म्हणजे मी सांगितलेला एकतत्वाभ्यास सांख्य, योग व वेदान्त या तिन्ही शास्त्रांच्या दृष्टीनें करतां येईल.

मैत्र्यादिक भावनांचें फल रागद्वेषनिवृत्ति वगैरे जें वर सांगितलें तेंच परमात्मा गीतेंतही सांगतातः—

आरंभ करावयाचा आहे तर मिश्र सत्वगुण तरी पाहिजे. तर याप्रमाणें हे मिश्र सत्वाचे धर्म सांगितले. त्यांच्या योगानें ईश्वरप्रकरणांत सांगितलेला योग करण्याचा मात्र अधिकार येत नाहीं. साधक जेव्हां समाधिपादांतल्या योगाला अधिकारी होतो व तो लोकांत वागायला लागतो तेव्हां तो शुद्ध सत्वगुणी होतो.

प्रकृति ही तीन गुणांची असल्यामुळें दोन गुण कमी राहतात व एक गुण वाढतो हें वर सांगितलें; परंतु एक गुण कितीही वाढला तरी बाकीचे दोन गुण राहतातच. केवळ शुद्ध सत्वगुण ईश्वरालाच असतो. पण प्रकृतींतून दोन गुण पृथक काढले तर प्रकृतीचा नाश होण्याचा संभव आहे. ही शंका मागें ईश्वराचा सत्वगुण सांगतांना निराकरण केली आहे. (पृष्ठ८० पहा) तरी आणखी तुला आज जास्त स्पष्ट करून सांगतों. तीन गुणांची साम्यावस्था म्हणजे प्रकृति असें सांख्यांत म्हटलें आहे. किंवा तीन गुण म्हणजेच प्रकृति. आतां तीन गुणांच्या मिश्रणांतून ईश्वरानें सत्वगुण निराळा काढला तर संयोगी वस्तु नाश पावण्याचा संभव असला तरी त्यामुळें ईश्वराची कांहीं हानी नाहीं. दुसरी गोष्ट ईश्वराशिवाय प्रकृतीच्या तीन गुणांतून सत्वगुण कोणास निराळा काढतां यावयाचाच नाहीं. जसें सर्व रस मातींत आहेत—आणि यावरूनच पृथ्वीला रसा असें म्हटलें आहे. नुसती माती तोंडांत घातली तर चव लागत नाहीं; पण आंब्याचें झाड लावलें तर त्याच्या बीजाला पृथ्वींतला गोड रस शोषून वर घेतां येतो. आंबट वृक्षाच्या बीजाला आंबट रस पृथ्वींतून वर शोषून घेतां येतो. हे रस पाण्यांतून घेतां येतात म्हटलें तरी चालेल. कारण “अद्भ्यः पृथ्वी” म्हणजे पाण्यापासूनच पृथ्वी झाली, व “पृथिव्या ओष-

धयः" पृथ्वीपासून वनस्पति झाल्या. तर याप्रमाणें प्रत्येक झाडाचीं बीजें आपापले रस घेत असतात. उदाहरण, चिंच, मिरची वगैरे. नैय्यायिक देखील ह्मणतात कीं, जिभेनें समजणारा गुण रस आहे. हा सहा प्रकारचा आहे. गोड, आंबट, खारट, तिखट, तुरट आणि कडू. या सहा रसांच्या मिश्रणानें अनंत रस तयार होतात. नैय्यायिक ह्मणतात हा रस पृथ्वी आणि जल यांत राहतो. याला प्रमाण तर्कसंग्रह. श्लोक "रसनग्राह्यो गुणो रसः सचमधुराम्ललवण कटुकषायतिक्त भेदात्षड्विधः । जले मधुर-एव।"

म्हणजे पृथ्वीच्या ठिकाणीं ६ प्रकारचा रस राहतो. जला च्या ठिकाणीं एकाच प्रकारचा राहतो. नैय्यायिकांनीं झाडांच्या बीजांत रस राहतो असें म्हटलें नाहीं. तर "पृथिव्या ओषधयः" ह्या श्रुतीप्रमाणेंच त्यांचेंही म्हणणें आहे. तर ज्या जातीचें झाड असेल त्याचें बीज पृथ्वींतील रसांचें पृथक्करण-करून आपल्याला अनुकूल असा रस वर शोषून घेतें. आंब्याच्या झाडाचें बीं गोड रसाचें पृथक्करण करून तो गोड रस पृथ्वींतून शोषून घेतें. चिंचेचें बीं पृथ्वींतला आंबट रस घेतें. तसेंच मिरच्यांचें झाड हें तिखट रसाचें पृथक्करण करतें. हिरड्याचें झाड हें तुरट रसाचें पृथक्करण करतें व निंबाचें झाड कडू रसाचें पृथक्करण करतें. खारट रसाचें पृथक्करण करणारें झाड मला माहीत नाहीं. पण अशीं झाडें असतील अशी मला खातरी आहे. कांहीं झाडें मिश्र रस घेतात. जसें हरभऱ्याचें झाड. यांत आंबट व खारट हे रस मिश्र असतात. याप्रमाणें पृथ्वी ही सर्व रसांचें मिश्रण असून झाडें हीं त्या रसांचें निरनिराळें पृथक्करण करतात हें तुला समजलें.

असें आहे तरी पृथ्वींतील सर्व रस मात्र झाडांत येत नाहींत. तर जरूरीपुरते येतात, म्हणून पृथ्वी नाश पावत नाहीं. त्याप्रमाणें परमात्मा प्रकृतींतून सत्वगुण काढून घेतो तरी तिच्यांत प्रधानगौणतेकरितां कांहीं सत्व ठेवीत असल्यामुळें प्रकृति नाशच पावते अशी कल्पना करितां येत नाहीं.

**शिष्य**—महाराज, झाडांत पृथ्वींतला एकच स्वतंत्र रस त्या झाडाला अनुकूल असा शोषून येत असेल असें मला वाटत नाहीं. कारण प्रत्येक झाडांत एक स्वतंत्र रस सांपडत नाहीं. रसाचा विपाक रसांतर होतो. किंवा रसाच्या मागून अनुरस होतो. जसें आंवळा खाल्ला तर प्रथम तुरट लागून नंतर गोड लागतो. निंब पहिले कडू लागून नंतर तिखट लागतो. यावरून झाडांत मिश्र रस येतात किंवा दोन येतात. त्याप्रमाणें परमात्म्यालाही प्रकृतींतून शुद्ध सत्वगुण स्वतंत्र रीतीनें कसा घेतां येत असेल ही शंका वाटते.

**गुरु**—अरे, ही तुझी शंका दृष्टांतावर असल्यामुळें ती बरोबर नाहीं. तथापि हिचें निरसन करतां येणार नाहीं असें नाहीं. रसाचा विपाक रसांतर होतो, म्हणजे कांहीं रस खाल्ल्यानंतर ज रसांतर होतें त्याला विपाक ह्मणतात. मग त्या झाडांत एकच स्वतंत्र रस येतो असें नाहीं का झालें ? आणखी कांहीं रसांचे विपाक जसेचे तसेच होतात, निराळे होत नाहींत. बरें, तुझ्या म्हणण्याप्रमाणें झाडांत मिश्ररस येतात असें मानलें तरीही दृष्टांत चुकत नाहीं. कारण पृथ्वींतील रसांचें पृथक्करण बीजाला करितां येतें ही गोष्ट निर्विवाद खरी आहे. मग परमात्म्याची शक्ति सर्वांपेक्षां अनंतपट जास्त असल्यामुळें त्याला प्रकृतींतून शुद्ध सत्वगुण आपल्या अनुकूल काढून घेतां येतो यांत तुझी काय शंका राहिली ?

शिष्य—परमात्म्याची सर्व शक्तिमत्ता मायेच्या स्वाधीन आहे असें वेदान्ती ह्मणतात हें कसें ?

गुरु—अभ्यासावांचून नुसत्या शाब्दिक वेदांताला घेऊन काय करितोस ? नुसत्या वेदान्ताच्या घमेंडीनें योगशास्त्र गौण मानण्याकडे तुझ्या मनाची प्रवृत्ति होऊं नये असें आपल्या निरूपणाचें धोरण मी पहिलेपासून ठेविलें आहे. व वेदांत आणि योग यांच्या विरोधासंबंधीं तुझ्या शंकेचें निराकरणही मागें मीं केलें आहे. ( पृ. १५५पहा ), तथापि ही शंका तुला आलीच ! ह्यावरून पुढें जर तुझ्या आंगावर परमार्थरूपी प्रपंच पडला तर कशी वागणूक करशील कोण जाणे ? योगसाधनाला गौण मानून साधकाला काय उपयोग ? अशक्त राहण्यापेक्षां सशक्त राहणें चांगलें, म्हणून सन्निपातांत येणाऱ्या बलाची कोणी इच्छा करणार नाहीं. त्यापेक्षां अशक्तताच बरी. पांडूरोगानें जर एखादा मनुष्य लठ्ठ झाला तर तेंच त्याचें नष्ट होण्याचें चिन्ह समजावें असें ज्ञानेश्वरींत ह्मटलें आहे. यावरून योगाभ्यास न करितां नुसत्या वेदांत्यापेक्षां योगशास्त्राचेंच म्हणणें मला बरें दिसतें. परमेश्वराचा सर्वशक्तिमानपणा प्रकृतीवर अवलंबून नाहीं. कारण "मयाध्यक्षेण प्रकृतिस्सूयते सचराचरम् " या गीतावाक्यावरून परमात्माच प्रकृतीचा चालक आहे. परमेश्वराची शक्तिमत्ता प्रकृतीच्या स्वाधीन मानली तर त्याचें ज्ञानही प्रकृतीच्याच स्वाधीन मानिलें पाहिजे, व प्रकृतीचें ज्ञान म्हणजे भ्रम. मग परमेश्वराचें ज्ञानही भ्रमच झालें. परमेश्वराचेंच ज्ञान भ्रम झाल्यावर जगांत असा कोण मायेचा पूत आहे कीं, त्याचें ज्ञान निर्भ्रम राहूं शकेल ? मग जगांत कोणास ज्ञानच होणार नाहीं. ह्मणून ईश्वराची सर्वशक्तिमत्ता प्रकृतीच्या

स्वाधीन नाहीं असें म्हणणें उत्तम. जगाच्या अपेक्षेनें प्रकृति सर्व शक्तिमान् आहे असें ह्मणतां येईल. परंतु परमात्मा तिचा चालक असल्यामुळें तो प्रकृतीच्या स्वाधीन होऊं शकत नाहीं.

**शिष्य**—परमेश्वर अकर्ता असून त्याला सत्वगुणाचा अभिमान कसा घडतो ?

**गुरु**—परमेश्वर अकर्ता असूनही त्याजवर कर्तेपणाचा आरोप येतो तो प्रकृतीमुळें. जसें एखादा मनुष्य बलवान् आहे, तर तो लोकांना नेहमीं मारीत सुटतो असा अर्थ नाहीं. तर मारण्याचा प्रसंग आल्याशिवाय तो मारीत नाहीं. तसा सर्वचैतन्यरूप परमात्मा सर्वशक्तिमान् आहे, परंतु मी कर्ता आहें हा अहंकार मात्र प्रकृतीच्या स्वाधीन आहे. ही गोष्ट वेदांत्यांनाही संमत आहे. म्हणून परमेश्वराचें कर्तृत्व मायेच्या स्वाधीन आहे. अशा रीतीनें परमेश्वरावर कर्तृत्वाभिमान आणतां येतो, वास्तविक नाहीं. परंतु त्याचें सर्वशक्तिमत्त्व मात्र प्रकृतीच्या स्वाधीन नाहीं. म्हणून अशा प्रकारचा जो सर्वशक्तिमान् परमात्मा त्याला आपल्या अनुकूल सत्व प्रकृतींतून काढून घेतां येतें. अध्यात्मरामायणांत सीतेनें मारुतीला रामहृदय सांगितला आहे. त्यांत ती म्हणते:—रावणाला मारणें वगैरे सर्व मींच केलें, परंतु मूर्ख मनुष्यें रामानेंच केलें असें म्हणतात. "आरोपयन्ति रामेऽस्मिन् निर्विकारेऽखिलात्मनि ॥" ह्यावरून ईश्वराच्या ठिकाणीं कर्तृत्व मानणें हें भ्रमाचें काम आहे. तात्पर्य, ईश्वराची सर्वशक्तिमत्ता प्रकृतीच्या स्वाधीन नसून त्याला शुद्ध सत्वगुण स्वतंत्रपणानें प्रकृतींतून काढून घेतां येतो हें ठरलें. त्याच परमेश्वराच्या कृपेनें जीव हा प्रत्यक्चेतनाधिगम होतो; म्हणजे परमेश्वर जसा शुद्ध आहे तसा मीही शुद्ध आहें असें

त्याला ज्ञान होऊन परमेश्वर व तो एकच होतात. ( हा ईश्वर-प्रकरणाचा उपसंहार होय.) ती परमेश्वराची कृपा ईश्वरप्रणिधानानें मिळते व कृपा झाली असतां त्याला शुद्ध सत्वगुण येऊन ज्ञान होतें. किंवा परमेश्वर व आपण एक होणें ही गोष्ट विवेकानें होते. कारण प्रत्यक्चेतनाधिगम झाला असतां अविद्या निवृत्ति होते, व विवेक होऊन तो मुक्त होतो. म्हणजे ईश्वर-प्रणिधानानें विवेक आणि चित्तएकाग्रता ह्या दोन्हीं गोष्टी होतात. हाच विवेक फार दृढ झाला असतां चित्त एकाग्र न करितां देखील आपोआपच तें एकाग्र होत जातें व त्याला बंधन होत नाहीं.

**शिष्य**—सिद्धाला विवेक दृढ झाला असतां नुसत्या विवेकानेंच जर चित्त एकाग्र होतें तर मग चित्त एकाग्र करण्याची निराळी खटपट कशास पाहिजे ?

**गुरु**—साधकदशेंत विवेक व चित्तएकाग्रता दोन्हीं पाहिजेत. परंतु सिद्धदशेंत नुसता विवेकच केला तरी चालतें. जसें हरिण हें मृगजलास पाणी समजून त्याच्यामागें धांवतात पण मनुष्य कांहीं मृगजलामागें धांवत नाहीं. मृगाला मृगजल पाहून मोह होतो, कारण त्याला विवेक नसतो, म्हणून त्याला पाणी न मिळतां श्रम फुकट जातात.पाण्याच्या आशेनें धांवतां धांवतां त्यांना नदीनाल्याचें पाणी मिळून त्या पाण्यानें जरी ते आपली तहान भागवितात तरी त्यांचा भ्रम मात्र कायमच असतो. कारण तहान शांत झाली ती मृगजलाच्या पाण्यानेंच शांत झाली असें ते अविवेकानें मानतात.पण मनुष्याचा विवेक दृढ असल्यामुळें त्याला कोणत्याहि वेळेस मृगजल दिसलें तरी मोह होत नाहीं. म्हणून तो तहानेनें मरत असला तरी मृगजल पाहून त्याच्या मागें धांवत नाहीं.

त्याप्रमाणें बद्ध पुरुष हे सुखाच्या आशेनें विषयाकडे धांवत असतात, तरी त्यांना विषयांत तर सुख होत नाहींच, परंतु विषय भोगतां भोगतां त्यांतून जेव्हां ते परततात तेव्हां त्यांचें चित्त एकाग्र होऊन सुख होतें. पण नदीच्या पाण्यानें तहान गेली असतां ती मृग-जलानेंच शांत झाली असें हरणाला जसें अविवेकामुळें वाटतें, त्या-प्रमाणेंच बद्ध पुरुषही विषयभोगानेंच आपल्यास सुख झालें असें अविद्येनें मानतात. परंतु मुक्त पुरुषांला विषय समोर दिसत असले तरी त्यांना अविवेक ( मोह ) कधींच होत नाहीं. म्हणजे सुख हें विषयांत आहे असा अविवेक त्यांना कधींही उत्पन्न होत नाहीं. जसें मृगजल आपण प्रत्यक्ष पाहत असलों तरी तें मिथ्या आहे अशी आपल्यास पक्की खातरी असते तसें मुक्तांचें ज्ञान इतकें दृढ झालें असतें कीं, विषय प्रत्यक्ष समोर दिसत असले तरी ते मिथ्या वाटून त्यांना मोह होत नाहीं. परंतु साधकाची गोष्ट तशी नाहीं. त्याचा विवेक पक्का झाला नसल्यामुळें त्याची वृत्ति घटकाभर ज्ञानाकडे व घटकाभर विषयाकडे जात असते; त्यामुळें त्याला विषय समोर आले असतां विचार करूनच ते मिथ्या ठरवावे लागतात. कारण विषय पाहिल्याबरोबर ते मिथ्या समजण्याइतकें त्याचें ज्ञान दृढ झालें नसतें. म्हणून पुनः पुनः विचार करून त्याला विषयमिथ्यात्वदृष्टि करावी लागते. व विवेक दृढ करण्याकरितां त्याला चित्तएकाग्रतेची गरज आहे, तशी सिद्धांना नाहीं; कारण त्यांचा विवेक अत्यंत दृढ झाला असतो. यावरून एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे; ती हीच कीं, चित्त हें कोणत्याही वस्तूवर जें पुनः पुनः धांवतें, तें ती वस्तु सत्य मानून धांवतें, मिथ्या समजल्यावर धांवत नाहीं. मुक्तांना जगत् मिथ्या आहे असें समजतें म्हणून त्यांचें चित्त विष-

यांचें मागें धांवत नाहीं. पण परमेश्वर सत्य आहे म्हणून त्याच चित्त त्याचे चरणाकडे धाव घेत असतें व त्यामुळें त्यांना भक्ति घडते. म्हणजे मुक्तांमध्यें मुक्ति जशी सहज असते तशी भक्तिही सहजच असते. मधुसूदनसरस्वती म्हणतात की,

श्लोक—" जीवन्मुक्तदशायां तु न भक्तेः फलकल्पना ।
अद्वेष्टृत्वादिवत्तेषां स्वभावो भजनं हरेः ॥

म्हणजे जीवन्मुक्त अवस्थेंत अद्वेष्टृत्वादि गुण जसे स्वाभाविक असतात तशी भक्तिही स्वाभाविक राहते. कारण एक परमेश्वरच सत्य आहे असें समजल्यामुळें त्यांचें चित्त स्वाभाविकच तिकडे जातें. भागवतांत म्हटलें आहे:—

" आत्मारामाश्च मुनयो निर्ग्रंथा अप्युरुक्रमे । कुर्वंत्यहैतुकीं भक्तिमित्थंभूतगुणो हरिः॥" त्या हरीचे गुणच कांहीं असे आहेत कीं, आत्माराम असे जीवन्मुक्त मुनिही ( आत्मनि रमंति इति आत्मारामाः ) त्या परमेश्वराचे ठिकाणीं निष्काम भक्ति करीत राहतात. यावरून जीवन्मुक्तांनाही सगुणभक्ति सहज असते. तर अशा प्रकारची जी भगवद्भक्ति व लोकांच्या ठिकाणीं वागावयाच्या ज्या चार भावना मागें सांगितल्या त्यांच्या योगानें चित्त समाधान होतें व हें समाधान परमेश्वरकृपेनेंच मिळतें.

**शिष्य**—महाराज, विवेक करितांना साधकाला भक्तीचा कोणता उपयोग आहे ?

**गुरु**—विवेक करितांना तरी भक्तिशिवाय चित्त स्थिर होत नाहीं. म्हणून साधनदशेंतही भक्तिच पाहिजे. भक्तीशिवाय विवेक दृढ होत नाहीं व मुक्तदशेंत तर भक्ति असतेच. आपल्या बळानें जर आपण विवेक करूं लागलों तर मी विवेक करणारा आहें हा अभिमान कधींच सुटत नाहीं. कारण तो आहे अहंकाराची

होतो. व अशा भक्तीनेंच खरोखर माया निवृत्त होते. व भक्तीमुळेंच ती पुन्हां भासत नाहीं. याविषयीं गीतेंत म्हटलें आहे:—

" दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया ।
मामेव ये प्रपद्यंते मायामेतां तरंति ते ॥ "

देव म्हणतात, माझी माया कठीण व त्रिगुणमयी आहे. मला जे शरण येतात तेच हिला तरून जातात.

ओवी ज्ञानेश्वरी—" येथ एकचि लीला तरले । जे सर्वभावें मज भजले । तया ऐलीच थडी सरलें । मायाजळ ॥ " ज्ञानेश्वर महाराज ह्मणतात, एक भक्तच ही माया लीलेनें तरून जातात. रज्जूवर सर्प भासला असतां दिवा आणण्याचे सायास करावे लागतात पण गारोडी हा लीलेनेंच वादीचा सर्प करून पुन्हां त्याची पूर्ववत् वादी करितो. तद्वत् नुसते ज्ञानी आहेत त्यांना तीन देह ओलांडून निर्गुणाचे सायास पडतात, पण सगुण भक्ति असली म्हणजे लीलेनें माया तरून जातां येते. भक्तांना लीलेन माया तरतां येते खरी, पण त्यांना लीलेनें जग मात्र उत्पन्न करतां येत नाहीं. समजा एखाद्या मनुष्याजवळ डावेल बासनचा वेल आहे तर गारुड्याचा खेळ त्याला खोटा दिसेल. पण खेळ सहज लीलेनें उत्पन्न करून तो मोडणें हें मात्र गारुड्यालाच करितां येईल. त्याप्रमाणें ईश्वरासच लीलेनें जग उत्पन्न करितां येतें. म्हणून त्या ईश्वराचीच भक्ति केल्यानें भक्ताला माया सहज तरून जातां येते. "येथ एकचि लीला तरले । जे सर्वभावें मज भजले ॥" या वचनाप्रमाणें भक्ताला नेहमीं वाटत असतें कीं, माझा स्वामी सर्वहृदयस्थ आहे, व मी त्याच्यांत आहें. एवढ्यानेंच त्याची सर्व माया संपते. असा भक्त योगाचें फळही सहज पावतो. "एकं सांख्यं च योगं च यः पश्यति स

पश्यति" देव म्हणतात, सांख्य आणि योग या दोहींचें फळ एकच. आणखी:— "बहूनां जन्मनामंते ज्ञानवान्मां प्रपद्यते। वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ॥" भगवान् म्हणतातः— पुष्कळ जन्मांचे शेवटीं ज्ञानी पुरुष मला शरण येऊन सर्व परमात्माच आहे अशा दृष्टीनें वेगळा उरत नाहीं व तो महात्मा फार दुर्लभ होय. ह्यालाच आत्मनिवेदन भक्ति म्हणतात. "पैं आपलेनि भेदेंविण। माझें जाणिजे जें एकपण। तयाचि नांव शरण। मज येणें गा॥" "म्हणौनि मी होऊनि मातें। सेवणें आहे आइतें। तैसें करीं हाता येतें। ज्ञानें येणें॥" हें आत्मनिवेदनभक्तीचें लक्षण ज्ञानेश्वरमहाराजांनीं किती सुंदर केलें आहे? समर्थ रामदासस्वामी देखील "सर्व परमात्माच आहे, आपण कोणीच नाहीं अशा प्रकारचें शुद्ध प्रीतीनें होणें" यालाच आत्मनिवेदन म्हणतात.

**शिष्य**—आत्म्याचा अनुभव नसतां भक्तीनेंच आपणास परमेश्वररूप होणें कसें संभवतें?

**गुरु**—स्त्रीचें जर अतिशय ध्यान लागलें तर आपण स्त्री होतों किंवा नाहीं? तशीच अळीही भिंगोटीच्या ध्यानानें सगळी भिंगोटीच होते हें तुकाराममहाराजांचें प्रसिद्ध वचन तुला आठवतें कीं नाहीं? मग ध्यानानें जर खोटी गोष्ट प्राप्त होते तर नित्य जो ईश्वर त्याचें भक्तीनें ध्यान लागलें असतां आपण ईश्वर कां होणार नाहीं? म्हणून आत्म्याचा अनुभव असो वा नसो, पण भक्ति असली म्हणजे आपण परमेश्वररूप होतों. कारण भक्तीनें ज्ञान व ध्यान हीं दोन्ही होतात. पंचदशींत म्हटलें आहेः—श्लोक-- "अनुभूतेरभावेऽपि ब्रह्मास्मीत्येव चिंत्यताम्। अप्यसत् प्राप्यते ध्यानात् नित्याप्तं ब्रह्म किं पुनः॥"

म्हणजे अनुभव नसला तरी मी ब्रह्मच आहें अशा ध्यानानें सगुणभक्ति करीत असावें; कारण ध्यानानें खोटें जर प्राप्त होतें तर नित्य सत्य असें ब्रह्म कां प्राप्त होणार नाहीं ? या श्लोकाचा अर्थ निर्गुणध्यानपर करितात, पण तो सगुणध्यानपरच आहे; कारण गीतेंत देवांनीं निर्गुणध्यानाला क्लेश सांगितले आहेत. तुकाराममहाराज म्हणतातः—" वाचे गोविंद गोविंद । मना लागलिया छंद ॥ १ ॥ मग गोविंद ते काया । भेद नाहीं देवा तया ॥ २ ॥ आनंदलें मन । प्रेमें पाझरती लोचन ॥ ३ ॥ तुका ह्मणे अळी । झाली भिंगोटी सगळी ॥ ४ ॥" आणखी " ब्रह्मभूत काया होतसे कीर्तनीं । भाग्य तरी ऋणी देवा ऐसा " वरील वचनांत भक्तीच्या योगानें आपण परमेश्वरस्वरूप कसे होतों हें सांगितलें आहे. भक्ताला आपल्या पूर्णतेची जितकी खातरी असते तितकी ज्ञान्याला असते किंवा नाहीं हा संशयच आहे. भक्तीवांचून जो ज्ञानी आहे त्याच्या स्थितीचें वर्णन समर्थांनीं मोठें मार्मिक केलें आहे. समर्थ म्हणतातः—" निर्गुण नेलें संशयानें । सगुण नेलें ब्रह्मज्ञानें । दोहींकडे अभिमानें । ओस केलें ॥" शास्त्रांचा परस्परांत वाद असल्यामुळें त्यांचा समन्वय कठीण आहे, म्हणून निर्गुणाविषयीं त्यांचा निश्चय नसतो, संशय राहतो, व इकडे ब्रह्म हें निर्गुण असून सर्वव्यापक आहे असा ब्रह्मज्ञानाचा त्यांचा आग्रह सुटत नसल्यामुळें त्यांचें सगुणध्यानही दृढ होत नाहीं. याप्रमाणें दोहींकडे ते अभिमानानें नाडले जातात. परंतु भक्ताला मात्र आपल्या पूर्णतेची खातरी असते हें तुकारामांनीं प्रतिज्ञा करून सांगितलें आहे. ते म्हणतातः—" घोटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हातीं । मुक्ता आत्मस्थिति सांडवीन ॥" ब्रह्मज्ञानाच्या अभिमानानें आम्ही मुक्त झालों

अशा घमेंडींत राहून भक्तिप्रेमसुखाचा आनंद आम्ही अनुभवला नाहीं म्हणून ज्ञान्याला मी लाळ घोटायाला लावीन. येथें " मुक्तां आत्मास्थिति सांडवीन " असें म्हटलें आहे त्याचा अर्थ एवढाच कीं, त्यांना जो ज्ञानाचा अभिमान असतो तो सोडण्याला लावीन. वास्तविक कांहीं मुक्तांना आत्मस्थिति सुटत नाहीं. पण मी ब्रह्म आहें असें म्हणण्यापेक्षां माझ्यासुद्धां सर्व ब्रह्मच आहे असें त्यांनीं कां म्हणूं नये ? असें म्हणण्यांत द्वैत राहात नाहीं. आत्मस्थिति सांडवीन असें म्हटल्यानें तुकारामांनीं ब्रह्मज्ञान्यास तुच्छ केलें नाहीं तर शुष्क ब्रह्मज्ञान्याला तुच्छ केलें आहे, कारण मी मुक्त आहें असें वाटणें हें द्वैत आहे. तुकाराममहाराजांच्या ह्या म्हणण्यांत इतका जोर आहे कीं, ते म्हणतात " ब्रह्मभूत काया होतसे कीर्तनीं " कीर्तनांत शरीर ब्रह्मच होऊन जातें, मग आत्मा ब्रह्म होईल यांत नवल कोणतें ?

**शिष्य**—तुकारामांनीं जड शरीर ब्रह्म होतें हें कसें सांगितलें?

**गुरु**—याला प्रमाण आचार्यांचें वचन आहे. ते अपरोक्षानुभूतींत म्हणतातः—" मृद्रूपोहि यथा कुंभस्तद्वद्देहोऽपि चिन्मयः ॥ आत्मानात्मविवेकोऽयं मुधैव क्रियतेऽबुधैः ॥ " म्हणजे मातीचा घट हा मातीच्या स्वरूपांतच राहतो, निराळा रहात नाहीं. त्याप्रमाणें सर्व जगभर ब्रह्म आहे तर मग देह तरी निराळा कोठून आला ? म्हणून हा आत्मा, हा अनात्मा, असा विवेक करणें हें मूर्खांचें काम होय. येथें मात्र तुला असें सांगून ठेवतों कीं, हा श्लोक सिद्धदशेंतला आहे. यावरून विवेकाचा निषेध होत नाहीं, तर भाष्यांत जो विवेक सांगितला आहे तो साधकदशेकरितां आहे. सिद्धदशेंत विवेकाची जरूरी नाहीं. पण भक्तीची जरूरी आहे, हें षट्पदींत आचार्यांनीं सांगितलें आहे.

" सत्यपि भेदापगमे नाथ तवाहं न मामकीनस्त्वम् ।
सामुद्रो हि तरंगः क्वचन समुद्रो न तारंगः ॥ "

आचार्य म्हणतात–हे नाथ, खरोखर भेद गेला तरी मी तुझा आहे तूं कांहीं माझा नाहींस, पाणी एक जरी असलें तरी समुद्र कांहीं तरंगाचा नाहीं, तर तरंगच समुद्राचा आहे. येथें " नाथ तवाऽहं " या पदानें भक्तीची मात्र जरूरी दाखविली आहे. तेंच तुकाराममहाराजही सांगतात.– –

" ब्रह्मभूत काया होतसे कीर्तनीं. "

**शिष्य**—भक्ताला ज्ञान व भक्ति दोन्हीं असलीं तरी योग्या-प्रमाणें त्याला प्रारब्ध जिंकतां येतें काय ?

**गुरु**—प्रारब्धभोगानेंही भक्ताला दुःख होत नाहीं, हें तुकारामांनीं पुढल्याच कडव्यांत सांगितलें आहे–" भाग्य तरी ऋणी देवा ऐसा" येथें भाग्य म्हणजे प्रारब्ध. ज्याचा प्रत्यक्ष देवच ऋणी झाला त्याच्या भाग्याला काय पार आहे ? यावरून भक्ताला प्रारब्धही भोगावें लागत नाहीं असें झालें. आतां ज्ञानाचा अभिमान जसा मागें नष्ट केला तसा उपासनेचाही अभिमान नष्ट करितातः–" सांडवीन तपोनिधा अभिमान ॥ " तपोनिधि म्हणजे देवतांना अनुसरून ज्याची उपासना असते असे उपासक. तुकाराममहाराज म्हणतात, भक्तिसुखापुढें तपोनिधांचाही अभिमान व्यर्थ आहे. तसाच कर्माचाही अभिमान व्यर्थ करि-तात–" यज्ञ आणि दान लाजवीन ॥ " येथें नुसता अभिमान सोडायला सांगतात. उपासना, यज्ञदानादिकांचा निषेध मात्र करीत नाहींत. आतां देवलोकांत दिव्य भोग भोगणारे जे देव त्यांचाही अभिमान त्यांना नको आहे. ते म्हणतात, कीर्तनसुखा-पुढें स्वर्गवास व दिव्य भोग हेही कडू आहेत. " कडू स्वर्गवास

करीन भोग ॥ " त्याप्रमाणें वैराग्यानें घरदार सोडून तीर्थक्षेत्रें फिरणारे जे आहेत त्यांचीही प्रवृत्ति कीर्तनप्रेमाकडे वळवितात:— " तीर्थश्रामकासी आणीन आळस ॥ " येथें आळस शब्दानें तमोगुण घेतला नाहीं, तर फक्त तीर्थयात्रेला श्रमण करीत फिरण्याची प्रवृत्ति कमी करून " नलगे सायास जाणें वनांतरा। सुखें येतो घरा नारायण ॥ ठायींच बैसोनि करा एकचित्त। आवडी अनंत आळवावा ॥ " अशा भक्तिमार्गानें चित्तवृत्तीचा निरोध सांगण्याकरितां " आळस आणीन " असें म्हटलें आहे. मग याप्रमाणें निःसाधन झाल्यावर असाध्य अशी जी ही भक्ति तीच एक पुरुषार्थ उरते असें सांगतात:—" भक्तिभाग्यप्रेमा साधीन पुरुषार्थ ॥ " यांत भाग्यप्रेमा या शब्दानें जीवन्मुक्तिकालीं प्रारब्ध हें भक्तिमयच राहतें असें दाखविलें. आतां विदेहमुक्तींतही भक्ति राहते या अभिप्रायानें सांगतात:—ब्रह्मींचा जो अर्थ निजठेवा ॥ " प्रारब्ध संपल्यानंतर विदेहमुक्तींत भक्तीचा स्वीकार वामनपंडितांनींही केला आहे. ते म्हणतात:—श्लोक—

ज्ञानानळें करुनि संचित दग्ध होतें ॥
कर्माभिमान त्यजितां क्रियमाण जातें ॥
प्रारब्धमात्र उरतें सरतें स्वभोगें ॥
तें नासल्या उपरि मुक्तिच भक्तियोगें ॥ १ ॥

ज्ञानी भक्ताकरितां परमेश्वराचें अनादि वैकुंठ आहे. त्या ठिकाणीं वैकुंठ, वैकुंठवासी, व परमेश्वर हे एकरूपच होऊन भक्ति कायम राहते असें वामनांनींच एके ठिकाणीं म्हटलें आहे. त्यांचा अभिप्रायहि विदेहमुक्तींत भक्ति राहते असाच आहे; परंतु ती भक्ति अनिर्वचनीय असते असें नारदस्वामी आणि ज्ञानेश्वरमहाराज ह्मणतात. "अनिर्वचनीयं प्रेमस्वरूपम् " असें नारद-

भक्तिसूत्रांत ह्मटलें आहे. तसेंच ज्ञानेश्वरी:–तैसी क्रिया कीर न साहे। परी अद्वैतीं भक्ति आहे। हें अनुभवाचि जोगें नोहे। बोला ऐसे ॥ "

आतां स्वर्गवास, यज्ञ, ज्ञान, तप, या सर्वांचा अभिमान जरी सोडायला सांगितला तरी भक्तिभाग्यप्रेमा हा जो असाध्य पुरुषार्थ आहे त्याचा मात्र अभिमान आम्ही सोडणार नाहीं असें सांगतात:—

" धन्य ह्मणवीन इह लोकीं लोकां। भाग्यें आम्ही तुका देखियेला ॥ " खरोखर आम्ही आपल्या महत्पुण्यानें तुका पाहिला असें लोकांस येथें आणि परलोकीं ह्मणावयास लावीन. या ठिकाणीं इह म्हणजे येथें आणि लोकीं म्हणजे परलोकीं असाच अर्थ केला पाहिजे, अन्यथा पुनरुक्ति होईल. असो. हें त्यांचें वचन अभिमानानें निघालें नाहीं तर भक्तीच्या आवेशांत निघालें आहे. किंवा भक्तीच्या अभिमानानें निघालें म्हटलें तरी कांहीं बाध येत नाहीं. कारण त्यांचा अभिमान जीवाच्या अभिमानासारखा नव्हे तर " जे अभिमान वाहती आंगीं ॥ आम्ही हरीचे भूषावया लागीं ॥ " या वचनाप्रमाणें तो अभिमान त्यांना भूषणच आहे. कुलवंतानें कुळाचा अभिमान न धरणें हेंच त्याला लांछन होय. परमेश्वरानें जसें " मला भज " असें गीतेंत म्हटलें आहे, तसें तुकाराममहाराज हे खरे भगवद्भक्त होते म्हणूनच त्यांनीं हरिभक्तीचा अभिमान धरला. पतिव्रतेला पतीच्या सुखापेक्षां जास्त सुख नको असतें–तिचा अभिमान देखील पतिसेवा करण्यासाठींच असतो, व त्याचें जें सुख तेंच तिचें सुख असतें–" पतिव्रतेचें हें मन पति भेटो। तैसे आम्ही विठोमाजीं नांदों ॥" असें तुकारामांनींच म्हटलें आहे. तर खरे भगवद्भक्त असतात ते

" माझिये सुखें जगीं । सुखी झाले ॥ " या ज्ञानेश्वरमहाराजांच्या वचनाप्रमाणें परमात्म्याचा जो आनंद आहे त्या योगानेंच सुखरूप असतात. याला महात्म्यज्ञानही म्हणतात. हें महात्म्यज्ञान गोपीगीतांत व नारदभक्तिसूत्रांतही वर्णन केलें आहे. म्हणून भक्तीनें ज्ञान होऊन योगसिद्धि प्राप्त होते. परमात्मा गीतेंत म्हणतातः— " श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ॥ ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छांतिरनंतरम् ॥" म्हणजे इतर अभ्यास करण्यापेक्षां विवेक किंवा ज्ञानाभ्यास करणें श्रेष्ठ आहे व त्याहीपेक्षां ध्यान श्रेष्ठ असून ध्यानानें कर्मफलत्याग होतो व त्यागानें शांति प्राप्त होते. ( येथें विशिष्यते हें पद ध्यानाच्या मागेंच लावावयाचें ) तर ही जी ज्ञानसहित भगवद्भक्ति सांगितली तिच्या योगानें निर्गुण ब्रह्मच सगुण आहे असें कळतें आणि सगुणावर प्रीति जास्त बसते. सारांश, योगसिद्धि झाली असतां योगी सहज लीलेनें माया तरून जातो, आणि जो भक्त आहे तोच योगी होय; कारण ईश्वरप्रणिधानानें योगसिद्धि होते; ही गोष्ट परमेश्वरास मान्य आहे. श्लोक–गीता–" योगिनामपि सर्वेषां मद्गतेनांतरात्मना ॥ श्रद्धावान् भजते यो मां स मे युक्ततमो मतः ॥ " भगवान् म्हणतात सर्व योगियांमध्यें श्रेष्ठ कोण ? तर तोच कीं जो " जीव नेमावा परमात्मसुखें " या वचनाप्रमाणें आपला जीव परमेश्वरांत मिळवून आत्मनिवेदनभक्ति करणारा असा श्रद्धावान् व भक्तिमान् असेल, तोच योगी श्रेष्ठ होय. म्हणून माया निवृत्ति ही परमेश्वराच्या कृपेनेंच होते.

आतां " अविद्याक्षेत्रमुत्तरेषां प्रसुप्ततनुविच्छिन्नोदारानाम् " या वचनाप्रमाणें अविद्या ही सर्व क्लेशांचें बीज आहे हें भगवद्गीता, स्मृति, पुराणें यांच्या योगानेंच सिद्ध होतें असें नाहीं, तर

श्रुति, युक्ति आणि अनुभव यांच्या योगानेंही हें सिद्ध आहे. जसें, श्रुति—श्वेताश्वतर—" अनीशश्चात्मा बध्यते भोक्तृभावात् ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशैः " म्हणजे जीव हा मी भोक्ता आहें अशा अविवेकानें बद्ध होतो,परंतु "ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशैः" देवाला जाणून तो सर्व पाशांतून मुक्त होतो, हें ज्ञान सांगितलें. आतां भक्ति आणि योग पाहिजे तर " ज्ञात्वा देवं सर्वपाशापहानिः ॥ क्षीणैः क्लेशैः जन्ममृत्युप्रहानिः ॥ " देवाला जाणलें असतां सर्व पाश तुटून जातात, कर्में क्षीण होतात, आणि अविद्यादि क्लेश नष्ट होतात. रागद्वेष नाहींसे झाले असतां विषयवासनाही रहात नाहीं आणि वासनाच नाहीं तर जन्म कोठून येणार ? " यं यं वापि स्मरन्भावं त्यजत्यंते कलेवरं । तं तमेवैति कौंतेय सदा तद्भावभावितः ॥ " गीता. जो जो ज्या ज्या भावनेनें शरीर सोडतो त्या त्या भावाला तो प्राप्त होतो. नाथ म्हणतातः—" जन्म घेणें लागे वासनेच्या संगें ॥" अर्थात् वासना असल्याशिवाय जन्म होत नाहीं.म्हणून देवानें अर्जुनाला असा उपदेश केला कीं—"मामनुस्मर" म्हणजे माझें नेहमीं स्मरण कर. त्या योगानें तूं मला मिळशील. वासना नाहींशी झाली असतां जन्मच होत नाहीं तर मरण तरी कसें येणार ! " ते मरणाऐलीचकडे । मज मिळोनि गेले फुडे ॥ " ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, मरण येणाच्या पूर्वींच ते मला मिळाले आहेत. कारण " मारयन् मृत्युनांतकम् " मृत्यूचाही मृत्यु असा जो परमेश्वर त्यांच्यांत मिळाल्यावर त्याला कोण मारणार आहे ? तर यावरून " क्षीणैः क्लेशैर्जन्ममृत्युप्रहानिः " अविद्यादिक्लेश क्षीण झाले असतां जन्ममृत्युही नाहींसे होतात. याप्रमाणें " तस्याभिध्यानाद्योजनात्तत्वभावात् ॥ भूयश्चांते विश्वमायानिवृत्तिः ॥ " त्याचें ध्यान,त्याच्या ठिकाणीं संयोग किंवा योग म्हणजे वियोग झाला आहे म्हणून

त्याचा संयोग करणें, आणि त्याचें ज्ञान होणें ह्या तीन गोष्टी केल्या असतां विश्वमायेची निवृत्ति होते. यांतच भक्ति, ज्ञान, व वैराग्य हे तिन्ही आले. वरील वचनांत " ज्ञात्वा देवं " आणि " तस्याभिध्यानात् " या दोन ठिकाणीं देवशब्द आला असल्यामुळें येथें देवच प्रधान आहे म्हणून भक्तिही श्रेष्ठ होय. अध्यात्मरामायणांत ह्मटलें आहे:—

" त्वं सर्वभूतहृदयेषु कृतालयोऽपि । त्वन्मंत्रजाप्यविमुखेषु तनोषि मायाम् । त्वन्मंत्रसाधनपरेष्वपयाति माया । सेवानुरूपफलदोऽसि यथा महीपः " ॥ १ ॥ हे रघुराया, तूं जरी सर्वभूतांच्या हृदयांत रहात आहेस तरी जे तुझ्या नामाचा जप करीत नाहींत त्यांच्या ठिकाणीं तूं आपल्या मायेचा विस्तार करितोस पण तुझ्या नाममंत्राचें जे साधन करितात त्यांना मात्र तुझी माया ही सोडून दूर जाते. पण इतक्यावरून जर कोणी म्हणेल कीं, तुझ्या ठिकाणीं विषमता आहे तर तसें मात्र नव्हे. कारण "सेवानुरूपफलदोऽसि यथा महीपः" जो जशी नौकरी करतो तसें त्याला राजा फल देतो. चोरी केली तर शिक्षा करितो व चांगलें काम केलें तर बक्षीस देतो. ही गोष्ट राजाला मुळींच बाधक होत नाहीं. कारण ती चोर आणि नोकर यांच्या गुणांवर अवलंबून आहे. त्याप्रमाणें हे रामा, भक्ताला त्याच्या भक्तीमुळेंच फल प्राप्त होतें. म्हणजे त्याची माया तुझ्या नामस्मरणानें निवृत्त होते. असें आहे तथापि परमात्मा भक्ताला अधिकच वश आहे असें दिसतें. उदाहरण, चांदणें हें चोराला व सावाला सारखेंच पाहतें, तथापि चोर त्याचा द्वेष करितात व साव त्याचा द्वेष करीत नाहींत. पण चंद्राला दोघांचाही द्वेष नसतो. तरी चंद्राचा खरा

आनंद चकोरच घेऊं जाणतो. कारण चंद्राचें अमृत चकोरालाच घेतां येतें. इतरांला चंद्र कांहीं नको म्हणत नाहीं, पण त्यांना घेतांच येत नाहीं, त्याला तो काय करणार ? तसेंच चंद्रोदय झाला असतां कमलेंच विकास पावतात, व समुद्रालाच उचंबळतां येतें. त्यांच्यावरच चंद्राच्या आकर्षणाचा विशेष परिणाम घडतो. त्याप्रमाणें परमेश्वराची खरी चर्वा भगवद्भक्तच घेतात. ते परमेश्वरांत मिळून जातात व परमात्मा त्यांच्यांत राहतो. परमेश्वर भक्तांना जवळ करितो म्हणून इतरांना तो द्वेषानें नको म्हणतो असें नाहीं, परंतु इतर लोकच त्याच्याकडे जात नाहींत. यावरून परमात्मा कोणाचाही रागद्वेष करीत नसल्यामुळें त्याच्यावर नैर्घृण्यवैषम्य दोष येऊं शकत नाहीं. हे परमात्मा स्वतःच गीतेंत सांगतातः—

श्लोक—"समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः ।
ये भजंति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम्"॥

भगवान् म्हणतात, मी सर्व भूतांचे ठिकाणीं समान आहें. मला कोणी द्वेष्यही नाहीं व प्रियही नाहीं. परंतु मला जो भक्तीनें भजतो तो माझ्या ठिकाणीं आहे व मी त्याच्या ठिकाणीं आहें. तोच मला खरोखर येऊन मिळाला आहे. इतरांना मी कांहीं नको म्हणत नाहीं, पण तेच येत नाहींत त्याला मी काय करणार ? ज्ञानेश्वरमहाराज म्हणतातः—"कां कमलकंदा आणि दर्दुरीं। नांदणूक एकेचि घरीं । परि पराग सेविजे भ्रमरीं । येरां चिखलचि उरे ॥" भ्रमर आणि बेडूक हे एकाच ठिकाणीं राहतात परंतु भ्रमर त्यांतील पराग सेवन करितात आणि बेडकाच्या कपाळीं चिखलच असतो. दुसरा दृष्टांतः—"पाहे पां दूध पवित्र आणि गोड । पासीं त्वचेचिया पदराआड । परि तें अव्हेरूनि गोचिड । अशुद्धचि सेवी ॥" गोचीड असतो तो पवित्र आणि

गोड असें दूध टाकून रक्तच सेवन करितो पण गाईचें दूध हें वांसरालाच मिळतें. असो, तर याप्रमाणें भगवद्भक्तालाच परमात्मानुग्रहानें विवेक दृढ होऊन त्याच्या मायेची निवृत्ति होत असते.

अशा रीतीनें ज्ञान व भक्ति दृढ होऊन जीवन्मुक्ति होते तेंव्हांच योगाचें फल मिळतें. अमृतानुभव अध्याय ९ यांत म्हटलें आहे:—" कोणी एक अकृत्रिम । भक्तीचें हें वर्म । योग ज्ञानादिविश्राम । भूमिका हे ॥ " श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात— ईश्वरस्वरूपाची प्राप्ति हें अकृत्रिम भक्तीचें रहस्य व योग आणि ज्ञान या सर्वांचें विश्रांतिस्थान होय. सुंदरदासही म्हणतात:—

" होई अनन्य भजै भगवंतहि और कछू उरमें नहि राखै । देविरुदेव जहां लग है डरके तिनसूं वहि दीन न भाखै । योगरु यज्ञ व्रतादि क्रिया तिनको तुं नहिं स्वपने अभिलाखै। सुंदर अमृतपान कियो तब तौ कहुं कौन हलाहल चाखै ॥" येथें हें ईश्वरप्रकरण संपूर्ण झालें.

**श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु.**

---

# ईश्वरप्रकरणासंबंधीं पुराणांतले श्लोक.

**गुरु**:—आतां या ईश्वरप्रकरणासंबंधीं पुराणांतले कांहीं श्लोक वगैरे वार्तिककारांनीं घेतले आहेत त्यांचें भाषांतर सांगण्याचें मागें मीं कबूल केलें होतें तें आतां थोडक्यांत सांगतों:—वार्तिककार म्हणतात " ईश्वरप्रणिधानाद्वा " या सूत्रापासून आतांपर्यंत झालेल्या सूत्रांनीं ईश्वरप्रणिधान सांगितलें. त्या सूत्रांचा अर्थ कांहीं श्लोकांत दिला आहे तो सांगतों. वार्तिकांत जे लिंगपुराणांतले श्लोक

घेतले आहेत ते सूत्राच्या क्रमानें घेतले नाहींत. त्यांचा क्रम निराळा आहे. आतां प्रथमारंभींचें जें " ईश्वरप्रणिधानाद्वा " हें सूत्र आहे त्यासंबंधीं श्लोक येथें वार्तिककारांनीं दिले नाहींत. त्याबद्दल आपण गीतेचा श्लोक घेऊं:—

" मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ॥
मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः" ॥

भगवान् म्हणतात, मी सर्वांचा आत्मा आहें म्हणून "मन्मना भव " तुझें मन माझें स्वरूपच होवो, आणि " मद्भक्तो भव " म्हणजे तुझी प्रीति माझेच ठिकाणीं राहो. व " मद्याजी " भव तुझें शरीर माझेंच पूजन करो. अशा रीतीनें मनअर्पण प्रकार सांगितला. आतां--" मां नमस्कुरु " म्हणजे मला शरण ये असें सांगून, शरीर अर्पण सांगितलें. या रीतीनें मला सर्व कर्मं अर्पण झालीं असतां तूं मत्परायण झालास म्हणजे तुला योगसिद्धि होऊन तूं माझ्यांत येऊन मिळशील. या श्लोकांत देवानें मी सर्वांचा आत्मा आहें असें म्हटलें यावरून निर्गुण सांगितलें व " मां नमस्कुरु " या पदावरून सगुण आहें असें सुचविलें. अशा रीतीनें सगुणध्यानानें निर्गुणाचें ज्ञान होतें हें सांगितलें. आतां " क्लेशकर्मविपाकाशयैरपरामृष्टः पुरुषविशेष ईश्वरः " या सूत्रासंबंधीं सहा श्लोक आहेत त्यांत ईश्वराचें स्वरूप सांगितलें आहे. तें असें:—

अविद्ययेशस्य योगो नातीतो नाप्यनागतः ।
नाप्यस्त्यस्मितया चैवं रागेणापि त्रिकालतः ॥ १ ॥

या परमेश्वराला अविद्याक्लेशाचा संयोग मागें झाला नाहीं, आतां होत नाहीं व पुढें होणार नाहीं. अस्मिता आणि राग यांचाही संयोग त्याला तसाच तिन्ही कालीं नाहीं.

कालेषु त्रिषु संबंधस्तस्य द्वेषेण नो भवेत् ।
तथैवाभिनिवेशेन संबधो न कदाचन ॥ २ ॥

तसाच त्या ईश्वराला द्वेषाचाही संबंध भूत, भविष्य आणि वर्तमान या त्रिकालांत होत नाहीं. कारण अविद्या, अस्मिता आणि राग हे घडले तर द्वेष अवश्य असतोच. सांख्यसारांत द्वेष हा रागमूलकच सांगितला आहे. म्हणून परमेश्वरास जसा तिन्ही कालीं अविद्या, अस्मिता व राग या क्लेशांचा संबंध नाहीं, तसाच द्वेषाचाही संबंध त्रिकालांत होत नाहीं. आणि त्याप्रमाणेंच "तथैवाभिनिवेशन" अभिनिवेशक्लेशाचाही संबंध कधीं होत नाहीं.

कुशलाकुशलैर्भवसंबंधो नैव कर्मभिः ।
भवेत् कालत्रये शंभोरविद्यामतिवर्जनात् ॥ ३ ॥

अविद्या नसल्यामुळें त्याला पापपुण्यकर्माचाही संबंध कालत्रयांत होत नाहीं.

विपाकैः कर्मणां तस्य न भवेदेव संगमः ।
कालेषु त्रिषु शर्वस्य शिवस्य शिवदायिनः ॥ ४ ॥

आतां कर्माचीं फळें जे विपाक त्यांचाही संबंध त्या परमश्वरास कालत्रयीं नाहीं. अशा प्रकारचा जो परमात्मा तो सवाना कल्याण देणारा आहे व त्याला कशाचाच संबंध नाहीं, परंतु भूतांविषयीं अनुग्रहशक्ति मात्र आहे म्हणून त्याला शिव म्हटलें आहे.

सुखदुःखैर्न संस्पृश्यः कालत्रितयवर्तिभिः ।
तथैव भोगसंस्कारैर्भगवानंधकांतकः ॥ ५ ॥

जीवांना मृत्यु देणारा असा जो संसार किंवा माया त्याचा अंतक म्हणजे नाश करणारा जो भगवान् शंकर त्याला कालत्रयींही सुखदुःखाचा स्पर्श होत नाहीं. आतां सुखदुःखेंच नाहात

तर त्यांपासून उत्पन्न होणारे भोगसंस्कार म्हणजे वासना तरी कोठल्या ? एवं त्यांचाही संपर्क त्याला कधीं होत नाहीं.

पुंविशेषः परो देवो भगवान् परमेश्वरः ।
चेतनाचेतनोन्मुक्तः प्रपंचादखिलात्परः ॥ ६ ॥

हा भगवान् परमात्मा कसा आहे ? तर पुरुषविशेष आहे, सामान्य जीवासारखा नाहीं. म्हणजे सामान्य जीवाप्रमाणें चैतन्य आहे खरा परंतु बद्ध नाहीं, व जगाहून निराळा आहे. त्याप्रमाणेंच तो "चेतनाचेतनोन्मुक्तः" म्हणजे जीवसंज्ञक सामान्य चेतनापासून आणि जडापासूनही निराळा आहे. याप्रमाणें "क्लेशकर्मविपाकाशयैः" या सूत्राचे हे सहा श्लोक सांगितले. आतां "तत्र निरतिशयं सार्वज्ञबीजम्" या सूत्राचे दोन श्लोक आहेत. ते असेः—

लोके सातिशयत्वेन ज्ञानैश्वर्ये विलोकिते ।
शिवेनातिशयित्वेन स्थिते आहुर्मनीषिणः ॥ ७ ॥

या जगांत ज्ञान हें एकाहून एक जास्त आहे म्हणजे एकापेक्षां एक उंच असून त्याची अवधि कोठेंच दिसत नाहीं. पण ती कोठें तरी असली पाहिजे. तर परमात्म्याच्या ज्ञानांत सगळ्या ज्ञानाची पूर्णता आहे. ( असें महात्मे म्हणतात. )

प्रतिसर्गं वस्तुभानं ब्रह्मणः शास्त्रविस्तरम् ।
उपदेशात् स एष्टव्यः कालावच्छेदवर्तिनाम् ॥ ८ ॥

वरच्या श्लोकांत अनुमानानें परमेश्वराची सर्वज्ञता सांगितली तीच या श्लोकांत प्रमाणानें सिद्ध करितात. कालपरिच्छेदानें युक्त अशा वस्तूंची जेव्हां जेव्हां सृष्टि होते तेव्हां तेव्हां त्या वस्तूंचें ज्ञान आणि शास्त्रांचा विस्तार हे ब्रह्मदेवाला ज्याच्या उपदेशानें कळतात तो परमात्मा समजावा. याला आगमप्रमाणः—

श्रुति—" यो ब्रह्माणं विदधाति पूर्वं यो वै वेदांश्च प्रहिणोति तस्मै ॥ तऽह देवं आत्मबुद्धिप्रकाशं मुमुक्षुर्वै शरणमहं प्रपद्ये ॥ " जो ब्रह्मदेवाला उत्पन्न करून ज्ञान देतो त्या आत्मप्रकाश देणाऱ्या देवाला मी मुमुक्षु शरण आहें. हे " तत्र निरतिशयं " या सूत्राचे दोन श्लोक झाले.

आतां " स एष पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदात् ।" सूत्राचे तीन श्लोक सांगतों:—

कालावच्छेदयुक्तानां गुरूणामप्यसौ गुरुः ।
सर्वेषामपि सर्वेशः कालावच्छेदवार्जितः ॥ ९ ॥

ब्रह्मकल्पाच्या अंतीं, ब्रह्मदेवाला देखील लीन व्हावें लागतें यावरून त्यालाही कालपरिच्छेद आहे म्हणजे तो कालाच्या स्वाधीन आहे, म्हणून ब्रह्मदेवासारखे सर्वांचे गुरुही काळाचे स्वाधीन असल्यामुळें हा परमात्मा त्यांचाही गुरु आहे.

अनादिरेव संबन्धो विज्ञानोत्कर्षयोः परे ।
स्थितयोरीदृशः शर्वः परिशुद्धः स्वभावतः ॥ १० ॥

ज्ञान आणि उत्कर्ष म्हणजे पूर्णता ह्यांच्याशीं परमेश्वराचा संबंध अनादि आहे व हा परमात्मा सर्वांहून पर म्हणजे निराळा आहे.असा जो हा परमात्मा यालाच शंकर म्हणतात. हा स्वभावतःच शुद्ध आहे.

आत्मप्रयोजनाभावे परानुग्रह एव हि ।
प्रयोजनं समस्तानां क्रियाणां परमेष्ठिनः ॥ ११ ॥

परमात्म्याच्या सर्व क्रिया म्हणजे ज्ञान हें समस्त जगाच्या कल्याणाकरितां आहे; त्याला स्वतःला त्याचें कांहींच प्रयोजन नाहीं.

" तस्य वाचकः प्रणवः " या सूत्राचा एकच श्लोक आहे तो असा:—

प्रणवो वाचकस्तस्य शिवस्य परमात्मनः ।
शिवरुद्रादिशब्दानां प्रणवो हि परः स्मृतः ॥ १२ ॥

परमेश्वराचें प्रणव म्हणजे ॐ हें एक नांव आहे, व तें शिवरुद्रादि नांवांपेक्षांही श्रेष्ठ आहे किंवा निश्चयानें पाहिलें असतां "शिवरुद्रादिशब्दानां परः प्रणवः" म्हणजे शिवरुद्रादिशब्द हे प्रणवरूपच आहेत असा अर्थ करावा.

आतां "तज्जपस्तदर्थभावनम्" या सूत्राचे सात श्लोक सांगून हें प्रकरण आटपूं.

शंभोः प्रणववाच्यस्य भावना तज्जपादपि ।
आशु सिद्धिः परा प्राप्या भवत्येव न संशयः ॥ १३ ॥

प्रणवाचा अर्थ जो ईश्वर शंभू त्याचे जपानें लवकर मोक्षसिद्धि प्राप्त होते यांत संशय नाहीं.

एकं ब्रह्ममयं ध्यायेत्सर्वं विप्र चराचरम् ।
चराचरविभागं च त्यजेदहमिति स्मरन् ॥ १४ ॥

स्थावर आणि जंगम हा जो जगाचा विभाग आहे हा, मी ब्रह्म आहें अशा विवेकानें सोडून द्यावा. पहिलें असें ध्यान करावें. हें सर्वस्थावरजंगम ब्रह्ममय आहे असें ध्यान करून जगाचा जड भाग सोडून द्यावा व नंतर स्थावरजंगमभाग सोडून देऊन सर्व ब्रह्म मीच आहें असें ध्यान करावें. हें आपल्या म्हणजे जीवज्ञानाच्या रीतीनें सांगितलें.

सप्तांडावरणान्याहुरंडास्यात्मांबुजासनः ।
कोटिकोट्ययुतानीशे चांडानि कथितानि तु ॥ १५॥

हें सर्व चराचर ब्रह्ममय आहे व स्वतः आपण निराळे असल्यामुळें आपण ब्रह्म आहों हा त्वंपदविवेक सांगितला; आतां ब्रह्मांडाचा विवेक सांगतात. "सप्तांडावरणान्याहुः" ब्रह्मां-

डांची सात आवरणें ( शाकर्णें ) मानतात. पौराणिक आवरणें एकाहून एक दसपटीनें मोठीं सांगितलीं आहेत तीं अशीं:— पृथ्वीपेक्षां दसपटीनें जलाचें आवरण मोठें आहे. जलापेक्षां तेजाचें आवरण दसपटीनें मोठें आहे, त्याच्यापेक्षां वायूचें दसपट मोठें आहे. वायूपेक्षां आकाशाचें दसपट मोठें, त्याच्यापेक्षां अहंकाराचें दसपट व अहंकारापेक्षां बुद्धीचें आवरण दसपटीनें मोठें आहे. बुद्धीची देवता ब्रह्मा आहे. व ब्रह्मांडाचा आत्माही तोच आहे. " कोटिकोट्ययुतानीशे चांडानि कथितानि तु " अशीं कोटिकोटि ब्रह्मांडें परमेश्वराचे ठिकाणीं आहेत.

तत्र तत्र चतुर्वक्त्रा ब्रह्माणो हरयो भवाः ।
सृष्टाः प्रधानेन तथा प्राप्य शंभोस्तु सन्निधिम् ॥ १६ ॥

प्रत्येक ब्रह्मांडांत विष्णु आणि शंकर हे ब्रह्मदेवानें ईश्वराच्या समोर राहून उत्पन्न केले. भागवतांत " तस्य नाभेरभूत्पद्मम् " म्हणजे विष्णूच्या नाभीपासून कमल उत्पन्न होऊन त्यांत ब्रह्मदेव झाले असें सांगितलें आहे. व शिवपुराणांत ब्रह्मदेव व विष्णु हे शंकरापासून झाले असें म्हटलें आहे. तरी हे कल्पभेद आहेत. कमीजास्त कोणीच नाहीं, हें पुढल्या श्लोकानें सांगतात:

असंख्याताश्च रुद्राख्या असंख्याताः पितामहाः ।
हरयश्चाप्यसंख्याता एक एव महेश्वरः ॥ १७ ॥

शंकर पुष्कळ आहेत आणि ब्रह्मदेव व विष्णुही असंख्यात आहेत परंतु परमात्मा मात्र एकच आहे. याचा अर्थ असा कीं, जसे स्वप्नांतले देह निरनिराळे दिसतात पण मनाच्या दृष्टीनें ते सगळे एकच आहेत, तसे ब्रह्मा, विष्णु व महेश्वर हे सगळे परमेश्वरदृष्टीनें एकच आहेत; परंतु सृष्टिदृष्टीनें ते अनंत आहेत.

तरी त्या सर्वांत ब्रह्मदेव मात्र जीव आणि ईश्वर ह्या दोन्ही रूपांनीं आहे आणि विष्णु व शंकर हे असंख्यात आहेत तरी ते ईश्वरच आहेत म्हणजे नित्यमुक्त आहेत, हें श्रुति आणि पुराणांवरून मागें सिद्ध केलें आहे.

ब्रह्मेंद्रविष्णुरुद्राद्यैरपिदेवैरगोचरम् ।
आदिमध्यांतरहितं भेषजं भवरोगिणाम् ॥१८॥

ब्रह्मा, इंद्र, विष्णु, रुद्र आदिकरून जे देव आहेत त्यांच्या हृदयांत असणारें व ब्रह्मा, इंद्र इत्यादि देवांसहित सर्वांना कल्याणदायक असें जें हें परमेश्वराचें पद आहे तें सर्वांना अगोचर असून सर्वांच्या पलीकडचें आहे.

शिवतत्त्वमितिख्यातं शिवादपि परं पदम् ॥

हें शिवतत्व सर्वांच्या पलीकडचें असून सर्वांना न कळणारें आहे. न कळणारें म्हटलें यावरून ते सर्व देव अज्ञानी आहेत असा मात्र अर्थ नाहीं; याचा अर्थ असा कीं, तें शिवतत्व देवांना स्थूल दृष्टीनें गोचर नाहीं. कारण तें सर्वव्यापक आहे. यालाच शिवतत्वविवेक म्हणतात.

यांप्रमाणें हें ईश्वरप्रकरण येथें संपूर्ण झालें.

---

हे जे वर ईश्वरप्रकरणाचे श्लोक दिले आहेत ते "ईश्वरप्रणिधानाद्वा" या सूत्रापासून "तज्जपस्तदर्थभावनम्" या सूत्रापर्यंतच दिले आहेत. कारण बहुतेक टीकाकार येथपर्यंतच ईश्वरप्रकरण घेतात. परंतु मीं ज "मैत्रीकरुणामुदितोपेक्षाणाम्" या ३३ साव्या सूत्रापर्यंत ईश्वरप्रकरण घेतलें आहे तें मिश्रांच्या अभिप्रायानुसार आहे.

कताहि दाखविली आहे. हें सत्पुरुषांच्या उक्तींतील रहस्य " विश्वासानें अंतसंस्कार उठतात " या ' मायर्सच्या ' म्हणण्यापेक्षां अधिक उच्च प्रतीचें, शास्त्रीय महत्वाचें, उपयोगी व समाधानकारक आहे." आधुनिक युक्तिसरणीच्या रीतीनें मराठी भाषेत हा ग्रंथ अगदींच नवीन असल्यामुळें राष्ट्रीय शिक्षणाच्या दृष्टीनेंही महत्वाचा आहे.

२ महाराजांची अदृश्यदीपिका—यांत जड शास्त्राच्या आटोक्यांत न येणारे, सत्य व कोठें ना कोठें तरी नेहमीं घडत असणारे जगांतील अद्भुत चमत्कार विश्वसनीय पुराव्यानिशीं लिहिलेले आहेत. आगाऊ १ रु. पाठविणारे पुरेसे ग्राहक मिळतांच वरील दोन्ही ग्रंथ छापले जातील व त्यांस योगप्रभाव व वरील ग्रंथ पाऊणपट किंमतीस मिळतील. आगाऊ वर्गणी व्ही. एन. काळे अँड सन्स, बुकसेलर्स उमरावती या पत्यावर पाठवावी.

प्रकाशक.